


महाराष्ट्रांतील दुष्काळी जिल्हे ८
व
मदत-केन्द्रें ४५
जळगांव
अमळनेर
पारोळे
नगर
देवळाली
राहुरी
पारनेर
मांगी
करमाळे
हिवरे
टेंभुर्णी
मायणी
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समिति
मैल

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

# महाराष्ट्र दुष्काळ-विमोचन समिति

## १९५२–१९५३

### मदत-कार्याचें

# प्रतिवृत्त

## राष्ट्रीय आपत्तींशीं झुंज

**स्व**तंत्र झालेल्या भारतावर विविध तऱ्हेच्या आपत्ति गेल्या पांच वर्षांत आल्या. लक्ष लक्ष लोकांचें जीवन मुळापासून उपटून निघण्याची परिस्थिति उत्पन्न झाली. प्रत्यक्षांत लक्षावधि लोकांना अपरिमित यातना आणि मृत्युदंडहि सोसावा लागला. सर्वत्र आपत्ति सारख्याच तीव्रतेच्या नव्हत्या. तथापि फाळणीपूर्वी आणि नंतर झालेली पंजाबची लांडगेतोड महाभयंकर होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनीं अशा आपत्तीच्या प्रसंगीं क्षणाचाहि विलंब न लावतां धांवून जाणें हें नैसर्गिक आणि क्रमप्राप्तच होतें. आपल्या बांधवांचे प्राण आणि अब्रू वांचविण्यासाठीं सारसर्वस्व पणाला लावून संघाचे स्वयंसेवक झुंजले. त्या घोर आपत्तींतून भारतांत आलेल्या पंजाबी आणि सिंधी बांधवांचे पुनर्वसनाचे प्रश्न उत्पन्न झाले तेव्हां अखिल भारतांतून मोठ्या प्रमाणावर निधि आणि कपडे गोळा करून त्यांच्या साहाय्यार्थ देण्यांत आले. विविध उद्योगधंद्यांतून त्यांची व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पंजाबमधील हे प्रश्न हातावेगळे होतात न होतात तों पूर्व बंगालमधून हिंदूंना बाहेर पडावें

लागलें. त्या वेळीं संघानें वास्तुहारा साहाय्य समिति स्थापन करून त्या प्रश्नांच्या सोडवणुकींतील कर्तव्याचा वांटा उचलला. त्याच्या पुढच्याच वर्षी बिहारमध्ये मोठा दुष्काळ पडला. तेथेंहि संघ धांवून गेला. त्यानंतर आंध्र प्रांतांतील रायल सीमा भागांत दुष्काळानें ठाण मांडलें. तेथेंहि संघस्वयंसेवकांनीं त्या आपत्तीशीं झुंज घेतली. या विविध प्रसंगीं संघाकडे आपलें साहाय्य देऊन राष्ट्रीय आपत्तींचे निवारणांत सहभागी असलेल्या महाराष्ट्रीय जनतेला या घटना विदित आहेत

## महाराष्ट्रांतील दुष्काळ

सर्व देशभर अशा आपत्ति येत असतांना १९५२–५३ या वर्षी महाराष्ट्राची पाळी आली. नगर, सोलापूर इत्यादि आठ जिल्ह्यांत पडलेला दुष्काळ संपतो न संपतो तोंच रत्नागिरी जिल्ह्यावर कोसळलेली अतिवृष्टि नि किडीनें नंतर झालेली वासाडी या गोष्टी महाराष्ट्राच्या वांटयास गतवर्षी आल्या. दूर असलेल्या प्रांतांसाठीं साहाय्य पाठविणें वेगळें आणि आपल्यासमोर स्वतःवर आणि आपल्या आप्तबांधवांवर तत्सदृश संकट कोसळलेलें पाहणें वेगळें. दूर अंतरावरील महान् आपत्तीपेक्षां जवळचें लहानसें संकटहि मनुष्यस्वभावास किती भयानक वाटतें याचा अनुभव सर्वांना आहे. भारताच्या विविध प्रांतांना सोसाव्या लागलेल्या यातनांची अल्प कल्पना महाराष्ट्राला यावी येवढयासाठीं कीं काय न कळे, पण हें संकट महाराष्ट्राच्या दैवांत आलें. वास्तविक महाराष्ट्रांतील कांहीं जिल्हे हे आलटून पालटून दुष्काळाच्या तडाख्यांत नेहमींच सांपडलेले असतात. परंतु कोंकणचे तीन जिल्हे आणि कोल्हापूर जिल्हा सोडून उरलेल्या आठ जिल्ह्यांमध्यें एकाच वेळीं मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडण्याची ही पाळी सुमारें ३० वर्षांनंतर आलेली होती. १९५२–५३ च्या या दुष्काळांत आठ जिल्हे मिळून सुमारें पंचावन्न तालुक्यांतील ४५०० खेडयांतील सुमारें बेचाळीस लाख माणसें आपापल्या गुराढोरांसह या आपत्तींत सांपडलीं होतीं.

महाराष्ट्राच्या या आठ जिल्ह्यांपैकीं सोलापूर व नगर या जिल्ह्यांत दुष्काळाची तीव्रता सर्वांत अधिक होती. या जिल्ह्यांच्या खालोखाल अथवा तितकीच तीव्रता धुळें जिल्ह्यांतील धुळें, शिंदखेडें आणि पारोळें या तालुक्यांत होती. सोलापूरला लागून असलेला पुणें जिल्ह्यांतील इंदापूर तालुक्याचा निरा कॅनॉल–खालीं नसलेला भाग, सातारा जिल्ह्यांतील खटाव आणि माण तालुके यांतहि दुष्काळाची तीव्रता फारशी कमी नव्हती. जळगांव जिल्ह्यांत एकूण एक हजारांवर गांवें दुष्काळी म्हणून जाहीर झालीं होतीं. तथापि तेथील तीव्रता इतकी टोकाची नव्हती. नाशिक आणि सांगली या जिल्ह्यांतीलहि परिस्थिति सोलापूर, धुळें यासारखी अगदीं परिसीमेला जाऊन पोहोंचलेली नव्हती.

महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीची कल्पना रा. स्व. संघाच्या ठिक-ठिकाणच्या कार्यकर्त्यांना वेळोवेळीं येत होती. विशेषत: धुळें आणि शिंदखेडें या तालुक्यांतील दुष्काळी परिस्थिति ऑगस्ट महिन्यांतच विशेष तीव्र झाली. धुळें जिल्ह्यांतील या परिस्थितीला तोंड देण्यासाठीं दि. २० सप्टेंबर १९५२ या दिवशीं धुळें शहराचे संघचालक डॉ. के. म. दुगल यांनीं धुळें तालुका दुष्काळ निवारण समिति स्थापन करून दुष्काळपीडितांची दखल घेणें, त्यांना धान्य, कपडे, पैसे इत्यादि रूपांनीं साहाय्य देणें या कामास प्रारंभ केला. धुळें जिल्ह्या-सारखीच सोलापूर जिल्ह्याची परिस्थिति होती. सोलापूर जिल्ह्यांतील मंगळवेढें, करमाळें, माढें इत्यादि तालुक्यांत अवर्षण नित्याचें असतें. गेल्या दोन तीन वर्षांत तेथेंहि पावसाची हाकाटीच होती. त्यांत यंदाचे सालीं पावसाचा थेंबहि न पडल्यानें मोठी शोचनीय स्थिति झाली. नोव्हेंबर १९५२ मध्यें संघाचे स्वयंसेवक भार-तीय गोहत्या निरोध आंदोलनांत सह्या गोळा करण्यासाठीं खेडोपाडीं गेले. त्या वेळीं ही शोचनीय परिस्थिति ध्यानांत आली. घरादारांना कड्या लावून भोंवतीं दगड रचून अथवा कडीवर शेणाचा गोळा लिंपून लोक निघून गेलेले होते. संघाच्या कार्यकर्त्यांनीं सोलापूर जिल्ह्यांतील परिस्थिति जिल्हा संघचालक डॉ. भा. वा. मुळे यांच्या कानीं घातली. परिस्थिति अधिक सूक्ष्मपणें समजावून घेण्यासाठीं संघकार्यकर्त्यांनीं या जिल्ह्यांतील १७५ गांवांची पाहणी केली. त्या पाहणींत हजारों लोक निराधार असलेले आढळले; सुमारें दहा हजार गुरें तोंपर्यंत चाऱ्याचे अभावीं मरण पावलीं असल्याचें, कित्येक हजार कसायांच्या स्वाधीन करण्यांत आल्याचेंहि त्यांच्या निदर्शनास आलें.

या परिस्थितींत दुष्काळी कामें तांतडीनें सुरू करणें हाच उपाय होता. एवढ्यासाठीं मंगळवेढें तालुक्याचे संघचालक श्री. रा. ग. करंदीकर यांनीं राज्यस्व मंत्री श्री. भाऊसाहेब हिरे यांची दि. १ डिसेंबर १९५२ या दिवशीं भेट घेऊन परिस्थितीचें गांभीर्य त्यांच्या नजरेस आणलें. त्याच सुमारास डॉ. भा. वा. मुळे यांनींहि ना. हिरे यांच्या सोलापूर येथील मुक्कामांत त्यांची भेट घेऊन सोलापूर जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थितीची आंकडेवारी त्यांच्या-समोर ठेवली. दुष्काळाच्या आपत्तीचें कायमचें निराकरण व्हावें म्हणून काय उपाययोजना करावी याविषयीं अभिप्राय देण्यासाठीं भारत सरकारनें नेमलेल्या राममूर्ति कमिशनपुढें धुळें मुक्कामीं डॉ. दुगल यांनीं साक्ष देऊन धुळे जिल्ह्याच्या दृष्टीनें कांहीं कायम स्वरूपाच्या विधायक सूचना केल्या.

## महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीची स्थापना

धुळें, सोलापूर या जिल्ह्यांप्रमाणेंच पुणें, सातारा आणि नगर या जिल्ह्यां-

तील संघकार्यकर्त्यांना दुष्काळाची हीच तीव्रता आढळून आली. या ठिकठिका-णच्या कार्यकर्त्यांनीं आपापल्या परीनें परिस्थितीला तोंड कसें द्यावें याचा विचार करून कांहीं स्थानिक उपाययोजनाहि आंखली. तथापि ही परिस्थिति जवळ जवळ सर्व प्रांतभर असल्यानें यावर प्रांतिक स्वरूपाची उपाययोजना करणें अवश्य होतें. या पांचहि जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनीं सांगली येथें प्रांतसंघचालक श्री. का. भा. लिमये यांना आणि पुणें येथें प्रांतप्रचारक श्री. ब. ना. भिडे यांना त्याबद्दल कळविलें. १९५२ च्या डिसेंबर महिन्यांतील शेवटच्या आठवड्यांत रा. स्व. संघाच्या जिल्हा परिषदा ठिकठिकाणीं भरल्या. सातारा, सोलापूर, धुळें या जिल्हा परिषदांत रा. स्व. संघानें दुष्काळ विमोचन कार्य हातीं घ्यावें असे ठराव झाले. पुणें जिल्हा परिषद दि. २९, ३०, ३१ डिसेंबर १९५२ या दिवशीं अरण्येश्वर येथें भरली असतांना प्रांतसंघचालक श्री. का. भा. लिमये हे तेथें उपस्थित होते. तेथें निर-निराळ्या जिल्ह्यांतील परिस्थितीबाबत विचारविनिमय होऊन रा. स्व. संघानें महाराष्ट्र दुष्काळ विमोचनाचें कार्य एक क्षणाचाहि विलंब न लावतां सुरू करावें असा आदेश त्यांनीं दिला. दि. ७-१-५३ या दिवशीं पुणें येथें संघाच्या अधि-काऱ्यांची बैठक होऊन कार्यास सुसूत्रपणा आणण्यासाठीं पुढील सदस्यांची महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समिति स्थापन करण्यांत आली.

(१) श्री. का. भा. लिमये, प्रांतसंघचालक; अध्यक्ष.
(२) श्री. ब. ना. भिडे, प्रांतप्रचारक.
(३) श्री. मो. नी. पिंगळे, प्रांतप्रचारक.
(४) श्री. न. गो. अभ्यंकर, पुणें विभाग संघचालक.
(५) श्री. वि. गो. आपटे, पुणें शहर संघचालक.
(६) श्री. वि. वि. पेंडसे, कार्यवाह.

## कार्यारंभ

दि. ७-१-५३ या दिवशीं माननीय काशिनाथपंत लिमये यांनीं एक पत्रक प्रसिद्ध करून दुष्काळ विमोचनाच्या कार्यास मदत करण्यास आणि सहभागी होण्यास जनतेला आवाहन केलें. शिवाय दुष्काळ विमोचनाचें काम पक्षभेदातीत असल्यामुळें त्या कामांत रा. स्व. संघ सरकारसुद्धां सर्वांशीं संपूर्ण सहकार्य करील आणि तसेंच सहकार्य सरकार आणि अन्य पक्षीयांनीं संघास द्यावें अशीहि विनंति त्यांनीं त्या पत्रकांत केली.

याच दिवशीं महाराष्ट्र प्रांतप्रचारक श्री. ब. ना. भिडे यांनीं निरनिराळ्या जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांना पत्रें पाठवून निधि, कपडे, धान्य इ. जमवून दुष्काळ विमोचन कार्यास प्रारंभ करण्यास सांगून खालीलप्रमाणें कामें करण्यास सुचविलें

(१) मदतकेंद्रें चालविणें, ज्यांना काम करून पैसा मिळवितां येत नाहीं अशा दुबळ्या लोकांना, म्हाताऱ्यांना, मुलांना अन्न देणें, दूध देणें, अवश्य त्यांना कपडे देणें.

(२) काम करूं शकतील त्यांना काम मिळवून देणें, त्यासाठीं आपण स्वत: कांहीं कामें योजून, सरकारी मदत मिळेल तेवढी घेऊन कामाची व्यवस्था करणें.

(३) सरकारी रीत्या जीं कामें काढलीं जातील त्या कामांवर लोकांची सोय लावून देणें.

(४) अन्य आवश्यक तें सर्व करणें.

## मदत-कार्यास सुरुवात

दि. ७-१-५३ ला समितीची रीतसर स्थापना पुणें शहरांत होऊन लागलीच समितीच्या प्रत्यक्ष मदत कार्यास प्रारंभ झाला. ८५१ अ, सदाशिव आणि ७५१ सदाशिव या दोन ठिकाणीं समितीचें कार्यालय सकाळसंध्याकाळ काम करूं लागलें. पुणें शहराजवळ येरवडा गांवांत नगर जिल्ह्यांतील कांहीं दुष्काळ-पीडित येऊन मोकळ्या मैदानावर राहात असल्याचें वृत्त आल्याबरोबर संघ-कार्यकर्त्यांनीं तावडतोब तेथें जाऊन त्यांची विचारपूस केली. त्यांना तीन दिवस पुणें शहरांतून ताक आणि पोळ्या गोळा करून वांटण्यांत आल्या. एवढ्या अवधींत हवेली तालुका मामलेदार यांचें तिकडे लक्ष जाऊन त्यांनीं या दुष्काळग्रस्तांना भाड्याचे पैसे देऊन गांवोगांव पाठविलें.

एका बाजूस प्रत्यक्ष मदत कार्य सुरू झालें. दुसऱ्या बाजूस निधि, धान्य इत्यादि गोळा करण्याच्या दृष्टीनें जनतेला आवाहन करण्यासाठीं पुणें शहरांत शनिवारवाड्यासमोर नागरिकांची सभा बोलाविण्यांत आली. तेथें **श्री. व. ना. भिडे, श्री. न. गो. अभ्यंकर, श्री. वि. गो. आपटे, श्री. र. ज. क्षीरसागर, श्री. बाळासाहेब वाडेकर** इत्यादि वक्त्यांचीं भाषणें झालीं.

दि. २५-१-५३ या दिवशीं कल्याण येथें रा. स्व. संघाच्या प्रांतीय प्रति-निधींची सभा भरली. त्यांत महाराष्ट्रांतील दुष्काळी परिस्थितीवर चर्चा होऊन दुष्काळी अशा आठ जिल्ह्यांत कोणत्या प्रकारें काम करावें याचा विचार झाला.

## धान्य-संकलनांतील अडचणींचें सरकारकडून निरसन

समितीच्या स्थापनेनंतर दुष्काळ-विमोचनासाठीं जनतेकडून धान्य, निधि इत्यादि गोळा करण्याच्या कामास वास्तविक तांतडीनें प्रारंभ करावयाचा. परंतु त्या कामांपैकीं सर्व जनतेला सहजासहजीं देण्यासारखें म्हणजे जें धान्य तें गोळा करण्यास शिधा वांटप-पद्धति-निर्बंधाची अडचण आली. धान्य गोळा करतां येत नव्हतें अथवा तें एका जागेवरून दुसऱ्या जागीं हलविणें शक्य नव्हतें. दुष्काळ विमोचनाच्या कामापुरते हे निर्बंध सैल करावेत यासाठीं श्री. न. गो. अभ्यंकर यांनीं दि. ७-१-५३ ला पुरवठा मंत्री श्री. यशवन्तराव चव्हाण यांना पत्र लिहिलें दि. १५-१-५३ ला मुंबई येथें श्री. मोरोपंत पिंगळे यांनीं त्यांची भेट घेतली. दुष्काळविमोचनार्थ धान्य गोळा करण्यांत येणाऱ्या या अडचणी जाणून सरकारनें दि. १३-१-५३ ला विशिष्ट व्यक्ति आणि संघटना यांनीं आपापल्या जिल्हा धिकाऱ्यांकडून अनुज्ञापत्रक घ्यावें आणि त्यानुसार धान्य गोळा करून तें सरकारी गोदामांत भरावें असें पत्रक काढलें. या पत्रकानें धान्य गोळा करण्याची सोय झाली खरी, पण तेवढ्यानें भागणार नव्हतें. गोळा केलेलें धान्य सरकारच दुष्काळी भागांत जाऊन वांटणार असेल तर सरकारजवळ एक तर पुरेसें धान्य आहे तेंच त्यांनीं वाटावें, नाहींपेक्षां जनतेकडून घेऊन सरकारी गोदामांत भरलेलें धान्य दुष्काळग्रस्तांच्या हातांत जाऊन पडेलच किंवा नाहीं अथवा पडलें तर तें याच दुष्काळांत पडेल किंवा नाहीं असा संशय जनतेमधून व्यक्त होऊं लागला. अशा स्थितींत धान्य देण्यास जनता तयार होईना. बिहार दुष्काळाच्या वेळीं रा. स्व. संघानें पुणें, मुंबई आणि महाराष्ट्रांतील अन्य ठिकाणांहून गोळा केलेली मदत संघाच्या नांवानें बिहारांत पोहोचती होऊं शकली नाहीं अथवा ती तेथील कार्यकर्त्यांच्या हातांत पडली नाहीं हें जनतेच्या डोळ्यांसमोर होतें. समितीनें गोळा केलेलें धान्य समिति निर्माण करील त्या मदत-केंद्रांवर वांटतां यावें यासाठीं समितीचे अध्यक्ष श्री. का. भा. लिमये यांनीं राज्यस्व मंत्री श्री. भाऊसाहेब हिरे यांची दि. २०-१-५३ ला मुंबई सचिवालयांत भेट घेतली. या भेटीचा उपयोग होऊन समितीनें जमा करून सरकारी गोदामांत भरलेलें धान्य समिति सांगेल त्या जिल्ह्यांत, म्हणेल त्या ठिकाणीं समितीस परत देण्याचें आश्वासन सरकारनें दिलें. त्याप्रमाणें नंतर समितीस लेखी उत्तर आलें. ( सरकारी पत्र क्रमांक 716 / 916 – II – Civil Supplies Department, Dated 3–2–1953).

## धान्य, पैसे, कपडे इत्यादींचें संकलन

सरकारच्या या धोरणानें कार्यकर्त्यांना उत्साह येऊन धान्य, पैसे, कपडे

इत्यादि गोळा करण्यास वेगानें प्रारंभ करण्यांत आला. दि. ११-१-५३ रविवारीं मुंबईतील स्वयंसेवकांनीं एकाच दिवसांत ७५ हजार कपडे आणि रु. १,०००/- रोख जमा केले. पुणें शहरांत दि. १-२-५३ ला धान्य गोळा करण्यास प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशीं ३० पोतीं धान्य आणि ७ हजार कपडे जमले. मुंबई-पुणें या शहरांचें अनुकरण अन्यत्र होऊन दुष्काळ नसलेल्या जिल्ह्यांतून अशी मदत गोळा करण्यास प्रारंभ झाला. इतकेंच नव्हे तर दुष्काळी भागांतीलहि सधन लोकांकडून धान्य, कपडे, पैसे इत्यादींची मदत जमा करण्यास सुरुवात झाली. प्रत्येक जिल्ह्यांत ही जमा कशी झाली हें खालील कोष्टकांत दर्शविलें आहे.

## ऑगस्ट १९५३ पर्यंतचें संकलन

| अ. न. | जिल्हा | निधि रुपये | धान्य पोतीं | गूळ ढेपी | कपडे संख्या | औषधें रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | * मुंबई | ६०५३ | १४१ | | १७५००० | |
| २ | ठाणें | ४४२८ | १० | | १०००० | |
| ३ | कुलाबा | १६७३ | १५ | | ३००० | |
| ४ | रत्नागिरी | ७४९ | १० | | १००० | |
| ५ | कोल्हापूर | २७५ | ५ | | ५५० | ४०० |
| ६ | सांगली | ११५६ | १७ | ५ | ८००० | |
| ७ | सातारा | १७८ | १० | | ११२५ | ५८७ |
| ८ | सोलापूर | ११५२ | २५ | १ | ३००० | |
| ९ | पुणें (जिल्हा) | ८४५ | ३५ | १० | ४५०० | |
| १० | पुणें शहर | १११२५ | ६५ | २८ | ५०००० | |
| ११ | नगर | ११३३ | २२ | ९ | ९१५ | १०० |
| १२ | नाशिक | २३१ | २५ | — | १५०० | |
| १३ | जळगांव | १६५ | १४ | — | ३१० | |
| १४ | धुळें | १०३८ | १२ | — | ५००० | |
| | एकूण | ३०२०१ | ४०६ | ५३ | २६३९०० | १०८७ |

* ही जमा अकाल विमोचन समिती मुंबई यांचेकडून झालेली आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीनें महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समिति स्थापन झाली असल्याकारणानें आणि प्रचलित सरकारचा संघविषयक दृष्टिकोन जनतेला विशेषतः सरकारी नोकरांना माहीत असल्यामुळें सरकारी संस्था, बँका, फॅक्टरीज् इत्यादि ठिकाणच्या बऱ्याच मोठ्या मदतीचा ओघ संघ-निर्मित अशा या समितीच्या कार्याकडे वळूं शकला नाहीं. तथापि कित्येक लोकांनीं आवर्जून "आम्हांस तुमच्याकडे पैसे द्यावयाचे आहेत" असें म्हणून गुपचूप पैसे आणून दिले. महाराष्ट्राचे वयोवृद्ध नेते श्री. रामभाऊ मंडलिक यांनीं आजारीपणांत असतांनाच केसरी वृत्तपत्रांत प्रकट पत्र लिहून समितीच्या निधीस रु. ५००/- ची देणगी दिली. तसेंच नागपूरचे लोकप्रिय पुढारी आणि संघचालक श्रीमंत बाबासाहेब घटाटे यांनींहि समितीकडे रु. २५०/- ची देणगी अगत्यपूर्वक पाठवून दिली.

## औषधी कारखान्यांची मदत

धान्य, पैसे, कपडे यांचेबरोबर औषधेंहि गोळा करण्यांत आलीं. त्यासाठीं महाराष्ट्रांतील विविध आयुर्वेदीय कारखान्यांनीं आपापली मदत पाठविली ती पुढीलप्रमाणें :-

| संस्थेचें नांव | किती रुपयांचीं औषधें | कोठें पाठविलीं |
|---|---|---|
| १ आयुर्वेद रसशाळा, पुणें. | १५२-३-६ | नाशिक, पुणें, नगर. |
| २ स्वास्तिक लॅबोरेटरी, वाई. | ७५-०-० | जळगांव, धुळें. |
| ३ श्रीधूतपापेश्वर इंडस्ट्रीज लि. पनवेल. | १०१-०-० | जळगांव, धुळें. |
| ४ सांडू ब्रदर्स, चेंबूर. | १५-०-० | सातारा. |
| ५ झंडू फार्मास्युटिकल वर्क्स, मुंबई. | ४४-८-० | सोलापूर. |
| ६ बेंगॉल इम्युनिटी, कलकत्ता. | ३००-०-० | सोलापूर. |
| ७ पुरोहित फार्मसी, कोल्हापूर. | १००-०-० | सोलापूर. |
| ८ भिल्ल सुधार समिति, धुळें. | १००-०-० | धुळें. |
| ९ खाजगी डॉक्टर्स. | २००-०-० | ठिकठिकाणीं. |
| एकूण | १०८७-११-६ | |

विविध डॉक्टर्सनीं केलेल्या साहाय्यामध्यें पुण्यांतील श्री. पांडुरंगशास्त्री देशपांडे वैद्य, डॉ. शं. श्री. नामजोशी, डॉ. ना. गं. चाफेकर, वाईचे प्रसिद्ध डॉ. द. ना. गोखले यांच्या सा ाय्याचा विशेष उल्लेख केला पाहिजे.

## कलावंतांचें साहाय्य

निधि गोळा करण्या । कामांत महाराष्ट्रभर ठिकठिकाणच्या कलावंतांनीं आपापली सेवा निरपेक्षपणें रुजू केली. यामध्यें पुण्यांतील विकास मंडळ, सुप्रसिद्ध संगीत-दिग्दर्शक श्री. सुधीर फडके, प्रसिद्ध गायक प्रल्हादबुवा जोशी, नृत्य-गायिका श्रीमती रोहिणी भाटे, श्रीमती मालती पांडे यांचें विशेष साहाय्य झालें. हठयोगी स्वामी देवमूर्ति यांनीं आपले शक्तीचे प्रयोग करून समितीस आर्थिक साहाय्य मिळवून दिलें. दुष्काळाच्या मदतीसाठीं ठिकठिकाणीं जे करमणुकीचे कार्यक्रम झाले, त्यांत पुणें आणि मुंबई येथील झालेल्या कार्यक्रमांवरील करमणुकीच्या कराची सूट सरकारकडून मिळाली. कल्याण, सांगली, नगर, इत्यादि ठिकाणीं झालेल्या कार्यक्रमांस हा कार्यक्रम संघीयांनीं योजलेला आहे या प्रमुख कारणाखातरच करमणूक-कराची सूट मिळूं शकली नाहीं.

## मदत-केंद्रें चालविण्याच्या दृष्टीनें पाहणी

धान्य, पैसे, कपडे यांची जमवाजमव चालूं असतांनाच समितीचे कार्यकर्ते ठिकठिकाणीं जाऊन परिस्थितीची पाहाणी करून येत होते. श्री. ब. ना. भिडे, श्री. वि. गो. आपटे, श्री. ब. ग. देवकुळे हे पुणें जिल्ह्यांत इंदापूर येथें जाऊन मदत-केंद्रें सुरू करण्याच्या दृष्टीनें पाहणी करून आले. धुळें जिल्ह्यांत श्री. नानाराव ढोबळे यांचें फिरणें सारखें चालूच होतें. इंदापूर येथील श्री. रमाकांत पराडकर, श्री. वामनराव गोसावी, श्री. दिगंबरराव वाघमोडे यांनीं त्या तालुक्यांतील ६५ गांवांची पाहणी केली. सातारा जिल्ह्यांत खटाव तालुक्यांत श्री. भरताग्रज मळेकर यांनीं एकट्यानींच पायीं ५३ गांवांची पाहणी केली. सोलापूर जिल्ह्यांत डॉ. भा. वा. मुळे यांनीं आपल्या उद्योगांतून बहुमोल असा वेळ काढून श्री. रामभाऊ गोडबोले आणि श्री. का. वा. पवार यांना बरोबर घेऊन आठ दिवसांत मंगळवेढें, पंढरपूर, माढें, टेंभुर्णी, सापटणें, बांगी, मांगी, करमाळें इत्यादि ठिकाणीं जाऊन दुष्काळग्रस्तांची विचारपूस करून त्याचा विस्तृत अहवाल सोलापूरचे जिल्हाधिकारी श्री. बोगा यांना दिला.

## मदत-केंद्रांची स्थापना

निधि संकलन आणि पाहणी चालूं असतांनाच समितीच्या स्थापनेपासून

## एप्रिल १९५३ पर्यंत कार्यात झालेली वाढ

समितीच्या अध्यक्षांच्या दौऱ्यानंतर मदत–केंद्रांची संख्या वाढवून कार्याचें क्षेत्र वाढविण्यांत आलें. शाळा आणि महाविद्यालयें यांतील विद्यार्थ्यांनीं परीक्षे–नंतरच्या सुटींत दुष्काळ विमोचनाच्या कार्यात सहभागी व्हावें अशी त्यांना विनंती करण्यांत आली. या विनंतीला मान देऊन अनेकांनीं काम करण्याची तयारी दर्शविली व त्याप्रमाणें त्यांची योजना झाली. एप्रिल १९५३ अखेरपर्यंत वाढलेल्या कार्याचें स्वरूप कोष्टकरूपानें खालीलप्रमाणें आहे.

### एप्रिल १९५३ अखेरच्या केंद्रांची संख्या आणि ठिकाणें

| अ. नं. | जिल्ह्याचें नांव | केंद्रांची संख्या | केंद्रांचीं ठिकाणें |
|---|---|---|---|
| १ | पुणें | ३ | ता. इंदापूर–इंदापूर, न्हावी, कळाशी |
| २ | सोलापूर | ११ | ता. करमाळे–करमाळे, बांगी, वरकुटे, हिरवे, खडकी<br>ता. माढे– टेंभुर्णी, निमगांव, घोटी, अहेरगांव<br>ता. मंगळवेढें–मंगळवेढें<br>ता. बार्शी–येडशी |
| ३ | धुळें | ४ | ता. धुळें–पूरमेपाडा<br>ता. शिदखेड–सुराय<br>ता. पारोळें–पारोळे<br>ता. अंमळनेर–पातोंडे |
| ४ | जळगांव | २ | ता. जळगांव–जळगांव<br>ता. भुसावळ–बादवड |
| ५ | नाशिक | ५ | ता. येवलें–नेऊरगांव, नागडे अंगणगांव, एरंडगांव, देवठाण |
| ६ | नगर | २ | ता. राहुरी–देवळाली.<br>ता. पारनेर–पारनर |
| ७ | सातारा | १ | ता. खटाव–मायणी |
| ८ | सांगली | २ | ता. जत – जत, वज्रचौंडे |
| | एकूण | ३० | |

## प्रासंगिक भोजनें

याच काळांमध्यें निरनिराळ्या जिल्ह्यांतून दुष्काळग्रस्तांना निदान सणावारीं त्यांतल्या त्यांत गोड-धोड खावयास घालावें या बुद्धीनें इंदापूर, टेंभुर्णी, करमाळें, मंगळवेढें, येडशी, पातोंडे इत्यादि ठिकाणच्या दुष्काळी कामावरच्या मजुरांना आणि आसपासच्या खेड्यांतील सहस्रावधि शेतकऱ्यांना खीर-पोळीचें जेवण देण्यांत आलें. त्याचा तपशील असा-

### ऑगस्ट ५३ अखेर झालेलीं प्रासंगिक भोजनें

| अ. | जिल्हा | गांव | किती वेळां | किती लोकांना | भोजन प्रकार | प्रमुख पाहुणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणें | तरंगवाडी | २ | ५००० | पोळ्या गव्हाची खीर | वि. गो. आपटे, वि. मा. देशमुख, संत गयाबाई मनमाडकर, मामलेदार श्री. सोनार, मुख्याध्यापक श्री. केळकर, डॉ. जोशी, श्री. जाचक |
| | | न्हावी | १ | १००० | पोळ्या | |
| | | | ३ | ६००० | | |
| २ | सोलापूर | टेंभुर्णी | ७ | १०६०० | गव्हाची खीर | श्री. माणिकचंद वीरचंद |
| | | करमाळें | ४ | १३२०० | " " | |
| | | मंगळवेढें | ३ | २३०० | " " | |
| | | येडशी | १ | २००० | ज्वारीची खीर | |
| | | | १५ | २८१०० | | |
| ३ | धुळें | सुराय | १ | १५०० | गव्हाचा शिरा भाजी भाकरी | मे. मामलेदार श्री. नानासाहेब शुक्ल, डॉ. दुगल, डॉ. कालिदास, श्री. रामभाऊ धर्माधिकारी |
| | | पातोंडे | ९ | ९२०० | पुरण पोळी, खीर | |
| | | | १० | १०७०० | | |

मागील पानावरून चालू

| अ | जिल्हा | गांव | किती वेळां | किती लोकांना | भोजन प्रकार | प्रमुख पाहुणे |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | जळगांव | बोदवड | ४ | ४४० | पुरणपोळी, पापडया, लाडू इ | श्री. सोनार, श्री. बडगुजर श्री. किरात-सिंह तारासिंह |
| | | रावेर | १ | ४०० | पुरणपोळी | |
| | | | ५ | ८४० | | |
| ५ | नगर | राहूरी | ३ | २३०० | कढी भात, गव्हाची खीर, गुळ-पोळी. | पुण्याचे महापौर ग. म. नलावडे, रामभाऊ तेलंग, म्यु. सभासद, पुणें, न. गो. अभ्यंकर अण्णासाहिब रेगे नानासाहेब खेर. |
| | | कर्जत | १ | ५०० | पिठलं-भाकरी | |
| | | | ४ | २८०० | | |
| | सातारा | हिंवरवाडी | १ | ६०० | भाकरी-गूळ | बॅ. करंदीकर, श्रीरंग जाधव |
| | | मायणी | १ | २०० | ,, | |
| | | दरुज धरण | १ | ४०० | ,, | |
| | | | ३ | १२०० | | |
| ७ | सांगली | चोरोची | १ | १००० | पोळी-गूळ | दि. म. पुराणिक म्यु. सभासद, सांगली. |
| | | | १ | ६०० | ,, ,, | |
| | | | २ | १६०० | | |
| | एकूण | १७ | ४२ | ५१२४० | | |

## अन्नछत्रें

मे, जून, जुलै हे महिने म्हणजे दुष्काळाच्या अत्यधिक तीव्रतेचे महिने. या दिवसांत समितीतर्फे जळगांव जिल्ह्यांत बोदवड येथें, धुळें जिल्ह्यांत सुराय, पातोंडे येथें, नगर जिल्ह्यांत राहुरी येथें, सोलापूर जिल्ह्यांत सांगोलें येथें अशीं पांच अन्नछत्रें चालविण्यांत आलीं. याशिवाय या सर्व ठिकाणांतून मिळून आतां-पर्यंत ६९३५० लोकांना जेवण देण्यांत आलें. कोष्टकरूपानें हें खालीलप्रमाणें दाखवितां येईल.

### ऑगस्ट ५३ अखेर चालविण्यांत आलेलीं अन्नछत्रें

| अ. | जिल्हा | ठिकाण | कोठपासून कोठपर्यंत | जेवणारांची दैनिक सरासरी | जेवलेल्यांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर | टेंभुर्णी | १ एप्रिल ते ३० जुलै | २०० | २४००० |
| २ | धुळे | पातोंडे | ५ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट | ७० | १४७० |
| | | सुराय | २१ मे ते २० सप्टेंबर | ३०० | ३६००० |
| ३ | जळगांव | बोदवड | २४ मे ते ८ जुलै | ४५ | २२५० |
| ४ | नगर | राहुरी | १७ मे ते ३० जून | १४० | ५६३० |
| | एकूण | ५ | | ७५५ | ६९३५० |

या अन्नछत्रांमध्यें बोदवड येथील अन्नछत्रासाठीं गांवकऱ्यांनीं मोठीच मेहनत घेतली. सुराय येथील अन्नछत्र धुळें रेड क्रॉस सोसायटी आणि समिति या दोघांच्या वतीनें चाललेलें होतें. टेंभुर्णी येथील अन्नछत्राचें वैशिष्टय असें कीं, तेथें भाकरी वांटण्यासाठीं सोलापूराहून निरनिराळ्या पेठांनीं एक एक दिवस निवडून घेतला होता आणि त्या त्या पेठांतून प्रतिदिनीं ३०० भाकऱ्या टेंभुर्णीला एस्. टी. च्या मोटारनें पाठविण्यांत येत असत.

नाशिक जिल्ह्यांतील येवले येथील संघचालक आणि स्थानिक दुष्काळ विमोचन समितीचे अध्यक्ष श्री. शं. द. भांबेरे वकील, यांनीं श्री. तनपुरे महाराज यांच्या विनंतीवरून श्री. तनपुरे महाराज यांच्या नांवानें चालविण्यांत आलेल्या अन्नछत्राची व्यवस्था पाहण्याचें पत्करलें. श्री. तनपुरे महाराज यांनीं अन्नछत्राला लागणारें धान्य, पैसा इ. पुरवावा आणि श्री. शं. द. भांबेरे यांनीं रा. स्व. संघाच्या आणि अन्य स्थानिक कार्यकर्त्यांच्या साहाय्यानें अन्नछत्राची प्रत्यक्ष व्यवस्था पाहावी असें ठरलें होतें. तथापि कामास प्रारंभ झाल्यानंतर श्री. तनपुरे महाराज यांच्याकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष धान्याची अथवा पैशाची मदत येऊं शकली नाहीं आणि धान्य, जळण, पैसा यांसुद्धां अन्नछत्राची सर्व व्यवस्था रा. स्व. संघालाच करावी लागली आणि ती संघानें स्थानिक जनतेच्या साहाय्यानें आनंदानें केलीहि. या ठिकाणीं प्रतिदिनीं सुमारें ८०० लोक जेवीत होते. दि. २० एप्रिलपासून हें अन्नछत्र अशा रीतीनें चालविल्यावर दि. २ जूनला तें बंद करण्यांत आलें. त्यानंतर श्री. तनपुरे महाराज यांनीं तें कांहीं दिवस स्वतःच्या जबाबदारीवर चालविलें.

## कॉलऱ्याची सांथ आणि अन्य वैद्यकीय मदत

दुष्काळ म्हटला कीं, पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळें अखेरी अखेरीला कॉलऱ्याची सांथ येतेच. त्याप्रमाणें मे, जून महिन्यांमध्यें नगर जिल्ह्यांत कॉलरा सुरू झाला. पंढरपूरच्या एकादशीनंतर सोलापूर जिल्ह्यांत आणि अन्यत्रहि कॉलऱ्याची सांथ मोठ्या प्रमाणात उद्‌भवली. समितीच्या कार्यकर्त्यांनीं या सांथीला आळा घालण्यासाठीं योग्य ती मेहनत घेतली. विशेषतः नगर जिल्ह्यांत राहुरी येथें आणि सोलापूर जिल्ह्यांत टेंभर्णी येथें रात्रंदिवस परिश्रम करून सुमारें दहा हजार लोकांना कॉलऱ्याची लस टोंचण्यांत आली.

याशिवा दैनंदिन कामामध्यें अनेकांना समितीतर्फे औषधोपचार करण्यांत आले. अगदीं दूरच्या एकाकी खेड्यांतून जाऊन आसन्नमरण रुग्णांना औषधोपचार करून वांचविण्यांत आल्याचेहि प्रसंग घडले. औषधोपचार केलेल्यांची एकूण संख्या ८७४१ आहे.

## ऑगस्ट १९५३ अखेरच्या कामाचा आढावा

याच काळांत मदत-केंद्रांचें क्षेत्रहि व्यापक होत होतें. ऑगस्ट ५३ अखेर निरनिराळ्या जिल्ह्यांत कोठें नि किती मदत-केंद्रें चालू होतीं त्याचा तपशील पुढील कोष्टकांत दिला आहे.

## ऑगस्ट ५३ अखेर मदत-केंद्राची संख्या आणि ठिकाणें

| अ. | जिल्हा | केंद्रांची संख्या | ठिकाणें |
|---|---|---|---|
| १ | पुणें | ७ | पुणें शहर<br>इंदापूर तालुका–इंदापूर, न्हावी, कळाशी.<br>शिरुर तालुका—राऊतवाडी, दहिवडी, रांजणगांव. |
| २ | सोलापूर | १६ | करमाळें तालुका–करमाळें, वांगी, वरकुटे, हिवरे, खडकी.<br>माढें तालुका–टेंभुर्णी, निमगांव, मोटी, अहेरगांव.<br>मंगळवेढें तालुका–मंगळवेढें, डोंगरगांव, अकोले, खोमनाळ, ढवळस.<br>बार्शी तालुका–येडशी.<br>सांगोले तालुका–सावे. |
| ३ | धुळें | ८ | धुळें तालुका–धुळें, पुरमेपाडा.<br>पारोळे तालुका–पारोळे.<br>अंमळनेर तालुका–अंमळनेर, पातोंडे.<br>शिंदखेड तालुका–सुराय, रामी, दोंडाईचें. |
| ४ | जळगांव | २ | जळगांव तालुका–जळगांव.<br>भुसावळ तालुका–बोदवड |
| ५ | नगर | ३ | राहुरी तालुका–राहुरी, देवळाली.<br>पारनेर तालुका–पारनेर. |
| ६ | सातारा | १ | खटाव तालुका–मायणी. |
| ७ | सांगली | २ | जत तालुका–जत, वजरवाडे |
| ८ | नाशिक | ६ | येवले तालुका–° येवलें, ° नेऊरगांव, ° देवठाण, ° येरंडगांव, ° अंगणगांव, ° नागडें. |
| | एकूण | ४५ | |

टीप :–° या केंद्रांवरील दूध वांटप मध्यवर्ती दुष्काळ निवारण समितीच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्यानें केलें जात असे.

अग्रलेख लिहून विद्यार्थिवर्गानें समितीच्या कार्यांत अधिकाधिक भाग घ्यावा दुष्काळ-निवारणाचें हें कार्य रा. स्व. संघ करतो म्हणून त्या कामावर जातीयतेचा छाप मारून त्याच्याशीं सहकार्य न करणें हें योग्य नाहीं असें त्यांत प्रतिपादिलें. पुण्यांतील 'लोकशक्ति' पत्रानेंहि पाठोपाठ आपल्या अंकांत रा. स्व. संघाच्या दुष्काळ विमोचन समितीनें पुण्यांत निधि, धान्य संकलन करण्यांत चांगल्या प्रकारें काम चालविल्याचें मान्य केलें. त्याचप्रमाणें निरनिराळ्या कार्यक्रमांचीं छायाचित्रेंहि त्यांनीं मागवून घेऊन छापलीं.

वृत्तपत्रीय सहकार्यांत पुण्याच्या दैनिक भारतचा विशेष उल्लेख करावा लागेल. समितीनें चालविलेल्या मदत-केंद्रांवर आपले प्रतिनिधि पाठवून तेथील माहिती जनतेसमोर ठेवून आणि अग्रलेखांतूनहि समितीच्या कामास पाठिंबा देऊन दुष्काळ विमोचन कार्यांत मोठेंच सहकार्य त्यांनीं दिलें. मुंबईच्या 'नवशक्ति' नेंहि आपल्या स्फुटांतून समितीच्या कार्याचा परामर्श घेतला होता.

करमणुकीच्या प्रयोगांच्या जाहिराती पुण्यांतील वृत्तपत्रांनीं कित्येक प्रसंगीं विनामूल्य आणि कांहीं प्रसंगीं सवलतीच्या दरानें प्रसिद्ध केल्या.

सर्व जिल्हाधिकारी, मामलेदार आणि दुष्काळी कामावरील सरकारी अधिकारी यांचें सहकार्य सौजन्यपूर्ण आणि तत्पर होतें. मुंबई राज्याच्या मंत्र्यांपैकीं **श्री. भाऊसाहेब हिरे, श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. चांद्रेकर,** यांनीं, आणि आमदार **श्री. तुळशीदास जाधव,** व शे. का. फे. चे कार्यवाह आणि लोकसभेचे सदस्य **श्री. राजभोज** यांनीं संघाच्या मदत-केंद्रांवर येऊन कपड्यांचें वांटप केलें. कित्येक सज्जनांनीं आपल्या मोटारी, बैलगाड्या इत्यादि वाहनें वापरण्यास दिलीं. पुणें, मुंबई, सांगली, कऱ्हाड इत्यादि ठिकाणीं कांहीं धुलाई केंद्रांच्या चालकांनीं विनामूल्य वा सवलतीच्या दरानें कपडे धुवून दिले.

पुण्याचे लोकप्रिय महापौर **श्री. गणपतराव नलावडे** यांनीं राहुरी येथील अन्नछत्राचें दि. १६-५-१९५३ या दिवशीं उद्घाटन केलें. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मल्ल **श्री. श्रीरंग जाधव** यांनीं सातारा जिल्ह्यांतील म्हसवड-मायणी रस्त्यावरील दुष्काळग्रस्तांना दि. २२-४-५३ ला दिलेल्या भोजनाच्या समारंभाचें अध्यक्ष-स्थान स्वीकारलें. **ह. भ. प. सौ. गयाबाई मनमाडकर** यांनीं समितीसाठीं कुलाबा जिल्ह्यांत १५ मण तांदूळ गोळा केला आणि त्यांतून पुणें जिल्ह्यांतील इंदापूर या ठिकाणीं चैत्र शु. १५ दि. २९ एप्रिल १९५३ ला तरंगवाडी तलावाच्या कामावरील दोन हजार शेतकऱ्यांनागोडाचें जेवण दिलें. तेथें त्यांनीं रात्रीं सुश्राव्य कीर्तनहि केलें,

पुणेंकर जनतेच्या साहाय्याचें एक उत्कृष्ट उदाहरण मार्च महिन्यांत फाल्गुन वद्य ५ ला म्हणजे रंगपंचमीला दृष्टोत्पत्तीस आलें. इंदापूर येथील दुष्काळ-ग्रस्तांना जेवण देतां यावें म्हणून घरांघरांतून माणशीं एक पोळी आणि थोडा गूळ मिळावा; गूळ, पोळी आपण आपल्या हातानें ठराविक ठिकाणीं आणून द्यावी अशी विनंती जनतेला करण्यांत आली. तरंगवाडीच्या तलावावरील एक हजार मजुरांना पांच हजार पोळ्या मिळाल्या तरी पुरें असें समजून एकूण पांच हजार पोळ्यांची अपेक्षा केली होती, तेथें वीस हजार पोळ्या आणि २८ हारे गूळ जमा झाला. याच प्रकारें जळगांव, सांगली, कऱ्हाड इत्यादि ठिकाणांच्या जनतेनें मोठ्या प्रमाणांत सहकार्य केलेलें आहे. मुंबईकरांनीं दुष्काळी शेतकऱ्यांसाठीं दहा हजार पादत्राणें दिलीं.

## अन्य संस्था आणि मुंबई सरकार यांचें सहकार्य

समितीच्या कार्यास अनेक संस्थांनीं सहकार्य दिलें. महाराष्ट्रांतील बहुतेक प्रमुख औषधी कारखान्यांनीं आपलीं औषधें समितीला दिलीं हें वर नमूद केलेंच आहे. रेड क्रॉस सोसायटीच्या धुळें शाखेनें आत्मीयतापूर्वक आणि अखेरपर्यंत सहकार्य केलें. याच जिल्ह्यांतील भिल्ल सुधार समितीनेंहि चांगलें सहकार्य दिलें. राष्ट्रसेविका समितीच्या सेविकांनीं महाराष्ट्रांतील निरनिराळ्या शहरांतून निधि, धान्य आणि विशेषेंकरून लुगडीं गोळा करण्यांत मोठेंच साहाय्य केलें. पुण्यांतील 'केसरी' संस्थेनें दुष्काळनिवारणार्थ गोळा केलेल्या निधीपैकीं रु. ४०५--१--० समितीकडे दिले. महाराष्ट्राबाहेरील वृत्तपत्रांपैकीं दिल्लीचा 'ऑर्गनायझर', लखनौचा 'पांचजन्य' व नागपूरचा 'तरुण भारत' यांचा उल्लेख अवश्यमेव केला पाहिजे. हिंदुस्थान समाचार या अखिल भारतीय वृत्त-वितरण संस्थेनें समितीकडून वेळोवेळीं प्रसिध्द केलें गेलेलं वृत्त भारतांत प्रांतोप्रांतीं पाठविण्यांत जी तत्परता दाखविली तिचाही गौरवपूर्ण उल्लेख येथें करणें अवश्य आहे.

मुंबई सरकारचे राज्यस्व मंत्री **श्री. भाऊसाहेब हिरे** यांनीं दुष्काळासारख्या सार्वत्रिक आपत्प्रसंगीं आवश्यक असणाऱ्या व्यापक दृष्टिकोनांतून सरकारच्या एकूण दुष्काळ विमोचन कार्याची मांडणी केली आणि त्यांत तथाकथित 'जातीय' शिक्क्याचा उपयोग केला नाहीं. त्यांच्या या व्यापक दृष्टीमुळेंच धान्य इत्यादि गोळा करणें शक्य झालें. त्यांच्या आणि **श्री. यशवंतराव चव्हाण** यांच्या कार्यालयानें सामान्यपणें तत्परतेनें सहकार्य दिलें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

तथापि हें सहकार्य रा. स्व. संघाच्या दुष्काळ विमोचन समितीच्या कामांत रेशनिंग इत्यादींच्या अडचणी येऊं नयेत आणि सामान्यपणें दुष्ट्या जबाबदार

समितीला जे नाकारतां येणार नाहीं तें संघाच्या समितीला सहसा नाकारू नये एवढ्यापुरतें होते. म्हणजे हे सहकार्य कृतिशील (Active) नसून अकरणात्मक (Passive) होते असें म्हटलें तर तेंहि चुकीचें होणार नाही. इतर समित्यांना ज्याप्रमाणें सरकारची एक प्रकारें मान्यता होती, राज्यपाल निधींतून त्यांना आर्थिक साहाय्य देण्यांत आलें, दुष्काळी परिस्थिति कसकसें वळण घेत आहे आणि त्याविषयीं सरकारचें धोरण काय आहे याची माहिती त्या समित्यांना पुरविली गेली. महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीलाहि असेंच सापत्नभावविरहित सहकार्य मिळालें असतें तर झाली यापेक्षां कितीतरी पटींनी अधिक अशी जनतेची सेवा या समितीला करतां आली असती.

दुसरें असें की, महाराष्ट्रांतील दुष्काळी परिस्थिति, त्याविरुद्ध सरकार नि जनता यांच्याकडून केली जात असलेली उपाययोजना याबद्दल प्रसंगोपात आकाशवाणीवरून वा प्रकट सभांतून जनतेपुढें सरकारी पदाधिकाऱ्यांनीं निवेदनें केलीं. या निवेदनांत महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीसारख्या जनतेच्या ऐन गाभ्यांत जाऊन काम करणाऱ्या संस्थेच्या कार्याचा उल्लेख करणें हें सरकारचें कर्तव्य होतें; कारण सरकारचा दृष्टिकोन पक्षातीत असला पाहिजे असें तत्त्व आहे. तथापि मुंबई राज्याचे राज्यपाल आणि इतर मंत्री या कर्तव्यपालनाच्या कसोटीस उतरूं शकले नाहींत, हें खेदानें नमूद करणें अवश्य आहे.

## मध्यवर्ती समिति

सर्वपक्षीय अशी मध्यवर्ती समिति दुष्काळनिवारणार्थ काम करीत असतांना रा. स्व. संघानें स्वतंत्र रीत्या काम कां सुरू केलें हा एक प्रश्न अनेकांच्या मनांत येऊन गेलेला आहे. मध्यवर्ती समिति स्थापन करण्याच्या वाटाघाटींत रा. स्व. संघाचेहि अधिकारी होतेच. दुष्काळ निवारणाच्या कामीं मध्यवर्ती समितीसारख्या सर्वपक्षीय समितीची आवश्यकता होती हें निर्विवाद आहे. तथापि दुष्काळासारखें अत्यंत व्यापक काम कोणाहि एकाच समितीच्या हातून रेटलें जाणारें नाहीं, विशेषत: जेथें तांतडीनें निर्णय घेऊन कामास गति द्यावयाची असते तेथें अनेक पक्ष एकत्र येऊन बहुमतानें चालावयाच्या कारभारांत पुरेशी गति येऊं शकत नाहीं हा अनुभव सर्वत्र आहेच. एवढें सामर्थ्यशाली सरकार कीं ज्याचीं पगारी माणसें प्रत्येक खेडोपाडीं आहेत तें सुद्धां पुरें पडूं शकत नाहीं तर मग कोण-त्याहि एकाच समितीकडून हें काम पुरेसें रेटलें जाईल हें शक्य नव्हतें. रा. स्व. संघाच्या कार्यकर्त्यांना याची कल्पना होती. दुष्काळी जनतेला प्रत्यक्ष मदत अधिकाधिक त्वरेनें मिळण्याच्या दृष्टीनें संघानें कार्याला तांतडीनें प्रारं

करावा हीच अपेक्षा विशेषत: धुळें आणि सोलापूर जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांची होती. राष्ट्रीय आपत्तींच्या प्रसंगीं रा. स्व. संघाला कोणत्याहि कारणानें मागें राहतां येथें शक्य नाहीं. फाळणीच्या वेळीं पंजाबच्या निर्वासितांना मदत करणें, पूर्व बंगाल-निर्वासितांना मदत करणें, बिहारांतील दुष्काळी जनतेला साहाय्य करणें, आंध्र प्रांतांतील रायल सीमा भागांत धांवून जाणें हें संघाच्या दृष्टीनें स्वाभाविक कर्तव्य होतें. या विविध प्रसंगांप्रमाणेंच महाराष्ट्रांतील दुष्काळी स्थितीमध्यें या आपत्तींशीं झगडण्यासाठीं तांतडीनें कामास लागणें हें स्वभावसिद्धच होतें.

समितीचे अध्यक्ष **श्री. काशिनाथपंत लिमये** यांनीं या प्रश्नावर दिनांक १०-४-५३ च्या पत्रकांत मांडलेले विचार येथें उद्धृत करीत आहोंत. त्यांत आणखी कांहीं मुद्दे अधिक स्पष्ट केले आहेत.

"संघानें दुष्काळी लोकांना मदत देण्याचें कार्य आपल्या जबाबदारीवर सुरू केल्यामुळें तें इतक्या लवकर करतां आलें. संघानें या वेळीं संघ म्हणून कार्य केलें नसतें तर कित्येक लोकांनीं या वेळीं संघ कोठें होता असें विचारलें असतें. आज-पर्यंत ज्यांनीं हें विचारलें तीच मंडळी आज विचारीत आहेत कीं, तुम्ही संघ म्हणून हें कार्य निराळेपणानें कां करीत आहांत ? आम्हांस दुष्काळग्रस्तांस मदत करण्याचें कार्य जास्त सुकरपणें करतां येणार आहे अशा पद्धतीनें आम्ही कार्य करीत आहोंत. असें जरी आहे तरी सर्वांच्याबरोबर सहकार्य करण्याची आमची भूमिका कायम आहे. कोणींहि आम्हांस केव्हांहि हांक मारली तर शक्य असेल तेवढें सहकार्य त्यांना देण्यास आम्ही सदैव सिद्ध आहोंत. आमच्यासमोर मुख्य गोष्ट कोणती असेल तर दुष्काळग्रस्तांना जास्तींत जास्त मदत करणें ही होय."

अशा स्थितींत सर्वपक्षीय समितीची स्थापना जितकी आवश्यक होती तितकीच आवश्यकता रा. स्व. संघानें आपल्या शक्तिनुसार दुष्काळ विमोचनाचें कार्य सुरू करण्याबाबत होती. संघाच्या सामर्थ्याची पूर्ण कल्पना असतांना मध्यवर्ती दुष्काळ निवारण समितीचे घटकांना करावें लागणारें काम करूनहि जनतेची सेवा करण्यास उपलब्ध अशी बरोबरी शक्ति आपणांजवळ आहे याची रा. स्व. संघाच्या कार्यकर्त्यांना जाणीव होती. म्हणुन मध्यवर्ती समितीबरोबर झालेल्या बोलण्यांत (१) मध्यवर्ती समिति इतरांप्रमाणें रा. स्व. संघाकडे म्हणून जें कांहीं काम देईल तें काम संघाचे स्वयंसेवक मध्यवर्ती समितीला हवें त्या स्वरूपांत पार पाडतील, (२) आणि हें काम करीत असतांना रा. स्व. संघाच्या दुष्काळ विमोचन समितीला स्वतंत्रपणें दुष्काळग्रस्तांची जी सेवा करणें शक्य होईल ती सेवाहि दुष्काळ विमोचन समिति करीत राहील अशा स्वरूपावर आपण सहकार्यानें काम करूं या असें सुचविण्यांत आलें. तथापि मध्यवर्ती समितीला महाराष्ट्र दुष्काळ विमोचन

समितीनें स्वतंत्रपणें कांहीं काम करावें ही भूमिका मान्य नव्हती असें दिसतें. या बाबतींत महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समिति आणि मध्यवर्ती दुष्काळ निवारण समिति यांच्यामध्यें झालेला पत्रव्यवहार खालीं उद्धृत केला आहे. वर उल्लेखिलेल्या स्वरूपांत सहकार्यानें काम करतां यावें असें **श्री. का. भा. लिमये, श्री. न. गो. अभ्यंकर, श्री. वि. वि. पेंडसे** इत्यादींनीं बोलणें केल्यावर "आपल्या योजनेचें लेखी स्वरूप हातीं येऊं दे, मग विचार करूं" असें सुचविण्यांत आल्यावरून खालील आशयाचें पत्र प्राथमिक विचारासाठीं म्हणून **श्री. न. गो. अभ्यंकर** यांजकडून दि. ५-२-५३ ला **डॉ. धनंजयराव गाडगीळ** यांना धाडण्यांत आलें.

" महाराष्ट्रांतील दुष्काळ निवारण्याच्या कार्यांत सहभागी होणाऱ्या संस्था आणि संघटना यांचें सहकार्य संपादन करून या महत्त्वाचे कार्यास अधिकाधिक चालना देण्याची जो खटपट मध्यवर्ती दुष्काळ निवारण समिति करीत आहे तें अत्यंत महत्त्वाचें कार्य आहे. या महत्त्वाच्या कामास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा हार्दिक पाठिंबा आहे राष्ट्रीय स्वयंसेवक संघानें सुरू केलेल्या महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीला या बाबतींत काय करतां येईल याबद्दल मध्यवर्ती समितीच्या अध्यक्षांचेबरोबर माननीय **काशिनाथपंत लिमये**, मी स्वतः आणि **श्री. वि. वि. पेंडसे** यांच्या निरनिराळ्या प्रसंगीं भेटी होऊन बोलणें झालें आहे. या बोलण्यांतून संघाची भूमिका मांडण्यांत आली. मध्यवर्ती समितीला जोडल्या गेलेल्या ठिकठिकाणच्या सर्वपक्षीय दुष्काळ निवारण समित्यांवर स्थानिक संघशाखांचे अधिकारी काम करीत आहेत. त्यांनीं तसें करावें अशी सूचनाहि संघाकडून देण्यांत आलेली आहे. मात्र हें काम पूर्ण सहकार्यानें करीत असतां संघाच्या दुष्काळ विमोचन समितीची कार्याची स्फूर्ति (initiative) अबाधित राहावी अशी कल्पना आहे.

ही भूमिका स्पष्ट मांडण्याच्या दृष्टीनें खालील मुद्दे सुचतात.

(१) मध्यवर्ती दुष्काळ निवारण समिति आणि संघाची दुष्काळ विमोचन समिति यांच्या कार्याची माहिती वेळोवेळीं मध्यवर्ती समितीला दिली जाईल. एकाच ठिकाणीं दोन केंद्रें अथवा एकाच कामावर दुबार खर्च होऊं नये यासाठीं काळजी घेतली जाईल.

(२) मध्यवर्ती समितीबरोबर पूर्ण सहकार्यानें काम करीत असतांना संघाच्या दुष्काळ विमोचन समितीच्या कार्याची स्फूर्ति (initiative) अबाधित राहील.

(३) संघाच्या दुष्काळ विमोचन समितीनें सुरू केलेल्या मदत-केंद्रांबाबत वा अन्य कार्यांबाबत मध्यवर्ती समिति ज्या सूचना करील त्यांचा पूर्ण उपयोग केला जाईल.

(४) मध्यवर्ती समिति दुष्काळी भागांत जें प्रत्यक्ष कार्य सुरू करील त्यांपैकीं मदत-केंद्रें चालविणें वा माहिती गोळा करणें अशासारखा जो भाग रा. स्व. संघाकडे येईल तो शक्यतेनुसार अवश्यमेव केला जाईल.

मध्यवर्ती समिति आणि रा. स्व. संघाची समिति यांमधील विचारविनिमयाचें स्वरूप प्राथमिक विचारासाठीं म्हणून आपणांसमोर मांडीत आहे. आपणांबरोबर त्यासंबंधीं अधिक विचारविनिमय करून अखेरचा मसुदा तयार करतां येईल."

याच पत्रांत अखेर उल्लेख केल्याप्रमाणें पत्रांत सुचविलेली योजना ही प्राथमिक विचारासाठीं होती. त्यांत विचारविनिमयानें अधिक स्पष्टता किंवा बदल करणें शक्य होतें. असें असतांना मध्यवर्ती समितीकडून या पत्राला खालील त्रोटक उत्तर आलें.

"आपलें पत्र पावलें. आभारी आहें. आपलें पत्र विचारार्थ मध्यवर्ती दुष्काळ समितीच्या कार्यकारिणीसमोर ठेविलें. त्या प्रसंगीं श्री. लिमये, श्री. पेंडसे व आपण यांजबरोबर झालेल्या माझ्या संभाषणाचा वृत्तांतहि सांगितला.

इतर अनेक पक्षोपपक्ष व व्यक्ति ह्या आपलें महाराष्ट्रांतील दुष्काळ निवारणाचें कार्य मध्यवर्ती समितीतर्फे करीत आहेत त्याप्रमाणें करण्याची इच्छा रा. स्व. संघाची नाहीं याची नोंद कार्यकारिणीनें घेतली. त्याबरोबरच दुष्काळ निवारणाचें कार्य महाराष्ट्रांत स्वतंत्रपणें करणाऱ्या इतर सर्व संस्था व व्यक्ति यांजबरोबर शक्य तेवढें सहकार्य जुळवून आणण्याची मध्यवर्ती समितीची इच्छा आहे हेंहि स्पष्ट नमूद करण्यांत आलें."

महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीनें पाठविलेलें पत्र आणि त्याला आलेलें मध्यवर्ती दुष्काळ निवारण समितीचें उत्तर जवळ जवळ ठेवलेलें आहे. त्या पत्राच्या स्पष्टीकरणार्थ अधिक एकहि बोल लिहिण्याची आवश्यकता नाहीं. दोन्ही पत्रांतून व्यक्त होणारा अर्थ स्पष्ट आहे.

## ठाणें येथील बैठक

दुष्काळ विमोचनाचें कार्य जवळजवळ संपत आलें असतांना दि. १९ सप्टेंबर १९५३ रोजीं ठाणें येथें समितीच्या विविध ठिकाणच्या कार्यकर्त्यांची अखेरची बैठक श्री. का. भा. लिमये यांच्या अध्यक्षतेखालीं घेण्यांत आली. या बैठकीस

सुमारें १०० पर्यंत कार्यकर्ते आले होते. सांगलीहून श्री. म. ह. गोडबोले, एम्. एल्. सी., खटाव तालुक्यांतून श्री. अप्पासाहेब चव्हाण, श्री. भरताग्रज मळेकर, इंदापूरहून श्री. रमाकांत पराडकर आणि श्री. रघुनाथराव शिंदे, सोलापूर जिल्ह्याचे प्रमुख श्री. काशिनाथराव पवार, करमाळें येथून श्री. अप्पाजी देवकर, टेंभुर्णी येथून श्री. विष्णुपंत कुलकर्णी आणि श्री. पुरुषोत्तमराव काळे, येडशी येथून श्री. शिवाजीराव नलावडे, मंगळवेढे येथून श्री. पंताराव नेने, नगरचे डॉ. रा. गं. खानोलकर, देवळाली प्रवरा येथून श्री. अण्णासाहेब कदम, कर्जत (नगर) येथून श्री. कुमारिल भागवत, येवले येथून श्री. अण्णासाहेब भांबरे, जळगांव जिल्ह्याचे प्रमुख श्री. मदनसिंह ठाकूर, बोदवडचे कार्यकर्ते वैद्यभूषण श्री. नानासाहेब बयाणी आणि श्री. वडनेरे, धुळें जिल्ह्याचे प्रमुख श्री. नानाराव ढोबळे, धुळें येथून डॉ. के. म. दुगल, पातोंडे येथून श्री. श्री. चिं. पवार, सुराय येथून श्री. पद्मसिंग सिरासे आणि श्री. जिपा मोहन पाटील, रत्नागिरीहून श्री. नानाराव दात्ये, कुलाब्यांतून श्री. काकाराव दामले, ठाणें जिल्ह्याचे प्रतिनिधि श्री. भ. प्र. जोशी, मुंबईचे कार्यकर्ते श्री. मुकुंदराव दामले, श्री. केशवराव कीर्तीकर, मराठवाड्यांतून श्री. दादासाहेब साठे आणि श्री. सुमंतराव घायाळ, पुण्याहून श्री. ब. ना. भिडे, श्री. वि. वि. पेंडसे इत्यादि कार्यकर्ते उपस्थित होते. याशिवाय पुण्याहून श्री. वि. मा. देशमुख, श्री. ना. ह. पालकर, कल्याणहून श्री. चिं. का. मोडक, ठाणें येथील श्री. वा. प्र. ओक, मुंबईचे सॉलिसिटर श्री. पद्मसिंग खोना हेही बैठकीसाठीं मुद्दाम आले होते. रा. स्व. संघाचे सरकार्यवाह श्री. प्र. वा. तथा भय्याजी दाणी हे बैठकीस सर्व वेळ उपस्थित होते.

परिचयाच्या कार्यक्रमानंतर त्या त्या केंद्राचें विस्तृत वृत्त प्रत्येक कार्यकर्त्यानें सांगितलें व त्यामध्यें श्री. अण्णासाहेब कदम, श्री. अण्णासाहेब भांबरे, श्री. काशिनाथराव पवार व श्री. नानाराव ढोबळे यांचीं भाषणें माहितीपूर्ण झालीं.

अहवालानंतर एकूण चार ठराव संमत करण्यांत आले. त्यांपैकीं पुढील पहिला ठराव श्री. म. ह. गोडबोले एम्. एल्. सी. यांनीं मांडला आणि प्रसिद्ध कृषितज्ज्ञ श्री. अ. ग. देवकुळे यांनीं त्यावर विस्तृत भाषण करून त्याला पाठिंबा दिला.

## ठराव १.

महाराष्ट्रांत वारंवार येणारा भीषण दुष्काळ कायमचा हटविण्यासाठीं

प्रत्येक दुष्काळी जिल्ह्याचा विचार करून आवश्यक त्या स्वरूपाची धरण-योजना आंखून ती कार्यवाहींत आणावी अशी या समितीची मुंबअी सरकारला आग्रहाची विनंती आहे. विशेषतः मुळा-कुकडी ही योजना तत्काळ हातीं घ्यावी. ही योजना करतांना मूळ शेतकऱ्यांना तिचा फायदा मिळेल अशी काळजी घ्यावी.

सरकारनें व्यापक स्वरूपाच्या योजना केल्या तरी पावसाचें पाणी जमिनींत मुरण्याचे दृष्टीनें ओढयांना बांध घालणें, शेतांना ताली घालणें, विहिरी बांधणें, लहान लहान धरणें बांधणें अशा स्वरूपाचीं कमी भांडवलाचीं पण अंगमेहनतीचीं कामें जनतेनें स्वयंस्फूर्तीनें केलीं पाहिजेत असें समितीचें मत आहे.

हा ठराव सर्वानुमतें संमत झाला.

खालील तीन ठराव खुद्द अध्यक्षांनीच मांडले आणि तेहि सर्वानुमतें संमत झाले.

## ठराव २.

महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीनें काम करण्यास प्रारंभ केल्यापासून जनतेनें या कार्यास अत्यंत साहाय्य केलें. गरीबांतल्या गरीबांनींहि दुष्काळ-पीडित हे आपलेच बांधव आहेत हें जाणून साहाय्य केलें. बाकीच्यांनीं धान्य, पैसे, कपडे, पोळ्या, भाकऱ्या आदींचा पुरवठा केला. कित्येकांनीं मोटारी दिल्या, औषधें दिलीं, वृत्तपत्रांनीं सहकार्य केलें, या सर्वांना धन्यवाद द्यावेत तितके थोडेच आहेत,

जनतेंतील सहकार्याबरोबरच ठिकठिकाणच्या तालुक्यांतील लहान थोर सरकारी अधिकाऱ्यांनीं तत्परतेनें सहकार्य केल्यामुळें समितीला काम करण्यास सुलभता प्राप्त झाली. त्या सरकारी अधिकारी वर्गाचे समिति आभार मानीत आहे.

## ठराव ३.

१९५२-५३ मध्यें महाराष्ट्राच्या आठ जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणावर पडलेल्या दुष्काळावर मुंबई सरकारनें ताली बांधणें, लहान-मोठीं धरणें बांधणें, रस्ते करणें, खडी फोडणें इत्यादि विविध दुष्काळीं कामें काढून अनाथांना डोल देऊन, शेतकऱ्यांना तगाई कर्जें देऊन समाधानकारक योजना केली त्याबद्दल महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समिति सरकारचें अभिनंदन करीत आहे.

ठराव ४.

महाराष्ट्राच्या पुष्कळशा भागांत अवर्षणादि कारणांनीं येणारी दुष्काळी आपत्ति नाहींशी करण्यासाठीं ठिकठिकाणीं लहान-मोठीं धरणें, बंधारे बांधणें, शेतकऱ्यांना बेणें देऊन नांगरटीस मदत करून साहाय्य करणें आवश्यक आहे. हें काम अर्थातच सरकार आणि समाज यांचें आहे. महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीनें या दुष्काळामध्यें जें कार्य केलें याचा अनुभव जमेला धरतां हें कार्य पुढें चालू ठेवणें आवश्यक आहे. त्यासाठीं शक्यतों सर्व विचार व योजना करण्यासाठीं पुढील मंडळींची एक समिति नियुक्त करण्यांत येत आहे.

महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीचें यापुढील सर्व कार्य या समितीनें ठरवावें. समितीस अवश्य तर अधिक सभासद करून घेण्याचा अधिकार आहे.

श्री. काशिनाथपंत लिमये
श्री. बाबाराव भिडे
श्री. अण्णासाहेब भोंबरे
श्री. डॉ. के. म. दुगल
श्री. वि. वि. पेंडसे

अखेर श्री. का. भा. लिमये, श्री. ब. ना. भिडे यांचीं भाषणें झाल्यानंतर श्री. भय्याजी दाणी यांनीं कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केल्यावर बैठक संपली.

महाराष्ट्रांतील दुष्काळाची तीव्रता आणि व्यापकता पाहतां समितीनें केलेलें कार्य अल्पस्वल्प आहे याची जाणीव समितीस आहे. तथापि अशा अल्पस्वल्प कामाचीहि आवश्यकता होती. एकट्या सरकारवर सर्व कामाची जबाबदारी टाकणें हें बरोबर नाहीं. जनतेंतूनहि प्रत्येक कार्याची उचल घेतली गेली पाहिजे. या दृष्टीनें महाराष्ट्रांतील या आपत्तींच्या प्रसंगीं अनेक संस्थांनी आणि पक्षांनीं तत्परतेनें कामास प्रारंभ केला हें योग्यच झालें. दुष्काळासारख्या आपत्तींना तोंड देणें झाल्यास शेतीविषयक अशीं विविध विधायक कार्यें प्रामुख्यानें अंगिकारून पार पाडल्याविना गत्यंतर नाहीं हें ओळखून अशा स्वरूपाचीं विधायक कार्यांचीं केंद्रें निर्माण करावीत असें समितीनें ठरविलें आहे. या दृष्टि-कोनांतून पुढील कार्याचें नियोजन करण्यासाठीं एक पोट समिति नेमली असल्याचा उल्लेख प्रतिवृत्तांत आलाच आहे. हीं विधायक कामें अंगीकारण्याच्या दृष्टीनें कोणत्या गांवीं कोणत्या तालुक्यांत काय करतां येण्यासारखें आहे याबद्दल सूचना मागविल्या होत्या. त्याला सुमारें ७५ गांवच्या स्थानिक गांवकऱ्यांनीं

उत्तरें पाठवून आपआपले विचार कळविले आहेत. या सूचनांचें वर्गीकरण करण्यांत येत असून त्याच्या आधारावर पुढील योजना आंखली जाईल.

महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीला ५३८ खेड्यांतून जें अल्पस्वल्प कार्य करतां आलें त्याचें मुख्य कारण अगदीं लहान खेड्यांतील खेडुतापासून तों शहरांतील सुशिक्षित जनतेपर्यंत सर्वांनीं आत्मीयतापूर्वक साहाय्य केलें हें होय. जनतेच्या साहाय्यावांचून हें काम होऊं शकलें नसतें. या साहाय्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून यापुढील कालामध्येंहि असेंच सहकार्य जनतेनें द्यावें अशी विनंती आहे.

कोणकोणत्या जिल्ह्यांत कसें कसें काम झालें याचें प्रतिवृत्त पुढें स्वतंत्र रीत्या दिलें आहे.

सर्व जिल्ह्यांतून जमा झालेल्या निधीचें आयव्यय-पत्रक पुढें जोडलें आहे.

का. भा. लिमये,
ब. ना. भिडे,
मो. नी. पिंगळे,
न. गो. अभ्यंकर,
वि. गो. आपटे,
वि. वि. पेंडसे,

दि. ७ फेब्रुवारी १९५४
८५१ अ, सदाशिव पेठ,
पुणें २.

# महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समिति

## निधीचें आयव्यय-पत्रक

( दिनांक १४ जानेवारी १९५३ तें ८ फेब्रुवारी १९५४ अखेरचें )

| जमा :- | | नांवें :- | |
|---|---|---|---|
| जिल्हावार निधीची जमा :- | | | रु. आ. पै |
| जिल्हा | रक्कम | धान्य खरेदी | १,९२३-११-० |
| | रु. आ. पै | बियाणें खरेदी | ३,५२६-१२-० |
| मुंबई | ६,०५३-११-० | रोख आर्थिक साहाय्य | १,५०४- ७-९ |
| ठाणें | ४,४२८-१३-० | प्रासंगिक जेवणावळी | १,७७९- २-६ |
| कुलाबा | १,६८३- १-६ | अन्नछत्रांचा खर्च | ९८९- २-० |
| रत्नागिरी | ८७८- ५-६ | दूधपावडर खरेदी | २८०-१३-० |
| कोल्हापूर | २७५- ०-० | औषधें खरेदी | ३६-१२-० |
| सांगली | १,१५६- ६-६ | जुनीं लुगडीं खरेदी | ४५- ०-० |
| सातारा | २७८-१२-० | समारंभ-खर्च | ६२- १-० |
| सोलापूर | १,१५२- ०-० | कपडे धुलाई | ४९३-१४-० |
| पुणें (जिल्हा) | ८४५- ६-६ | करमणुकीच्या कार्यक्रमांचा खर्च | १,३८१-१४-९ |
| पुणें शहर | ११,८६०- ४-९ | मालवाहतूक खर्च (रेल्वे-मोटार-गाडीभाडें, जकात, हमाली, इत्यादि) | १,२९६- ९-६ |
| नगर | १,१३३-१३-३ | प्रवास खर्च (रेल्वे-मोटार-दुचाकीभाडें इत्यादि) | ३,५५१- १-६ |
| नाशिक | २३१-१३-० | प्रचार खर्च (सभा, मिरवणुका, ध्वनिक्षेपक, बोर्ड पेंटिंग इत्यादि) | २८५८-१५-० |
| जळगांव | १६५-१५-३ | छपाई-कागद | १९११-१४-३ |
| धुळें | १,०५८-१५-६ | टेलिफोन भाडें (मुंबई कार्यालय) | २४७- ७-० |
| एकूण (पुढें चालू) | ३१,२०२- ५-९ | एकूण (पुढें चालू) | २१९६९- ९-३ |

| जमा :- | | नांवें :- | |
|---|---|---|---|
| | रु. आ. पै | | रु. आ. पै |
| मागील बेरीज | ३१,२०२-५-९ | मागील बेरीज | २१,९६९- ९-३ |
| | | कार्यालय खर्च (टपाल-हुंडणावळ, लेखन-साहित्य, टायपिंग खर्च, जागाभाडें इत्यादि) | १,४५१- १-६ |
| | | इतर संकीर्ण | ७६- ८-३ |
| | | एकूण व्यय | २३,४९७- ३-० |
| | | शिल्लक<br>बँकेंत ६४६५- ३-०<br>जिल्ह्यांकडे १२३९-१५-९ | ७,७०५- २-९ |
| एकूण जमा | ३१,२०२-५-९ | एकूण | ३१,२०२- ५-९ |

Examined and
found to be correct.
B. R. Pandit & Co.
Chartered Accountants.

का. भा. लिमये
अध्यक्ष
वि. वि. पेंडसे
कार्यवाह

---

वरील आयव्यय-पत्रकावरून दिसून येईल कीं जमा झालेल्या एकूण रु. ३१,२०२-५-९ पैकीं रु. २३,४९७-३-० खर्च झाला असून रु. ७,७०५-२-९ इतकी शिल्लक आहे. खर्च झालेल्या एकूण रकमेपैकीं रु. १०,६४१-११-३ इतकी रक्कम दुष्काळग्रस्तांना धान्य, कपडे, रोख मदत, औषधें, दूधपुरवठा, प्रासंगिक भोजनें, अन्नछत्रें इत्यादींच्या रूपानें साहाय्य करण्यासाठीं खर्च झाली आहे. मालवाहतुकीसाठीं रु.१२९६-९-६ खर्च झाला. त्यांत धान्य, कपडे इत्यादींच्या वाहतुकीसाठीं झालेलें रेल्वेभाडें, मोटारभाडें, गाडीभाडें, जकात, हमाली इत्यादींचा समावेश आहे. प्रवास खर्च रु. ३५५१-१-६ इतका झाला. एकूण ५३८ खेड्यांपर्यंत सतत हिंडून मदत पोंहोचविण्यासाठींच हा खर्च प्रामुख्यानें झाला आहे. म्हणजे मालवाहतुकीसाठीं आणि प्रवास खर्चासाठीं लागलेली एकूण रक्कम रु. ४८४७-११-० ही देखील दुष्काळग्रस्तांकरितांच अप्रत्यक्षपणें

कारणीं लागलेली आहे. करमणुकीच्या कार्यक्रमासाठीं रु. ११८१–१४–९ खर्च आला आणि उलट त्या कार्यक्रमांपासुन ५५५७–१२–० रुपये उत्पन्न मिळालें आहे. कार्यालय (ऑफीस), प्रचार, छपाई इत्यादीसाठीं मिळून एकूण रु. ६६२५–१४–० खर्च झाले आहेत. धान्य, कपडे इत्यादींच्या रूपानें जें सुमारें रु. ४,२०,००० चें सामान समितीस जमवितां आलें तें या रकमेच्या आधारावर. या सर्व खर्चांत वेतन अथवा मानवेतन यासाठीं एक रुपयाहि खर्च झालेला नाहीं.

दिनांक ८ फेब्रुवारी १९५४ ला जी रुपये ७७०५–२–९ शिल्लक होती त्यापैकीं रु. ६४६५–३–० पुणें केंद्राकडे जनता सहकारी बँकेंत असून बाकीचे रु. १२३९–१५–९ त्या त्या जिल्ह्यांकडे आहेत. निधीची बरीचशी रक्कम दुष्काळ संपतां संपतां मिळाली. एकाच वेळीं निरनिराळ्या समित्या आणि संस्था यांच्या दुष्काळ निधींचें संकलन चालू झाल्यामुळें महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीकडे प्रारंभीं निधीचा ओघ कमी होता. शिवाय सरकार आणि नगरपालिका यांजकडून करमणूक कराची रक्कमहि दुष्काळ संपल्यानंतर परत मिळाल्याकारणानें इतकी रक्कम शिल्लक उरली. यापुढील कार्यासाठी जी समिति नियुक्त झालेली आहे तिच्या आदेशानुसार शिल्लक रकमेचा विनियोग दुष्काळी मदत, शेती वा ग्राम-विकास कार्य अशा स्वरूपाच्या कामासाठींच करण्यांत यावयाचा आहे. यंदाहि पुणें जिल्ह्यांत शिरूर, नगर जिल्ह्यांत पारनेर इत्यादि तालुक्यांतून पुन्हां दुष्काळ पडला आहे. तिकडे यथापूर्व मदत करण्याचें काम या रकमेंतून व्हावयास प्रारंभहि झाला आहे.

वि. वि. पेंडसे
कार्यवाह

१

# सोलापूर जिल्हा

गेल्या कित्येक वर्षांत पडला नव्हता एवढा भयंकर दुष्काळ सोलापूर जिल्ह्यांत या वर्षीं पडला. कित्येक ठिकाणीं पावसानें दर्शन देखील न दिल्यामुळें पेरण्या झाल्या नाहींत. शेतें ओसाड पडलीं, धान्य नाहीं, पैसा नाहीं, जनावरांना चारा नाहीं अशा स्थितींत लोकांची भयंकर उपासमार होऊं लागली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गोवध निरोध आंदोलनांत संघाचे स्वयंसेवक खेडोपाडीं घरा-घरांतून हिंडले, त्यावेळीं लोकांची दयनीय आणि केविलवाणी स्थिती त्यांच्या निदर्शनाला आली. यावर जर त्वरीत उपाययोजना झाली नाहीं तर हजारों लोक अन्नवस्त्राच्या अभावीं तडफडून मेल्याशिवाय राहणार नाहींत हे ध्यानांत आलें. स्वयंसेवकांनीं आपले अनुभव व वस्तुस्थिती जिल्हा संघचालक श्री. डॉ. भा. वा. मुळे आणि संघाचे प्रांतीय अधिकारी यांना निवेदन केलें.

याबाबतींत खास दुष्काळी भागांतच हिंडून गावोगांवची परिस्थिती पाहण्यासाठीं जिल्हासंघचालक डॉ. काकासाहेब मुळे यांचे आज्ञेवरून संघस्वयंसेवक

जवळ जवळ १७५ गांवीं जाऊन तेथील माहिती घेऊन आले. सर्वच ठिकाणीं हजारों लोक बेकार होते. त्यांना त्वरित काम मिळालें तरच ते जगणें शक्य होतें. जिल्ह्यांतील कमीत कमी १० हजार जनावरें केवळ चाऱ्याच्या अभावीं डिसेंबर १९५२ अखेरपर्यंत तडफडून मेलीं होती.

वरील माहिती गोळा केल्यानंतर सरकारनें यासाठी कांहीं त्वरित उपाय योजना करावी म्हणून दि. १ डिसेंबर १९५२ ला मंगळवेढ्याचे संघचालक श्री. भाऊसाहेब करंदीकर यांनीं ना. भाऊसाहेब हिरे यांची मुंबईस भेट घेऊन दुष्काळीं कामें काढण्याची विनंती केली. त्याचप्रमाणें सोलापूर येथें जिल्हा संघचालक डॉ. मुळे यांनी संघस्वयंसेवकांनी गोळा केलेली सविस्तर माहिती ना. हिरे यांना निवेदन केली. संघस्वयंसेवकांनी इतकी माहिती घरोघर हिंडून गोळा केलेली पाहून ना. हिरे यांना आश्चर्य वाटलें आणि या कार्याचा गौरव करून परिस्थितीचें गांभीर्य लक्षांत घेऊन त्यावर त्वरित उपाय योजना करण्याचें त्यांनीं आश्वासन दिलें.



केंद्र वरकुटें

डॉ. काकासाहेब मुळे यांची भेट.

केवळ सरकारवर भिस्त ठेऊन स्वस्थ बसणें शक्य नव्हतें म्हणून आपल्या शक्यतेप्रमाणें दुष्काळ पीडितांना मदत करण्याचें संघानें ठरविलें. त्याप्रमाणें डिसेंबर १९५२ मध्यें प्रांत संघचालक श्री. काशिनाथपंत लिमये यांनीं संघाच्या टिकेकरवाडी येथील जिल्हा शिबिरांत दुष्काळ विमोचन कार्य हातीं घेतल्याचें घोषित केलें.

जानेवारी १९५३ या महिन्यांत सोलापूर जिल्हा दुष्काळ विमोचन समितीची रीतसर स्थापना झाली. त्यानंतर श्री. डॉ. मुळे यांनीं रिटायर्ड इंजिनीयर श्री. किरपेकर यांच्याबरोबर जिल्ह्यांतील दुष्काळीं भागाची पाहणी केली. यावेळीं सरकारी कामें कांहीं प्रमाणांत सुरू झालीं होतीं. परंतु सर्वच ठिकाणीं अनास्था आणि गोंधळ दृष्टिस पडला. मजुरी वेळच्या वेळीं मिळत नव्हती. औषधोपचाराची कोणतीहि सोय करण्यांत आली नव्हती, निवाऱ्याला जागा नव्हती. वरकुटे गांवाजवळील खडीच्या कामावरील मजूरांच्या मुलांचे डोळे उन्हा-मुळें सुजून त्यांतून पू वाहून वाहून डोळे जाण्याची वेळ आली होती. तरी औषधो-पचाराची सरकारी व्यवस्था कांहीं झाली नव्हती. मजुरांना हत्यारें देखील सरकारकडून पुरविलीं जात नव्हतीं. धान्यासाठीं दहा दहा मैल दूर जावें लागे यापेक्षां सर्वांत वाईट गोष्ट यावेळीं कोणती नजरेंत आली असेल तर ती म्हणजे माणुसकीचा अभाव! गांजलेल्या अर्धपोटी मजुरांच्या हातांत कामाचे पुरेसे पैसे पडत नाहींत, गँगमन नि त्यांच्या वरचे अधिकारी यांच्याच हातांत त्यांचा निम्मा पगार पडतो व मिळालेल्या निम्म्या पैशांत मजुरांना कसेबसे पांच दिवस अर्धपोटी व दोन दिवस उपास काढून जीवन जगवावें लागतें, तगाई देतांना एकेकाचे २५ ते ५० रुपये काढून घेऊन व सही मात्र पूर्ण पैशांवर घेऊन त्यांना तगाई देण्यांत येत असते, अशा गंभीर स्वरूपाच्या नि विश्वासार्ह तक्रारी अनेक ठिकाणांहून येत होत्या.

कित्येक ठिकाणीं कामाच्या अभावीं लोक जनावरांची पेंड खाऊन जगत असल्याची उदाहरणें लक्षांत आलीं, तर कित्येक ठिकाणीं भूकबळी झाल्याचेंहि कानीं आलें. याचा अर्थ असा कीं, सरकारी कामें आणखी बऱ्याच ठिकाणीं काढणें आवश्यक होतें व देखरेखीचीहि सोय करणें निकडीचें होतें. अधिक कामें काढ-ण्याच्या दृष्टिनें जर तलावाची कामें सुरू होतील तर १०-१५ हजार मजुरांना सहज काम मिळेल या विचारानें श्री. डॉ. मुळे यांनीं करमाळ्याजवळील मांगी, टेंभुर्णी जवळील सापटणे, पंढरपूर जवळील तिसंगी व मंगळवेढ्याजवळील खडकीरा या तलावांची पाहणी केली व सरकारला ही कामें काढण्याची विनंती केली. डॉ. मुळे यांनीं आपल्या दौऱ्याचें सविस्तर वृत्त जिल्हाधिकारी श्री. बोगा यांना निवेदन केलें. त्यांनीं सर्व तक्रारींची चौकशी करून सरकारी कामावरील गैर-व्यवस्था दूर करण्याचें आश्वासन दिलें.

दुष्काळ पीडितांना मदत करण्याच्या दृष्टीनें व विचार विनिमय करण्यासाठीं फेब्रुवारी १९५३ मध्यें कुर्डुवाडी येथें जिल्ह्यांतील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बोलाविण्यांत आली, बैठकीस सोलापूरहून जिल्हाकार्यवाह श्री. बाबूराव लोहोकरे,

जिल्हा प्रचारक श्री. रामभाऊ गोडबोले आणि अन्य तालुक्यांतील सुमारें २० कार्यकर्ते जमले होते. बैठकीत धान्य, कपडे व पैसे जमा करण्याचा विचार करण्यांत आला. त्याचप्रमाणें दुष्काळी मदत कार्याची रूपरेखाहि ठरविण्यांत आली. मदत देण्यासाठीं चार केंद्रें निश्चित करण्यांत आलीं, (१) करमाळा (२) टेंभुर्णी (३) मंगळवेढें (४) येडशी. कामाची दिशा ठरल्यानंतर सर्व ठिकाणीं एकदम धान्य, कपडे व निधि गोळा करण्याचें कार्य जोरांत सुरु करण्यांत आलें.

## मदत गोळा करण्याचें कार्य

### सोलापूर

सोलापूरात जिल्हा संघचालक श्री. काकासाहेब मुळे यांनीं सर्व स्वयंसेवकांची बैठक घेऊन दुष्काळाबाबत संघाचें कर्तव्य व पुढील कार्याची रूपरेखा स्वयंसेवकांसमोर मांडली. दुष्काळ विमोचन समितीच्या सर्व कामाची जबाबदारी सोलापूर येथील सुप्रसिद्ध नागरिक श्री. माणिकचंद वीरचंद शहा यांच्यावर सोंपविली व कार्यवाह म्हणून श्री. काशिनाथराव पवार यांची नियुक्ति केली.



श्री. माणिकचंद शहा आणि श्री. का. बा. पवार सपाटणें तलावावर मजुरांच्या अडचणी समजावून घेत आहेत.


सोलापुरांत मदत गोळा करण्यास दि. २५-१-५३ पासून सुरुवात झाली. शहराचे चार भाग करून स्वयंसेवक कपडे, धान्य व निधि गोळा करूं लागले.

कित्येक ठिकाणीं स्वयंसेवक बँड व कर्णे यांच्या सहाय्यानें प्रचार करीत होते. एकंदर सोलापूर शहर व तालुक्यांतून आतांपर्यंत १२०० कपडे, १२ पोतीं धान्य व रोख रु. ७००/– जमा झाले. मुख्य मदतीमध्यें डॉ. मुळे यांनीं रु. १०१/– व १ पोतें धान्य दिलें आहे. त्याचप्रमाणें सोलापूर येथील सूर्य छाप विडी कारखान्यांतील मजुरांनीं रु. ५१ व १०१ भाकऱ्या दुष्काळ विमोचन समितीस दिल्या. रत्नागिरीचे संघ कार्यकर्ते श्री. बापूराव पटवर्धन यांनीं स्वतःचे चिरंजीव व पुतणे यांच्या मुंजीनिमित्त रु. १०१ पाठविले.

टेंभुर्णी येथील दुष्काळ पीडितांसाठीं अन्नछत्र चालविण्याकरितां सोलापुरांतील घराघरांतून भाकऱ्या गोळा करून एस्. टी. च्या मोटारनें त्या टेंभुर्णीला पाठवाव्यात अशी योजना करण्यांत आली. त्यासाठीं शहराचे सात भाग करून एकेका संघ शाखेकडे एक एक भाग देण्यांत आला. त्या भागांतील लोक आठवड्याला एक दिवस याप्रमाणें प्रत्येक घरांतून दोन भाकऱ्या देत असत. अशा रीतीनें शहरांतील निरनिराळ्या भागांतून रोज १५० ते २०० भाकऱ्या गोळा करून टेंभुर्णी केंद्रावर पाठविण्यांत येत असत. भाकऱ्या देणाऱ्यांमध्यें धनिक वर्गापासून ते अगदीं गरीब वर्गांतील सर्व प्रकारचे लोक होते. ज्यांना जेमतेम रोज जेवायला मिळत असे अशाहि कित्येक लोकांनीं स्वतः त्या दिवशीं अर्धपोटी राहून दुष्काळ पीडितांसाठीं भाकऱ्या दिल्या आहेत. त्यांच्या या मदतीचें मोजमाप पैशांत करतां येणार नाहीं. सोलापुराहून टेंभुर्णी केंद्रावर एकूण १२००० भाकऱ्या पाठविण्यांत आल्या.

सोलापुराहून अक्षय्य तृतीयेच्या दिवशीं कित्येक व्यापाऱ्यांनीं सुवासिनींसाठीं एक एक वार कोरे कापड दिलें, त्याच दिवशीं सोलापुराहून करमाळे येथें ६०० भाकऱ्या पाठविण्यांत आल्या.

जिल्ह्यांत सर्व ठिकाणीं भगिनी वर्गात लुगड्यांची अतिशय वाण आढळून येत होती. वस्त्रहीन पुरुषवर्ग कसें तरी लंगोटी, चिटकोरे गुंडाळून उघड्या अंगानें कामें करीत असत. पण लज्जा राखण्यापुरतें देखील वस्त्र कित्येक स्त्रियांच्या अंगावर नव्हतें. संघानें जे कपडे जमा केले त्यामध्यें लुगडीं, पातळें यांचें प्रमाण अत्यल्प असें त्यामुळें भगिनींना देण्यास कपडे संघाजवळ नव्हते. यासाठीं केवळ पातळें आणि लुगडीं जमा करण्यासाठीं म्हणून सोलापूर येथील राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख श्रीमती काशीताई कुलकर्णी व सौ. भावे यांनीं घरोघर हिंडून सुमारें १५० लुगडीं व पातळें जमा केलीं. हीं सर्व पातळें टेंभुर्णी, मंगळवेढें व करमाळे येथें भगिनींना देण्यांत आलीं,




पीडित अशा ३००० लोकांना गव्हाच्या खिरीचें जेवण देण्यांत आलें. रामनवमीच्या उत्सव प्रसंगीं मोडनिंबहून श्री. नानासाहेब साठे व श्री. भाऊसाहेब साठे यांचे भजनी मंडळ आलें होतें. बेंबळयाहून श्री. अंबादास टकले, श्री. हणमंत कुलकर्णी व श्री. दशरथ घडलिंग हे मदतीसाठीं आले होते. टेंभुर्णी येथील श्री. आप्पाजी भुई व श्री. नंदराम नेमचंद यांनीं गहूं मोफत भरडून दिला. कार्यक्रमाचे वेळीं सापटणे तलावावरील अधिकारी श्री. राणे व त्यांचे सहाय्यक अधिकारी उपस्थित होते. रामनवमी नंतर पुन्हां अक्षय्य तृतीयेला २५०० दुष्काळपीडित लोक जेवले व त्याच दिवशीं सौ. कुसुमताई राणे, सौ. कमलाताई घागेकर, सौ. राधाबाई अन्हाळे यांचे हस्तें नव्या कापडाचें वांटप झालें व हळदीकुंकवाचा समारंभ करण्यांत आला.

घोटी येथील बंडिंगच्या १००० मजुरांनाहि जेवण देण्यांत आलें. त्या प्रसंगीं लातूरच्या व्यापाऱ्यांनी रु. १०४/- दिले व घोटी येथील बंडिग स्टाफ अधिकारीवर्गानें गूळ दिला. या कार्यक्रमासाठी श्री. नरहर पाटील, व श्री. वसंतराव कुलकर्णी

यांनी फारच मेहनत घेतली. स्वत: श्री. विष्णुपंत यांनी आपल्या घरून ३०० भाकऱ्या व झुणका करुन आणून लोकांना दिला. पंजाबचे श्री. बद्रीनाथजी यांनीं ३०० मुलांना गुडदाणी वाटली.

या केंद्रांतून आतांपर्यंत १२५ कुटुंबांना धान्य दिले. अनेक बेकारांना कामावर लावण्यांत आलें. त्याचप्रमाणें डोल मिळवून देणें, गवत, पेंड मिळवून देणें इत्यादि कामेंहि या केंद्रातर्फे झालीं. स्थानिक अडचणी, पाण्याची गैरसोय याबाबतच्या तक्रारी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर मांडून जनतेची सोय करण्यांत आली. समितीचे अध्यक्ष श्री. माणिकचंद वीरचंद शहा यांनी सापटणें तलावावरील मजुरांच्या करतां पाण्याच्या दोन टाक्यांची सोय केली, त्यामुळें तलावावर मजुरांच्या पाण्याची फारच सोय झाली.

या केंद्रास तेथील सरकारी अधिकारी आणि मामलेदार यांनीं वेळोवेळीं बरीच मदत केली. त्याचप्रमाणें स्थानिक रहिवासी श्री. त्र्यंकटराव राशिनकर, श्री. वासुदेवराव साळुंके, श्री. वासुदेवराव भास्करे, श्री. चिंतामणराव खासनीस यांचें सहाय्य या केंद्रास लाभलें.



टेंभुर्णीकेंद्रावर मुलांना खाऊ देण्यांत येत आहे.

कपड्याविना दिसणारी उघडी नागडी शरिरें, भुकेनें पोटाची दामटी वळलेले व निस्तेज झालेले चेहरे, केंद्रावरुन मदत मिळताच त्यांच्या चेहऱ्यावर आनंद

चमकूं लागला. कृतज्ञतेच्या भावनेनें तें म्हणत "तुम्हींच आम्हा गरिबांचे वाली आहांत." लहान लहान मुलांना कपडे मिळतांच ते आनंदानें उड्या मारूं लागत. बाया बापड्या नमस्कार करीत व संघाला धन्यवाद देत. सोलापुराहून येणाऱ्या भाकऱ्यांचें वांटप दैनंदिन होत असे. टेंभुर्णीस या भाकऱ्या अर्धपोटी, वृद्ध, उपाशी बेकार, अंध, अपंग व निराधार लोकाना देण्यांत येत असत. मोटार यायच्या वेळेला संघाच्या केंद्रावर अतिशय गर्दी होई. मोटार लांबून दिसूं लागतांच सकाळ-पासून उपाशीं असलेलीं मुलें आनंदानें ओरडूं लागत, 'आली रे आली भाकरीची मोटार!' भुकेलेल्यांच्या डोळयांत पुन्हा आनंद दिसे. त्यांचे केविलवाणें चेहरे पुन्हां प्रफुल्लित होत आणि घांसभर भाकरीचा तुकडा सर्वजण पोटांत टाकून संघास आणि भाकऱ्या पाठविणाऱ्यांना धन्यवाद देत असत. सोलापूराहून भाकऱ्या येण्याचें बंद झाल्यानंतरहि ८ जन ते ३० जुलैपर्यंत स्थानिक व्यवस्था करून भाकरी-वांटप चालूं होतें.

भगिनींसाठीं सोलापूराहून श्रीमति काशिताई कुळकर्णी यानीं पाठविलेल्या पातळांचाहि फार उपयोग झाला. या केंद्रावर मोडनिंबहून सौ. रमाबाई साठे सौ. निर्मलाताई वाटवे, सौ. सुशिलाबाई भावे व सौ. सुमतिबाई कानडे, यांचे हस्ते कपडे वांटण्याचा कार्यक्रम दि. २९-५-५३ रोजीं झाला. त्यानीं वधि ?. मासाचे पोथीपुढें जमलेलें तांदूळ व पैसे या केंद्रास दिले.

या केंद्रातर्फे खालील उपकेंद्रें काढून लोकांना मदत देण्याचें कार्य सुरूं होतें.

(१) निमगांवः-या उपकेंद्राचें काम श्री. भय्या केळकर हे पहात असत. तेथील प्रमुख कार्यकर्ते श्री. विठ्ठल मारुति शिंदे, श्री. माधव सिद्धेश्वर केळकर इत्यादि गांवकरी मंडळीनींहि बरीच मदत केली.


(२) अहेरगांवः-या उपकेंद्राची व्यवस्था श्री. नारायण रामा जगताप हे पहात होते.

(३) घोटीः- श्री. वसंत दिगंबर कुलकर्णी हे येथील प्रमुख म्हणून काम पहात होते.

एकंदर टेंभुर्णी केंद्रातून ४० गांवीं सुमारे हजारों कपडे व ५०० पादत्राणें वाटलीं. बेंबळे येथे लिफ्ट इरिगेशनचें काम सुरुं करणेबद्दल, तसेंच सापटणें व अकोला या तलावांचे काम काढण्याबद्दल श्री. विष्णुपंत कुळकर्णी यांनीं बरेच प्रयत्न केले.

## करमाळा केंद्र

या केंद्राची सर्व व्यवस्था तेथील संघ-प्रचारक श्री. अप्पाजी देवकर हे पहात होते. दुष्काळ विमोचनाचें काम किती करावें. त्यासाठीं किती कष्ट घ्यावें या बाबतींत श्री. आप्पाजी देवकर यानीं कोणतीच तमा ठेवली नाहीं. गांवोगांवीं उन्हातान्हांतून सायकलवरून, पायानें हिंडत असतांना पाणी पिण्यास न मिळाल्यानें, जेवण तुटल्यानें प्रसंगीं मूर्च्छित होऊन पडल्याचें प्रसंगहि त्यांचेवर आले. तथापि कार्याचा वेग सारखा वाढताच होता. फेब्रुवारी महिन्यांत गावांतील सुप्रतिष्ठित नागरिकांची एक बैठक होऊन तालुका दुष्काळ विमोचन समिति स्थापन करण्यांत आली. त्यांत डॉ. वि. ज. कराडकर, अध्यक्ष, श्री. ग. द्वा. पाठक, वकील, श्री. तु. ल. वार्शीकर, श्री. वि. भा. भणगे, श्री. ना. बा. परदेशी, श्री. [illegible]. भा. येवले, श्री. द. गो. देवी, श्री. सूर्य पुजारी यांचे एक कार्यकारी मंडळ ठरविण्यांत आले. लगेच कार्यालाहि सुरवात झाली. गावांमधून प्रचार फेरी काढून धान्य' कपडे व निधि गोळा करण्यांस स्वयंसेवक हिंडू लागले.



२) वरकुटे--या केंद्राचे काम श्री. गोपाळ माधव विन्द्त हे पहात होते. अडीअडचणींत असलेल्या लोकांना मदत करणें व त्यांना सर्व प्रकारचें सहाय्य करणें हें काम या केंद्रांतून चालू होतें.

३) हिवरे-- येथील काम श्री. भगवान मुकुंदराव पाटील हे पहात होते या केंद्रांतून आसपासच्या १० गांवांतील लोकांना मदत देण्याचें कार्य सुरु होतें.

४) लडकी-- या केंद्राचे काम श्री. वासुदेवकाका कलकर्णी हे पहात होते

करमाळें शहरांत सर्वांत गैरसोय कोणती असेल तर ती पाण्याची. गांवांतील सर्व विहिरी आटल्या होत्या. शहरांत सरकारी मोटारींतून पाणी दिलें जाई पण तेंहि विकत. परगांवाहून बाजारासाठीं आलेल्या लोकांना गांवांत घोटभरहि पाणी मिळत नसें. लहान लहान तान्हेलेलीं मुलें पाणी पाणी करुन कासावीस होत. यासाठीं संघाच्या मदत केंद्रावर रोज पाणी भरुन ठेवण्यांत येई, त्यामुळें किती तरी लोकांची सोय झाली. पाण्यासाठीं गांवांतील कांहीं विहिरींचा गाळ संघस्वयंसेवकांनीं काढून त्यांतील झरे मोकळे केले.

करमाळें केंद्रावर श्री. अप्पाजी देवकर यांना मदतनीस म्हणून सोलापूरचे श्री. दत्तोपंत कुळकर्णी, व पुण्याचे श्री. गजाभाऊ पटवर्धन हे दोघे महाविद्यालयीन विद्यार्थी आले होते. श्री. पटवर्धन हे एम्. बी बी. एस्., च्या अखेरच्या वर्गांत असल्यानें त्यांच्या ज्ञानाचा पुष्कळ उपयोग झाला. गांवांतील बऱ्याच नागरिकांचे सहाय्य या केंद्रास लाभलें. येथील पुढारी श्री. मनोहरपन्त चिवटे यांनीं बरीच मदत केली. डॉ. कराडकर यांनीहि परिश्रमपूर्वक संघास सर्व प्रकारचें सहाय्य केलें. वांगी येथील कार्यक्रमासाठीं त्यांनीं मोफत गूळ दिला. तेथील एक व्यापारी श्री. पोपट डाळवाले यांनीहि एक गुळाची ढेप दिली. सर्व तालुक्यामध्यें दुष्काळ पीडितांना संघ हा एकच आसरा होता. अनेकांनीं संघाच्या या कार्यास धन्यवाद दिले.

## मंगळवेढें केंद्र

मंगळवेढ्याचे संघचालक श्री. भाऊसाहेब करंदीकर यांनीं येथील दुष्काळ पीडितांची अमोल सेवा केली आहे, त्याबद्दल त्यांना तेथील जनता एकमतानें दुवा देत आहे. त्यांच्या मदतीला केंद्र प्रमुख म्हणून श्री. रामचंद्र दिगंबर नेने हे काम पहात होते.

मंगळवेढें तालुक्यांतील परिस्थितीची यथायोग्य कल्पना पहिल्यांदा कोणाला आली असेल तर ती श्री. भाऊसाहेब करंदीकर यांना. आपल्या तालुक्यांतील बेकार लोकांची संख्या अजमावून त्यांनीं ऑक्टोबर १९५२ मध्यें प्रांत साहेब पंढरपूर विभाग व मामलेदार मंगळवेढें यांना भेटून दुष्काळी कामें काढण्याची विनंती केली. दि. ३-११-५२ रोजीं मंगळवेढें येथें जाहीर सभा घेऊन तालुक्यांतील परिस्थिती संबंधीं लोकांना माहिती सांगितली. या सभेंत सरकारनें दुष्काळ जाहीर करून दुष्काळी कामें काढावींत अशी मागणी करण्यांत आली.

तालुक्यांतील परिस्थिती दिवसेंदिवस अधिक भीषण होऊं लागली. परंतु सरकार मात्र स्वस्थच होतें. लोक काम मिळावें म्हणून वणवण फिरूं लागले. जनावरें चारा नसल्यामुळें झाडपाला खाऊं लागलीं. ही परिस्थिती अजमावून श्री. भाऊसाहेब करंदीकर यांनीं नोव्हेंबरमध्यें एका शिष्ट मंडळाबरोबर मुंबईस जाऊन ना. भाऊसाहेब हिरे यांची भेट घेऊन तालुक्यांतील परिस्थितीचें निवेदन केलें व तालुक्यांत दुष्काळी कामें कोणकोणती काढतां येण्यासारखीं आहेत याची लेखी माहिती दिली.

जानेवारी १९५३ मध्यें संघाच्या वतीनें मंगळवेढयांत मदत केंद्र सुरूं करण्यांत आलें. याच महिन्यांत १५ जणांना डोल मिळवून देण्यांत आला. दि. १९-१-५३ रोजीं एक जाहीर सभा बोलावून चुकीची आणेवारी, धान्य पुरविण्याचा प्रश्न, जनावरांना चारा वैरण पुरविणें व गांवांतील पाणी पुरवठयाचा प्रश्न, तसेंच लोकांना तगाई देणेबद्दल सभेंत ठराव करण्यांत आले.

फेब्रुवारी महिन्यांत मदत गोळा करण्यास आरंभ केला गेला. त्याप्रमाणें स्वयंसेवक धान्य, कपडे व निधि गोळा करूं लागले. एकंदर मदत २॥ पोतीं धान्य, शेकडों कपडे व रोख रु. ५० पर्यंत गांवांतून मदत मिळाली. सोलापूराहूनहि ४०० कपडे पाठविण्यांत आले होते. त्याचप्रमाणें पुण्यांतूनहि १००० कपडे पाठविण्यांत आले.

मार्च महिन्यांत श्री. भाऊसाहेब करंदीकर व श्री. उमाकांत वेदपाठक यांनीं गांवांत घरोघर हिंडून कोण उपाशी आहेत ; निराश्रित कोणी आहे काय; डोल कोणाला दिला जातो किंवा नाहीं, तो बरोबर मिळतो किंवा नाहीं; याची चौकशी केली. त्याचप्रमाणें गणेशवाडी, कचरेवाडी, पाटकळ, हिवरगांव, हुजापुर व

खुपसंगी यथील बंडिग सेंटरवर जाऊन मजुरांच्या अडचणी व तक्रारी समजावून घेतल्या व त्यांच्या तक्रारीची दाद लावून देण्याचें आश्वासन दिलें. या महिन्यांत कांहीं निराश्रित कुटुंबांना दर आठवड्यास एक पायली गहूं अगर ज्वारी या प्रमाणांत धान्य वांटण्यांत आलें. याशिवाय १५ जणांना डोल मिळवून देण्यांत आला. लोकांना तगाई मिळण्याबद्दल प्रयत्न करण्यांत आले.

या केंद्रातर्फे डोंगरगांव, खोमनाळ, अकोले, ढवळस अशी चार उपकेन्द्रें चालत होतीं. याविना कचरेवाडी, मळेवाडी, वरणगांव, गणेशवाडी, पाटकळ, खुपसंगी व तळसंगी या ठिकाणीं आठवड्यांतून दोन वेळां लोकांना मदत देण्याचें कार्य सुरू होतें.

होळीचे सणाचें दिवशीं मंगळवेढ्यांत स्वयंसेवकांनीं घरोघर जाऊन ७०० पोळ्या गोळा केल्या. सायंकाळीं त्या संत दामाजीचे देवळांत दुष्कळ पीडितांना वाटल्या. सुरवातीस श्री. भाऊसाहेब करन्दीकर यांनीं छोटेंसें भाषण करून आलेल्या प्रसंगास धैर्यानें तोंड द्यावें, दुष्काळास घाबरू नये, गरजू लोकांना संघ मदत करीलच, असा दुष्काळ पीडितांना धीर दिला. पोळ्यांचें वांटप होत असतांना भजनहि चाललें होतें. सर्वजण पांडुरंगाचें नांव घेत होते. शेवटी संत दामाजीच्या नावाचा जयजयकार होऊन हा कार्यक्रम संपला. रामनवमीनिमित्त येथील श्रीरामाचें मंदिरांत एक हजार दुष्काळ पीडितांना गोड जेवण देण्यांत आलें. या कार्यक्रमासाठीं गांवकऱ्यांनींहि बरीच मेहनत घेतली. दि. १४–५–५३ रोजीं गांवांतील मुलांना खजूर वांटण्यांत आला. अक्षय्य तृतीयेच्या दिवशीं सणासाठीं म्हणून लोकांना प्रत्येक कुटुंबास दोन चार चिपटी गहूं देण्यांत आले. दि. १६–५–५३ रोजीं प्रत्येक उपकेंद्रावर गरजू लोकांना गहूं व कपडे वाटण्यांत आले


या केंद्रासाठीं पुण्याचे एक महाविद्यालयीन विद्यार्थी श्री. मोडक हे या तालुक्यांत १०–१२ दिवस राहून प्रत्येक उप-केंद्रावर जाऊन तेथील दुष्काळ पीडितांना मदत करीत होते.

## येडशी केंद्र

येडशी येथील दुष्काळ विमोचनाचें सर्व काम तेथील सुप्रसिद्ध डॉक्टर, कळकळीचे समाज कार्यकर्ते व संघाचे निष्ठावान स्वयंसेवक श्री. शंकर दत्तात्रय बोरगांवकर हे पहात होते. या भागांत दुष्काळ नव्हता. परंतु दुष्काळी भागांतून कित्येक लोक या भागांत राहण्यासाठीं आले होते. अशा दुष्काळ पीडितांना साधारण

संघ प्रचारक
श्री. आप्पाजी
देवकर गांवोगांवीं
हिंडून गरजू
लोकांना धान्य व
कपडे देत आहेत.





मंगळवेढें केंद्रावर संघचालक
श्री. भाऊसाहेब करंदीकर
खजूर वांटप करीत आहेत.



श्री. विष्णुपंत कुलकर्णी,
टेंभुर्णी केंद्राचे प्रमुख कार्यकर्ते.

१०० लोकांना राहण्यासाठीं जागा आणि झोपड्या करून दिल्या. तसेंच त्यांना कपडे वगैरे दिले.

या ठिकाणीं मदत गोळा करण्याचें कार्य तेथील संघाचे कार्यकर्ते श्री. शिवाजीराव सलावडे यांच्या नेतृत्वाखाली खूप जोरांत झालें. गांवांतून घोषणा करीत मिरवणूक काढीत, स्वयंसेवक धान्य व मदत गोळा करीत होते. पाडव्याचें दिवशीं घरोघर जाऊन स्वयंसेवकांनीं सुमारें एक मण ज्वारी जमविली. रामनवमीचे दिवशीं आसपासच्या गांवांतील एक हजार दुष्काळ पीडितांना गव्हाच्या खिरीचें जेवण देण्यांत आलें. सुमारें ५०० लोकांना येड ी केंद्रावरून कपडे देण्यांत आले.

## सांगोले केंद्र

सांगोले तालुक्यांत कार्यकर्त्यांचे अभावी फारशी मदत करणें शक्य झालें नाहीं. तथापि येथील एक जुने स्वयंसेवक श्री. आबासाहेब घुळप्पा शेंडगे यांनीं सांगोले तालुक्यांतील सावे, वाडेगांव, देवळे, मेथवडे, मांजरी बामणी, भेंडशिंगे, जुनोनी, उदन वाडी, कोळे, चिणके, कमलापूर इत्यादि गांवीं जाऊन दुष्काळ पीडितांना एक हजार कपडे वांटले. संघानें पंढरपूर येथें जमा केलेले ५२ नवीन चोळखण व नवें कापड देवळें, मेथवडे, मांजरी व बामणी या गांवच्या भगिनींना देण्यांत आलें. या कामीं संघाचे स्वयंसेवक श्री. बहिरु गावडे व डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे सभासद आणि कांग्रेसचे कार्यकर्ते श्री. संभाजीराव शेंडे व श्री. यशवंतराव देशमुख यांनीं अतिशय सहाय्य केलें.

## बियाणें वांटप

सोलापूर जिल्ह्यांत रब्बी पिकासाठीं म्हणून टेंभुर्णी, करमाळें, मंगळवेढें सांगोले या तालुक्यांत बियाणें देण्यांत आलें. बियाणें ऐनवेळेच्या आधीं देण्यांत आलें. शेतकऱ्यांच्या भाषेंत म्हणावयाचें झाल्यास मिळालेलें बियाणें वाफेवरील पेरणीस उपयोगी पडलें. बियाणें मिळण्यास दगदग पडणें, अनिश्चित काळपर्यंत थांबून राहणें, इत्यादि अडचण न पडल्याकारणानें शेतकरी वर्ग खुशींत होता. सरकारकडून बियाण्यासाठीं तगाई लवकर मिळावी म्हणून फॉर्म्स छापून घेऊन ते शेतकऱ्यांचेकडून भरून घेऊन त्या त्या तालुक्याच्या मालेदारांचेकडे पाठवून तगाई मिळवून देण्याचे प्रयत्न करण्यांत आले.

## वैद्यकीय मदत

कोल्हापूरची डॉ. पुरोहित फार्मसी यांचेकडून रु. १०० आणि बेंगॉल केमिकल इम्युनिटी फार्मसी यांचेकडून रु. ३०० ची औषधें या जिल्ह्यास मिळालीं. एकूण सुमारें ३००० लोकांना या औषधोपचाराचा उपयोग झाला. कॉलऱ्याच्या साथीमध्यें सहस्त्रावधि लोकांना कॉलऱ्याची लस टोंचण्यांत आली.

## भेटी

रा. स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचारप्रमुख श्री. बाबासाहेब आपटे यांनीं सोलापूर जिल्ह्यांतील दुष्काळी केंद्रांना भेटी देऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलें. प्रांतिक दुष्काळ विमोचन समितीचे अध्यक्ष श्री. का. भा. लिमये यांनीं जिल्ह्याचा विस्तृत दौरा केला. त्याचें वृत्त प्रांतिक इतिवृत्तांत आलेंच आहे.

सरकारच्या दुष्काळी कामाबद्दल एक गोष्ट मात्र सांगावीशी वाटते. सोलापूर जिल्ह्यांत तलावाची कामें सरकारनें अर्धवटच केलीं आहेत, त्यामुळें त्या तलावांत पाणी असूनही केवळ कालवे न काढल्यामुळें त्या पाण्याचा शेतीस कांहींच उपयोग होत नाहीं. पैशापरी पैसा गेला आणि तलावाचा खर्च वाया गेला असे म्हणण्याची पाळी आली आहे. तरी सरकारनें आणखी चार दोन लाख रुपये खर्चून तलावाची कामें पूर्ण केल्यास सोलापूर जिल्ह्यांत जो सतत दुष्काळ पडतो त्यास बराच आळा बसेल.

## एक दुःखदायक प्रसंग

कॉलऱ्याच्या साथीमध्यें ठिकठिकाणच्या केंद्रांतून काम चाललें असतांना टेंभुर्णीला श्री. विष्णुपंत कुलकर्णी यांनीं तर अविश्रांतपणें टेंभुर्णी आणि आसपासच्या गांवांतून कॉलऱ्याची लस टोंचण्याचें काम चालू केलें. पण समाजसेवेच्या आत्यंतिक गर्दीमध्यें घरच्याच स्वतःच्या मातोश्रींना लस टोंचण्याचें राहून गेलें. काळ टपलेलाच होता. त्यानें विष्णुपंतांच्या आईला अचूक उचलून नेलें. विष्णुपंतांच्यावर आकाशांतून कुऱ्हाडच कोसळली. तथापि विष्णुपंतांच्या कामांत रतिभरहि खंड आला नाहीं. मन आवरून दुसऱ्या क्षणापासून दुष्काळ विमोचन समितीचें काम पहिल्याच इतक्या तन्मयतेनें त्यांनीं सुरू केलें.

माणिकचंद वीरचंद शहा.
भा. वा. मुळे.
का. बा. पवार.

२


# सातारा जिल्हा

सातारा जिल्ह्यांतील माण तालुक्यांत पाऊस नेहमींच सुमारांत पडतो. १९५२–५३ सालच्या या दुष्काळांत माण पेट्याबरोबरच खटाव तालुक्याचा पूर्व भाग अजिबात कोरडा राहिला. खंडाळा पेट्यालाहि दुष्काळाची झळ लागलेली होती. खटाव आणि माण या भागांत दुष्काळाची झळ जोरदार होती. तरीहि मुंबई सरकारनें या तालुक्यांतून बराच काळपर्यंत निमदुष्काळ जाहीर केला नाहीं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघानें मात्र दुष्काळ विमोचन समितीची स्थापना झाल्यापासून खटाव तालुक्याकडें लक्ष पुरविलें.

खटाव तालुक्यांतील श्री. भरताग्रज मळेकर आणि संघाचे अन्य कार्यकर्ते यांचे या परिस्थितीकडे ऑक्टोबर १९५२ पासून लक्ष होतें. गोहत्या निरोध आंदोलनाच्या प्रसंगीं खेड्यांपाड्यांतील परिस्थिती त्यांनीं समक्ष पाहिली होती. तथापि डिसेंबर १९५२ आणि जानेवारी १९५३ मध्यें परिस्थिती फारच खालावली. गुरांना खाण्यासाठीं कांहीं उरलें नाहीं, माणसांनाहि पिण्यास पाणी नाहीं

अशी स्थिती झाली. शेतीचें उत्पन्न नाहीं, मोलमजुरीचें काम नाहीं, शिंप्यांना काम नाहीं, विणकऱ्यांजवळ पैसा नाहीं, मेंढयांना चराक्यास कांहीं नाहीं, महारांना बलुते नाहीं, असें होऊन ४—४ दिवस उपवास पडूं लागले. जानेवारी महिन्यांत श्री. मळेकर यांनीं या तालुक्यांतील त्रेपन्न गावांत प्रत्यक्ष जाऊन परिस्थिती पाहून, तेथील आंकडेवार माहिती मिळवून ती वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केली

या जिल्ह्यांत दुर्दैवानें अशी स्थिती घडली कीं, दुष्काळ निवारणासाठीं सर्वपक्षीय सभा झाल्या. दुष्काळ निवारण समित्यांची स्थापना झाली, कांहीं




जणांचे धांवत्या वेगानें दौरे झाले, पण प्रत्यक्ष मदत कांहीं कोणाकडून जवळ जवळ जून अखेरपर्यंत मिळूं शकली नाहीं.

महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीच्या कामास खटाव तालुक्यांत फेब्रुवारी महिन्यांत प्रारंभ झाला, मार्च महिन्यांत श्री. म. र. करंदीकर, बी. एस्. सी,

आणि श्री. छोटालाल गांधी हे दोघे कार्यकर्ते पुण्याहून मायणी येथें गेले. मायणी हें मुख्य केंद्र कल्पून कार्यास प्रारंभ करण्यांत आला. मायणी येथील तरुण स्वयंसेवकांच्या तुकड्या करून त्यांना जवळपासच्या दातेवाडी, मुळूकवाडी, कलेढोण, मानेवाडी, कुरोली, कातरखटाव, नायकाची वाडी, इत्यादि छत्तीस गांवांत धाडण्यांत आलें. या स्वयंसेवकांनीं वरील खेड्यांतील प्रत्येक घरांत जाऊन कोणास काय नाहीं, कोणाची स्थिती कशी आहे याची पाहणी करून नोंद केली.

नोंद केलेल्या कुटुंबांना दुसऱ्या खेपेस कपडे आणि धान्य देण्यांत आलें. एकूण छत्तीस गावांतील अत्यंत गरजू अशा ४९५ लोकांना दुष्काळाचा भर ओसरेपर्यंत धान्य देण्यांत आलें. सव्वीस गांवांतील १३१६ व्यक्तींना कपडे देण्यांत आलें. सात गावांतील अनवाणी लोकांना पादत्राणें देण्यांत आलीं. अनेकांना औषधोपचार करण्यांत आला. कित्येक लहान मुलांना दीड महिना दूध देण्यांत आले.

एप्रिल महिन्याच्या चौथ्या आठवड्यांत श्री. करंदीकर हे पुण्यास आले आणि श्री. गांधी हे आपल्या गांवीं गेलें. त्यांच्या जागीं बी. ओ. च्या अखेरच्या वर्गांत असलेले पुण्याचे कार्यकर्ते श्री. पंडितराव जावडेकर हे आले.

दि. २२-४-५३ या दिवशीं या केंद्रास सातारा जिल्हा संघचालक श्री. विठ्ठलराव करंदीकर यांनी भेट दिली. त्याच दिवशीं सायंकाळीं मायणी-म्हसवड या रस्त्यावरील दुष्काळी मजुरांना आणि शेतकऱ्यांना आमटी भाकरीचें जेवण देण्याचा कार्यक्रम ठरला होता. या कार्यक्रमासाठीं कऱ्हाड, कोळे ( ता. कऱ्हाड ), विटे ( ता. खानापूर ), इत्यादि ठिकाणाहून सुमारे ५००० भाकऱ्या गोळा करण्यांत आल्या होत्या. या जेवणाच्या प्रसंगी अध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तिचे मल्ल श्री. श्रीरंग जाधव यांनीं मुद्दाम कोल्हापूराहून येऊन या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वीकारले होतें. दि. २२ ला सकाळींच कऱ्हाड, वडूज मायणी येथील स्वयंसेवक मायणी – म्हसवड रस्त्यावरील हिवरवाडी येथें एकत्र झाले. बॅ. करन्दीकर आणि जिल्हा प्रचारक श्री. गोपाळराव देशपांडे हे अध्यक्ष श्री. श्रीरंग जाधव यांचेसह दुपारीं तेथें आलें. सायंकाळपर्यंत सुमारे ८०० स्त्री-पुरुष शेतकरी पोटभर जेवलें. कित्येकांना दुसऱ्या दिवसासाठीहि भाकरी देण्यांत आल्या श्री. श्रीरंग जाधव आणि बॅ. विठ्ठलराव करंदीकर यांनीं स्वतः पंक्तिमध्यें भाकरी आणि गूळ वाढला. भोजनोत्तर श्री. विठ्ठलराव करन्दीकर यांचें भाषण होऊन या सर्व शेतकरी बंधूना कपडे वांटण्यांत आले.

दि. २३-४-५३ ला मायणी येथेंहि दुष्काळग्रस्तांना भाकरी देण्यात आल्या त्याच दिवशीं दरुज धरणावरील कामास श्री. विठ्ठलराव करन्दीकर यांनीं अन्य



कुरकुंडवाळ केंद्र

भोजनाचे पंक्तींत श्री. श्रीरंग जाधव आणि डॅ. विठ्ठलराव करंदीकर वाढीत आहेत

कार्यकर्त्यांसमवेत भेट देऊन तेथील दुष्काळी मजुरांच्या स्थितीची चौकशी केली. तेथील शेतकऱ्यांनाहि भाकरी, चटणी आणि कांदे वांटण्यांत आले.

मायणी–म्हसवड रस्त्यावरील भाकरीच्या जेवणाच्यावेळीं विघ्नसंतोषी लोकांनीं एक विलक्षण प्रकार केला. महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीतर्फे इतक्या सुव्यवस्थितपणें दुष्काळग्रस्तांना मदत होते हें न रुचून, या जेवणाच्या वेळेस वाढण्याच्या भाकऱ्यांतून विष कालविलेलें आहे असा भयंकर समज या समाजकंटकांनीं शेतकऱ्यांत पसरवून दिला. समितीच्या कार्यकर्त्यांना प्रथम याची कल्पना नव्हती, जेवणाची वेळ झाली, समोर शेंकडों स्त्री-पुरुष शेतकरी अत्यंत भुकेलेल्या स्थितींत उभे होते. पण प्रत्यक्ष जेवावयास चला म्हटल्यावर कोणी येईना. "कां येत नाहीं" विचारल्यास कोणी उत्तर देईना. पोटांत भूक लागलेली, पण जेवावयास येण्यास तयार नाहीं अशी ही विमनस्क स्थिति पाहून

स्वयंसेवकांनाहि काय करावें तें सुचेना. अखेर कळलें कीं, भाकऱ्यांतून विष घातल्याची अफवा पसरली आहे म्हणून. मग समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण समजूत कोठली पटावयास ? अखेर त्याच भाकरी पुढ्यांत घेऊन स्वयंसेवक जेवावयास बसले, त्यांनीं त्या विषकथाभरित भाकऱ्या खाल्ल्या. तेव्हां संशय फिटून लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊन भोजनास बसल्या आणि मग जेवण यथासांग पार पडलें.

डोल :- इतर सर्व जिल्ह्यांतून दुष्काळग्रस्तांपैकीं अगदीं निराश्रित लोकांना सरकारकडून डोल मिळण्याची व्यवस्था जानेवारी फेब्रुवारी पासूनच झाली होती. पण सातारा जिल्ह्यांत ही व्यवस्था मे महिन्याचे अखेरपर्यंत होऊं शकली नाहीं. समितीनें त्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांना भेटून पत्रव्यवहार करून बरीच खटपट केली. सोळा गांवच्या शहात्तर निराश्रितांची पाहणी करून त्यांची नांवें संबंधित अधिकाऱ्यांचेकडे दिली. तथापि अगदीं मे महिन्याचे अखेरीस त्यांतील ४०-४५ लोकांना डोल मिळूं लागला. अखेर या भागांतील अठ्ठावीस गांवांच्या १०४ लोकांना सरकारकडून डोल मिळूं लागला. म्हणजे डोल देण्याचें प्रमाण किती अल्प होतें हें ध्यानीं येईल.

पिण्याच्या पाण्याची सोय:- कित्येक गावांतून पिण्याच्या पाण्याचे अत्यंत हाल चाललेले श्री. मळेकर यांच्या प्रत्यक्ष पाहण्यांत आले होते. विशेषत: हरिजनांना पाणी मिळण्याची फारच पंचाईत पडे. या दृष्टीनें मायणी जवळील अनफळ ओढयांत हेळ खोदून पाण्याची सोय समितितर्फे करण्यांत आली. बाकीच्या गांवांच्या व्यवस्थेसाठीं तालुक्याचे मान्यवर मामलेदार आणि रूरल डेव्हलमेंट बोर्डाचे श्री. लिमये यांच्याकडे बोलणें केले. तथापि त्यांनीं दुष्काळी कायद्याच्या कलमांकडें बोट दाखवून सोय करणें अशक्य आहे असें म्हटल्यानें राज्यस्व मंत्री, श्री. भाऊसाहेब हिरे यांना पत्र लिहिण्यांत आलें. त्यांच्या कचेरी-कडून सुमारें महिनाभरानें " पिण्याच्या पाण्याची सोय करीत आहोत " या अर्थाचे उत्तर आलें. मुंबई सरकारकडून अशा प्रकारें तालुक्याचे अधिकाऱ्यांना लिहून आल्यावर सुमारें तीस गांवीं प्रत्येकीं १०० ते ४०० रुपयांपर्यंत मदत देण्यांत आली असें कळलें. समितीच्या कार्यकर्त्यांनीं मंत्र्यांचेकडे परस्पर पत्रव्यवहार केला हें सरकारी अधिकाऱ्यांना रुचलें नाहीं.

सरकारी कामावरील शेतकऱ्यांची चौकशी:- खटाव तालुक्यांत मुख्यत: मायणी-म्हसवड रस्त्याचें आणि दरूज दरजाओ येथें धरणाचें अशीं दोन दुष्काळीं कामें सरकारतर्फे चालूं होतीं. या दोन्हीं ठिकाणीं समितीच्या कार्यकर्त्यांनीं वारंवार जाऊन मजूरी कमी कां पडते, कोणावर अन्याय होतो कीं काय याची चौकशी करून जरूर तेथें अधिकाऱ्यांना भेटून अन्याय दूर करविला.

### बीं-बियाणें वांटप

या वर्षी सामान्यपणें पाऊस बरा होऊन पहिलें पीक तरी चांगलें झालेलें आहे. पेरणीच्या वेळीं समितितर्फे ११ गांवच्या अत्यंत गरजू अशा शेतकऱ्यांना प्रत्येकीं रु. २ पासून रु. २० पर्यंत बीं वांटप करण्यांत आलें.

### दुष्काळ हटविण्याची योजना

हा तालुका आसपासच्या प्रदेशापेक्षां उंचावर असून दुसरीकडील धरणांचे पाणी येथें आणणें शक्य नाहीं. अशा स्थितींत. येथें पडणाऱ्या पावसाचें पाणी जागोजाग लहान लहान धरणें बांधून आणि असलेल्या धरणांची ऊंची वाढवून अडवून ठवल्यानेंच होणार आहे.

### माण तालुका

माण तालुक्यांतील पंचेचाळीस गांवांतून दुष्काळ होता. तथापि कार्यकर्त्यांच्या अभावीं तेथें धान्य वांटप इत्यादि काम करतां आलें नाहीं. सवनीसवाडी आणि आसपासच्या गावांतील दुष्काळग्रस्तांना सुमारें दोन हजार कपडे वांटण्यांत आले.

### इतर तालुक्यांतून झालेले प्रयत्न

सातारा जिल्ह्यांतील वाई, सातारा कऱ्हाड इत्यादि तालुक्यांत दुष्काळ असा नव्हता. या तालुक्यांतून कपडे, धान्य व पैसे जमा करण्यांत आले. सातारा येथें जिल्हा कार्यवाह श्री. मुकुंदराव दाबके यांच्या सहाय्यानें तेथील संघ स्वयंसेवकांनीं धान्य, कपडे, इत्यादि गोळा करून ती मदत तेथील सर्वपक्षीय समितीच्या स्वाधीन केली व पुढें त्याचे वांटप दरूज येथील धरणाचे बांधकामावरील मजुरांमध्ये केलें.

वाई शहरांतून आणि आसपासच्या खेड्यांतून सुमारें ६ पोतीं धान्य व एक हजार कपडे गोळा करण्यांत आले. कऱ्हाड भागांतूनहि सुमारें ५ पोतीं धान्य आणि एक हजार कपडे गोळा झाले. एकट्या कोळे या गांवानेंच २ पोतीं ज्वारी जमवून दिली. सांगली जिल्ह्यांतील विटें या गांवांतून १ पोतें धान्य खटावला पाठविण्यांत आलें. कऱ्हाडमधून हिंदु मिशनचे अध्यक्ष श्री. गोपाळराव बदामी यांनीं गांवांतून

स्वयंसेवकांनाहि काय करावें तें सुचेना. अखेर कळलें कीं, भाकऱ्यांतून विष घातल्याची अफवा पसरली आहे म्हणून. मग समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण समजूत कोठली पटावयास? अखेर त्याच भाकरी पुढयांत घेऊन स्वयंसेवक जेवावयास बसले, त्यांनीं त्या विषकथाभरित भाकऱ्या खाल्ल्या. तेव्हां संशय फिटून लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊन भोजनास बसल्या आणि मग जेवण यथासांग पार पडलें.

डोल :- इतर सर्व जिल्ह्यांतून दुष्काळग्रस्तांपैकीं अगदीं निराश्रित लोकांना सरकारकडून डोल मिळण्याची व्यवस्था जानेवारी फेब्रुवारी पासूनच झाली होती. पण सातारा जिल्ह्यांत ही व्यवस्था मे महिन्याचे अखेरपर्यंत होऊं शकली नाहीं. समितीनें त्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांना भेटून पत्रव्यवहार करून बरीच खटपट केली. सोळा गांवच्या बहात्तर निराश्रितांची पाहणी करून त्यांची नांवें संबंधित अधिकाऱ्यांचेकडे दिली. तथापि अगदीं मे महिन्याचे अखेरीस त्यांतील ४०-४५ लोकांना डोल मिळूं लागला. अखेर या भागांतील अठ्ठावीस गांवांच्या १०४ लोकांना सरकारकडून डोल मिळूं लागला. म्हणजे डोल देण्याचें प्रमाण किती अल्प होतें हें ध्यानीं येईल.

पिण्याच्या पाण्याची सोय:- कित्येक गावांतून पिण्याच्या पाण्याचे अत्यंत हाल चाललेले श्री. मळेकर यांच्या प्रत्यक्ष पाहण्यांत आले होते. विशेषत: हरिजनांना पाणी मिळण्याची फारच पंचाईत पडे. या दृष्टीनें मायणी जवळील अनफळ ओढयांत हेळ खोदून पाण्याची सोय समितितर्फे करण्यांत आली. बाकीच्या गांवांच्या व्यवस्थेसाठीं तालुक्याचे मान्यवर मामलेदार आणि रूरल डेव्हलमेंट बोर्डाचे श्री. लिमये यांच्याकडे बोलणें केले. तथापि त्यांनीं दुष्काळी कायद्याच्या कलमांकडें बोट दाखवून सोय करणें अशक्य आहे असें म्हटल्यानें राज्यस्व मंत्री, श्री. भाऊसाहेब हिरे यांना पत्र लिहिण्यांत आलें. त्यांच्या कचेरी-कडून सुमारें महिनाभरानें "पिण्याच्या पाण्याची सोय करीत आहोत" या अर्थाचें उत्तर आलें. मुंबई सरकारकडून अशा प्रकारें तालुक्याचे अधिकाऱ्यांना लिहून आल्यावर सुमारें तीस गांवीं प्रत्येकीं १०० ते ४०० रुपयांपर्यंत मदत देण्यांत आली असें कळतें. समितीच्या कार्यकर्त्यांनीं मंत्र्यांचेकडे परस्पर पत्रव्यवहार केला हें सरकारी अधिकाऱ्यांना रुचलें नाहीं.

सरकारी कामावरील शेतकऱ्यांची चौकशी:- खटाव तालुक्यांत मुख्यत: मायणी-म्हसवड रस्त्याचें आणि दरूज दरजाई येथें धरणाचें अशीं दोन दुष्काळी कामें सरकारतर्फे चालू होतीं. या दोन्हीं ठिकाणीं समितीच्या कार्यकर्त्यांनीं वारंवार जाऊन मजूरी कमी कां पडते, कोणावर अन्याय होतो कीं काय याची चौकशी करून जरूर तेथें अधिकाऱ्यांना भेटून अन्याय दूर करविला.

### बीं-बियाणें वांटप

या वर्षी सामान्यपणें पाऊस बरा होऊन पहिलें पीक सरी चांगलें झालेलें आहे. पेरणीच्या वेळीं समितितर्फे ११ गांवच्या अत्यंत गरजूं अशा शेतकऱ्यांना प्रत्येकीं रु. २ पासून रु. २० पर्यंत बीं वांटप करण्यांत आलें.

### दुष्कांळ हटविण्याची योजना

हा तालुका आसपासच्या प्रदेशापेक्षां उंचावर असून दुसरीकडील धरणांचे पाणी येथें आणणें शक्य नाहीं. अशा स्थितींत. येथें पडणाऱ्या पावसाचें पाणी जागोजाग लहान लहान धरणें बांधून आणि असलेल्या धरणांची ऊंची वाढवून अडवून ठवल्यानेंच होणार आहे.

### माण तालुका

माण तालुक्यांतील पंचेचाळीस गांवांतून दुष्काळ होता. तथापि कार्यकर्त्यांच्या अभावीं तेथें धान्य वांटप इत्यादि काम करतां आलें नाहीं. सबनीसवाडी आणि आसपासच्या गावांतील दुष्काळग्रस्तांना सुमारें दोन हजार कपडे वांटण्यांत आले.

### इतर तालुक्यांतून झालेले प्रयत्न

सातारा जिल्ह्यांतील वाई, सातारा कऱ्हाड इत्यादि तालुक्यांत दुष्काळ असा नव्हता. या तालुक्यांतून कपडे, धान्य व पैसे जमा करण्यांत आले. सातारा येथें जिल्हा कार्यवाह श्री. मुकुंदराव दाबके यांच्या सहाय्यानें तेथील संघ स्वयंसेवकांनीं धान्य, कपडे, इत्यादि गोळा करून ती मदत तेथील सर्वपक्षीय समितीच्या स्वाधीन केली व पुढें त्याचे वांटप दरूज येथील धरणाचे बांधकामावरील मजुरांमध्ये केले.

वाई शहरांतून आणि आसपासच्या खेड्यांतून सुमारें ६ पोतीं धान्य व एक हजार कपडे गोळा करण्यांत आले. कऱ्हाड भागांतूनहि सुमारें ५ पोतीं धान्य आणि एक हजार कपडे गोळा झाले. एकट्या कोळे या गांवानेंच २ पोतीं ज्वारी जमवून दिली. सांगली जिल्ह्यांतील विटें या गांवांतून १ पोतें धान्य खटावला पाठविण्यांत आलें. कऱ्हाडमधून हिंदु मिशनचे अध्यक्ष श्री. गोपाळराव बदामी यांनीं गांवांतून

मदत जमा करून ती दुष्काळ विमोचन समितीस दिली. कऱ्हाड येथील कार्यांत राष्ट्रसेविका समिति, श्री. आठल्ये, श्री. गोपाळराव देव यांनीं गोळा केलेले कपडे शिवून दिले. श्री. भागवत, श्री. शाळीग्राम, आणि कऱ्हाड पॉवर लॉंड्री यांनीं कपडे धुवून दिले. आरे आणि कंपनी, श्री. अराणके, श्री. गुमास्ते, श्री. बाळासाहेब जोशी यांनीं वाहातुकीमध्यें सहाय्य केलें. श्री. हर्डीकर यांनीं ध्वनिवर्धक वापरूं दिले. कोरेगांव येथील म्हसवड मोटार युनियनचे मॅनेजिंग डायरेक्टर यांनीं कापडांच्या गठ्ठ्यांची वहातुक विनामूल्य केली.

वि. र. करंदीकर.

३

# पुणें जिल्हा

पुणें जिल्ह्यांत इंदापूर, शिरुर, पुरंदर या तालुक्यांतील कांहीं भागांतून प्रतिवर्षी सामान्यतः दुष्काळ असा असतोच. १९५२-५३ च्या दुष्काळांत या भागावर फार मोठी आपत्ती कोसळली. त्याच्या जोडीला हवेली तालुक्यांतील पूर्वभाग, दौंड तालुका यावरहि कोरड्या दुष्काळाची छाया पसरली. ऑक्टोबर महिन्यापासून दुष्काळाचीं पावलें ऐकूं येत होतीं. डिसेंबर महिन्यांतच इंदापूर तालुक्यांत त्याचे भीषण परिणाम दिसूं लागले. जनावरांना चारा नाहीं, पिण्यास पाणी नाहीं, शेतकऱ्यांना खावयास धान्य नाहीं असें होऊन शेकडों जनावरें मृत्युमुखीं पडलीं. शेतकऱ्यांना आठ दिवसात तीन तीन चार चार उपवास पडूं लागले.

महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीच्या स्थापनेनंतर जानेवारी महिन्यांत दुष्काळ विमोचनार्थ प्रयत्न सुरूं झाले. पुणें शहर संघचालक श्री. विनायकराव आपटे, महाराष्ट्र प्रांत प्रचारक श्री. बाबाराव भिडे आणि अन्य अधिकारी यांनीं इंदापूर, दौंड या भागांत जाऊन पाहणी करून इंदापूर येथें तातडीनें मदतकेंद्र चालूं करण्याबाबत

व्यवस्था केली. जिल्ह्याच्या ज्या इतर तालुक्यांतून दुष्काळ नव्हता तेथून धान्य, पैसे, कपडें इत्यादि मदत मिळविणें या कामास जोराची उठावणी घेण्यांत आली.




## इंदापूर केंद्र

इंदापूर येथें फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यांत कामास प्रारंभ करण्यांत आला. मे महिन्यांत शिरुर तालुक्यांतहि मदत देण्याचें काम चालूं करण्यांत आलें. इंदापूर तालुक्यांत इंदापूर, न्हावी आणि कळाशी या तीन केंद्रांतून तालुक्यांतील अधिकांत अधिक भागांत मदत देण्यात येत होती. शिरुर तालुक्यांत रांजणगांव गणपति, दहिवडी आणि राऊतवाडी ही गांवें मुख्य कल्पून तेथून इतरत्र मदत पाठविण्यांत येत होती. या केंद्रांचा वृत्तांत खालीं दिल्याप्रमाणें आहे.

डिसेंबर महिन्याच्या प्रारंभापासूनच इंदापूर शाखेंतील संघ कार्यकर्ते स्वतः दुष्काळाच्या भीषण तडाख्यांत सांपडलें असतांनासुद्धां दुष्काळ पडलेल्या कांहीं

गावीं जाऊन तेथील लोकांचीं केविलवाणी स्थिती पाहून त्यांना धीर देऊन परत आले. त्यानंतर इंदापूर येथें स्वयंसेवकांच्या बैठकींत त्यानीं सांगितलें कीं या स्थितींत आपण जर त्वरित उपाययोजना केली नाहीं तर अन्नवस्त्रांच्या अभावी हजारों लोक तडफडून मेल्यावांचून राहणार नाहींत.

या तालुक्यांत एकूण ६५ गांवीं दुष्काळ जाहीर करण्यांत आला होता. दुष्काळी गांवांतून श्री. रमाकांत पराडकर, श्री. वामनराव गोसावी, श्री. दिगंबरराव वाघमोडे, श्री. भीमराव शिंदे, आदि कार्यकर्त्यांनीं कधीं पायीं तर कधीं दुचाकीवरून प्रत्यक्ष जाऊन विस्तृत माहिती घेतली. सर्व ठिकाणीं हजारों लोक कामाविना होते. काम मिळण्यावरच त्यांचे जगणें अवलंबून होतें. तालुक्यांतील अनेक जनावरें चाऱ्याविना मृत्यूमुखीं पडलीं होतीं. ही परिस्थिती त्यांनीं वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केली, आणि सरकारी काम सुरू करण्याबद्दलची आवश्यकता जनतेपुढें मांडली. इंदापूर येथें दौऱ्यावर असलेले पुणें जिल्हाधिकारी, व ना. श्री. भाऊसाहेब हिरे यांना भेटून परिस्थितीची भीषणता त्यांचे ध्यानीं आणून दिली.

दुष्काळ पीडितांना मदत देण्यासाठीं व विचारविनिमय करण्यासाठी तालुक्यांतील कांहीं स्वयंसेवकांची बैठक होऊन त्यांत इंदापूर तालुक्यांतील रा. स्व. संघाचे संघचालक श्री. मा. गो. जोशी वकील, यांच्या अध्यक्षतेखालीं मदत-केंद्र स्थापन करण्यांत आलें. त्या बैठकींत दुष्काळ पीडितांना धान्य, कपडे, औषधोपचार, तक्रारींचें निवारण, डोल मिळवून देणें, दूध वांटप आदींची मदत देणें, व कॅनॉल भागांतून मदत गोळा करणें अशा प्रकारें निश्चित कामाची रूपरेषा आखून दि. ८-२-५३ रोजीं प्रत्यक्ष कामास प्रारंभ करण्यांत आला.

इंदापूर येथील भर पेठेंत असलेल्या श्री विठ्ठल मंदिराचे बाहेर मदत केंद्राचा फलक लागतांच शेंकडों लोक मदतीसाठीं, कोणी डोल मिळवून द्या अशी विनंती करण्यासाठीं, तर कोणी काम मिळवून द्या असें सांगण्यासाठीं कार्यालयांत येऊं लागले. गांवांतील अनेक प्रतिष्ठित लोक प्रत्यक्ष सहाय्य देण्यासाठीं सिद्ध झाले. श्री. जावडेकर गुरुजी, श्री. प्रतापराव सूर्यवंशी, श्री. नाथसाहेब काटे, श्री. दामुअण्णा पाटील, श्री. व्यवहारे, श्री. पाठक, श्री. वसंतराव वाघ (लासुर्णे), आमदार श्री. शंकरराव पाटील व मामलेदार श्री. सोनार यांनीं प्रत्यक्ष सहाय्य केल्यामुळें कामांत फारच सुकरता निर्माण होऊन कार्य त्वरेनें होऊं लागलें.




इंदापूर केंद्र

श्री. माधवराव जोशी व श्री. दिगंबरपंत वाघमोडे धान्य वांटत आहेत.

### मदतकार्य

अत्यंत गरजूं लोकांना धान्य देणें. तरंगवाडी व अन्य दुष्काळी कामावरील मजुरांची विचारपूस व त्यांच्या तक्रारी निवारण करणें. प्रथमोपचार व आजारी यांना वैद्यकीय सहाय्य देणें. लहान मुलांना दूध वांटणें, कपडे वांटणें इत्यादि कामें केंद्राकडून करण्यांत येऊं लागलीं. इंदापूर व त्याच्या पंचक्रोशींतील अनेक गांवांतील लोकांना या केंद्राची माहिती मिळतांच सहाय्यासाठीं अक्षरशः शेंकडों लोक येऊं लागले.

### कपडयांचे वांटप

सर्वत्र भगिनी वर्गांत लुगडयांची अतिशय वाण आढळून येत होती. वस्त्र-हीन पुरुषवर्ग कसेंतरी लंगोटी लावून उघडया अंगानें काम करीत होते. केंद्रांत

येणाऱ्या अनेक स्त्रियांना लज्जा राखण्यापुरतें देखील अंगावर कांहीं नव्हतें. त्यांना देण्यासाठीं केंद्रांत लुगडीं फारच कमी होती. शक्य तेवढें प्रयत्न करून गरजूंना कपडे वांटण्यांत येत होते गांवोगांव जाऊन स्वयंसेवकांनीं कपडे वांटप केलें. अशा प्रकारें इंदापूर केंद्रांतून दोन हजार लोकांना कपडे वांटप करण्यांत आलें.

## धान्य वांटप

अत्यंत गरजूं लोकांना धान्य वांटप होत असे. सरकारी कामावर शेतकऱ्यांना आठवड्यांच्या रोजगारांत अर्धपोटीं राहूनहि शेवटचे दोन दिवस उपाशी रहावें लागत असें. तेव्हां त्या दोन दिवसांपुरतें धान्य त्यांना देण्यास समितीनें प्रारंभ केला. अक्षरशः अर्धपोटीं राहून दुसऱ्या दिवशीं भर उन्हांत काम करणारा पुरुष वर्ग व भगिनी वर्ग पाहिला म्हणजे संघ कार्यकर्त्यांच्या अंतःकरणांत कालवाकालव होई. आपल्या भारतवर्षांतील यच्चयावत हिंदूंना याची जाणीव असती व संघाच्या कार्यास मदत असती तर हा दुष्काळ लोकांना जाणवूनच दिला नसता असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं. दुष्काळ विमोचनाचें कार्य सुरू झाल्याबरोबर काम करण्यासाठीं अनेक स्वयंसेवक पुढें आले. दोन दोन स्वयंसेवकांच्या जोड्या ठरवून त्यांना जवळपासच्या खेड्यांत जाऊन अत्यंत गरजूं लोकांना धान्य देण्यासाठीं धाडण्यांत येऊं लागले. या ठिकाणांहून ८०० पेक्षां अधिक कुटुंबांना धान्य देण्यांत आलें.

## औषधोपचार

खेड्या खेड्यांतून हिंडणाऱ्या स्वयंसेवकांकडून लोक आजारी असल्याबद्दलची माहिती कार्यालयांत वारंवार येत असे. डॉक्टरांचे औषध घेण्यासाठीं पैसा नसल्यामुळें लोक घरोघरीं बसत. अशा अवस्थेंत इंदापूर मदत केंद्रांतून आजाऱ्यांना औषधोपचार होऊं लागला. पुण्याहून सर्व प्रकारची औषधें आलेलीं होतीं. इंदापूर येथील डॉक्टर श्री. बडवे आणि डॉ. श्री. पेंडसे यांनीं सहकार्य दिल्यानें औषधोपचाराचें काम बरें करतां आलें. अशा प्रकारें २५० लोकांना वैद्यकीय सहायता देण्यांत आली.

## तक्रार निवारण

कामावरील मजुरांच्या तक्रारी येत असत. त्यांचे निवारण करण्यासाठीं स्वयंसेवक कामावर जाण्याकरतां सिद्ध असत. कांहीं तक्रारी मजुरांच्या गैर-

समजुतीमुळें होत असत. उदाहरणार्थ-पाणी शुद्ध होण्यासाठीं विहिरींत पोटॅशिअम परमँगॅनेट टाकल्यामुळें पाणी लाल होई मजूर पाणी वाईट आहे अशी तक्रार करीत. अशा वेळीं मजुरांची समजूत काढली जाई. कांहीं वेळां तक्रारी खऱ्या असत. अशा तक्रारींचें निवारण होण्यासाठीं त्यांचेकडून अर्ज लिहून तो योग्य अधिकाऱ्यांचे पुढें ठेवला जाई, आणि त्यांचे निवारण करून घेतलें जाई.

## डोल मिळवून देणें

खेड्याखेड्यांत पाहणी करण्यांस जातांना डोल मिळवून देण्यास योग्य अशांची नांवें घेतली जात असत, व डोल मिळवून देण्याच्या बाबतींत तालुक्याचे मामलेदार श्री. सोनार यांनीं या कामांत फारच दक्षतापूर्वक लक्ष दिल्यामुळें जनतेला खूपच आधार मिळाला. समितीकडून जाणाऱ्या प्रत्येक अर्जाची मे. मामलेदारसाहेब तत्परतेनें चौकशी करून डोल मंजर करीत समितीच्या कार्यकर्त्यांकडून आलेली माहिती निश्चितपणें योग्यच असली पाहिजे अशी अधिकारी वर्गाची अखेर खात्री झाली. अशा प्रकारें एकूण २०० लोकांना डोल मिळवून देण्यांत आला. इंदापूर मदतकेंद्राची व्यवस्था श्री. वामनराव गोसावी हे पहात असत. संघ कार्यांत अनेक वर्षें काम केल्यामुळें जनतेचें दुःख जाणून घेऊन त्याकरतां झटणें हा त्यांचा स्वभाव झाला आहे. ते अहोरात्र खपत असत. श्री. दिगंबरराव वाघमोडे आणि श्री. बापूसाहेब जठार यांचा तेल घाण्याचा व्यवसाय आहे. पण दुष्काळामुळें घाणे बंद पडले. अशा बिकट अवस्थेंतहि त्यांनीं श्री. वामनराव यांचे बरोबरीनें कांकणभर अधिकच काम केलें. श्री. भिमराव शिंदे यांचेहि या कामीं अहोरात्र परिश्रम चालू होते. पुण्याहून आलेले श्री. गोविंदराव मालशे मार्च महिनाअखेर होते. नंतर श्री. रामभाऊ नाईक, श्री. उत्तमराव डांगरे यांनीं पुण्याहून जाऊन काम केलें. श्री. रमाकांत पराडकर यांनीं कार्याचा विडाच उचलला होता.

## प्रासंगिक विशेष कार्यक्रम

होळीच्या सणाच्या दिवशीं तरंगवाडीचे कामावरील सुमारे ८०० स्त्री-पुरुष शेतकऱ्यांना प्रत्येकीं पाव शेराप्रमाणें गहूं वांटण्यांत आला. ऐन सणाचे दिवशींच गहूं मिळाल्यामुळें लोक आनंदित होते.

२. रंग पंचमीचें दिवशीं दुष्काळ पीडितांना आपल्या दुःखाचा विसर पडावा या हेतूनें चार हजार लोकांना खीर पोळीचें जेवण देण्यांत आलें. त्या कार्यक्रमाची माहिती गावांतील व तरंगवाडी तलावावरील

आसपासच्या गांवांतील लोकांना अगोदरच करून दिली होती. दुपारीं पोळ्या व गूळ घेऊन गाडी येणार म्हणून शेंकडों लोक वाट पहात होते. संघ स्वयंसेवक हा सर्व कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून रात्रंदिवस खपत होते. या कार्यक्रमासाठीं माळी गल्लींतील राऊत व शिंदे मंडळींनीं भांडी दिली व प्रत्यक्ष खीर बनविण्यासाठीं मोठी मेहनत घेतली. कॅनॉल भागांतील बागाईतदारांनीं गूळ देऊन मदत केली. अध्यक्ष श्री. माधवराव जोशी, वकील, यांनी खूपच परिश्रम केले. दुपारीं ५ वाजतां पंक्ति जेवावयास बसल्या. पुण्याहून श्री. विनायकराव आपटे, श्री. भाऊसाहेब देशमुख, श्री. वि. वि. पेंडसे आदि कार्यकर्ते उपस्थित होते. गांवांतील अनेक प्रतिष्ठित लोक उपस्थित होते. मे. मामलेदारसाहेबहि उपस्थित होते. खरोखरीं कित्येक वर्षेपर्यंत हा दिवस विसरणें शक्य नाहीं, असा कार्यक्रम झाला. शेंकडों लोकांनीं संघ स्वयंसेवकांना धन्यवाद दिले. बाया बापड्यांनींहि आशिर्वाद दिले.

३. या कार्यक्रमानंतर सुमारें दोन महिन्यांनीं तरंगवाडी तलावावर वैशाखी पौर्णिमेला पुन्हां ३००० लोकांना खिरीचें जेवण देण्यांत आले. ह. भ. प. संत गयाबाई मनमाडकर यांनीं कुलावा जिल्ह्यांत धान्य जमवून या कार्यक्रमांत सहाय्य केलें. त्या स्वतः या कार्यक्रमास उपस्थित असल्यामुळें लोकांचा उत्साह द्विगुणित झाला. श्री. जाधव, मे. मामलेदार, शाळेचे मुख्याध्यापक श्री. केळकर हे उपस्थित होते. तरंगवाडी कामावरील सरकारी अधिकाऱ्यांनीं पाणी, भांडी आदि साहित्य देऊन आनंदानें सहकार्य केलें. त्याच दिवशीं रात्रौ संत गयाबाई यांचे सुश्राव्य कीर्तन झालें.

## भेटी

बावड्याचे श्री. प्रतापराव सूर्यवंशी, भिगवणचे श्री. नाथसाहेब काटे, इंदापूरचे श्री. जावडेकर गुरुजी, कॉंग्रेस कमिटीचें अध्यक्ष श्री. केरबा व्यवहारे डॉ. पेंडसे, डॉ. जोशी, यांनीं समितीच्या कार्यालयास भेट देऊन कामाची नोंद वही पाहिली. महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीचें अध्यक्ष श्री. काशिनाथपंत लिमये यांनीं ३ मार्च १९५३ रोजीं इंदापूरच्या मदत केंद्रास भेट देऊन पाहणी केली. तरंगवाडी येथील कामावर जाऊन त्यांनीं सर्व मॅगमन्सना एकत्र बोलावून त्यांच्या अडचणी व तक्रारी समजावून घेतल्या. तसेंच सरकारी अधिकाऱ्यांच्या मुलाखती ऐकून घेऊन मजुरीचे दर व तक्रारी त्यांच्यासमोर मांडल्या. त्याच दिवशीं त्यांनीं न्हावी केंद्रास भेट दिली. तेथें त्यांचें हस्ते कपडे वाटप करण्यांत आलें.

## विशेष प्रसंग

१) डोल मिळवून देण्याच्या बाबतींत केंद्राचे कार्यकर्ते अत्यंत दक्ष असत. न्हावी गांवीं श्री. काशिनाथपंत लिमये गेले असतांना एक मुसलमान आपल्या कुटुंबियांची दयनीय स्थिती सांगत आला. त्याला डोल मिळवून देण्याची तांतडीनें व्यवस्था करण्यांत आली.

२) सुगांव येथून तरंगवाडी येथें कामासाठीं आलेले १६ मजूर रात्रौ इंदापुरास आले. त्यांना रात्रौ जेवण मिळाले नव्हतें. हें समजतांच त्यांना बोलावून आणून त्यांची व्यवस्था करण्यांत आली. दुसरें दिवशीं त्यांना तरंगवाडी येथें काम देवविण्यांत आलें. असे प्रसंग बहुधा दिवसाआड येतच असत.

३) वडापुरी येथें एक दुष्काळपीडित आजारी असल्याची बातमी मिळतांच संघस्वयंसेवकांनीं लागलीच रातोरात त्या गांवीं जाऊन त्याच्या औषधपाण्याची व खाण्याची व्यवस्था केली. तसेंच शिवमली येथील एका आसन्नमरण बाईना इंदापुरास आणून औषधोपचार केला.

## मदत गोळा करण्याचें कार्य

समितीच्या कार्यकर्त्यांनीं या तालुक्यांतील बागाईतीच्या भागांतून धान्य इत्यादि गोळा केलें. श्री. माधवराव जोशी यांनीं आपल्या कामांतून वेळ काढून यांत भाग घेतला. वकील वस्तीवरील बागाइतदार श्री. विश्वनाथ इनामके, श्री. दिगंबरपंत गिरमे, श्री. बापूराव हंगे, श्री. भाऊराव हंगे, श्री. अण्णासाहेब खोरे, बावड्याचे श्री. दामूअण्णा पाटील, लासुरण्याचे श्री. वसंतराव वाघ यांनीं धान्य व गुळाच्या ढपो देऊन सहाय्य केलें. इंदापूर येथील डॉ. पेंडसे, श्री. नानासाहेब काटे यांनीं सढळ हातांनीं आर्थिक मदत केली.

## केंद्रांचा विस्तार

तालुक्यांतील दुष्काळी गांवांची संख्या पुढें ७५ झाली. या सर्व गांवांना इंदापूर येथील एक मदत केंद्र अपुरें पडल्याकारणानें तालुक्यांत न्हावी व कळाशी येथें दोन केंद्रें सुरू केलीं. त्यामुळें तालुक्यांतील सर्व गांवांना या तीन केंद्रांतून मदत नेणें शक्य झालें.



न्हावी केंद्रावरील
प्रमुख कार्यकर्ते
श्री. गोपाळराव शिंदे.

## न्हावी केंद्र

येथील काम श्री. गोपाळराव शिंदे हे पहात असत. दुष्काळग्रस्तांना आवश्यक ती सर्व मदत येथून होत असे.

## कळाशी केंद्र

या केंद्राचे काम श्री. रावसाहेब देवकर हे उत्साही तरुण संघ कार्यकर्ते करीत असत. या केंद्रानें एकूण १०० चे वर लोकांना डोळ मिळवून दिला. इंदापूर पासून हें गांव लांब असल्यामुळें सरकारी अधिकारी या गांवाकडे फारसे लक्ष देऊं शकले नाहींत. संघाच्या केंद्रामुळें लोकांना आधार मिळाला. ७५ चे वर लोकांना विविध प्रकारें औषधोपचार केला.

## बियाणें

इंदापूर व कळाशी भागांतून २५० लोकांना बियाणें वांटप करण्यांत आले.

## तालुका परिषद

दुष्काळ संपून पाऊस पडल्यानंतर संघाच्या केंद्रांकडून ज्या ज्या गावांत मदत पोंचविण्यांत आली अशा गांवचे कांहीं निवडक लोक एकत्र करुन एकमेकांच्या

सुखदुःखामध्यें समरस व्हावें व संकटांना न भितां सर्वांनीं समानतेनें त्यांतून मार्ग काढावा या भावनेनें एक तालुका परिषद घेण्यांत आली. एकूण १४ गांवचे लोक या परिषदेस उपस्थित होते.

## शिरूर तालुका

शिरुर तालुक्यांत पुण्याहून जाऊन श्री. बापूराव आठवले या महाविद्यालयीन युवकानें मदतकेंद्र उघडण्याच्या दृष्टीनें प्राथमिक पहाणी केली. नंतर श्री. बाळ करंदीकर या इंजिनिअरिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यानें रांजणगांव गणपती येथें दि. २८-५-५३ ला मदत केंद्र सुरू केलें. शिक्रापूर, राऊतवाडी, गुरुंजवाडी, तळेगांव ढमढेरे व तांदुळओढा इत्यादि ठिकाणच्या संघ स्वयंसेवकांनीं-आसपासच्या भागांत हिंडून रांजणगांव केंद्राची माहिती लोकांना दिली. ह्या केंद्रावरून धान्य, कपडे देण्यांत येत असत. या केंद्राचा अनेक लोकांना उपयोग झाला.

## राऊतवाडी आणि दहिवडी केंद्र

राऊतवाडी भागांतील खेड्यांसाठीं हें केंद्र सुरू करण्यांत आलें. येथील काम श्री. भाऊराव करपे हे पहात असत. श्री. फक्कडराव देव यांनीं दहिवडी येथें तिसरें मदत केंद्र सुरू केलें. शिक्रापूर-मलठण रस्त्याच्या कामावरील मजुरांना मजुरी फार कमी पडली. समितीकडून मदत मिळाल्यामुळें अनेक लोकांचे हाल टळले. या कामांत घोडनदीचे डॉ. गोपाळराव कुंटे, कवठ्याचे डॉ. अभ्यंकर मलठणचे श्री. साठे आदि मंडळींचें सहाय्य चांगलें झालें.

## इतर तालुक्यांतून करण्यांत आलेली मदत

भोर, पौड, मावळ इत्यादि भागांत पीक बरें होतें. या तालुक्यांतील संघ स्वयंसेवकांनीं पुष्कळच परिश्रम घेऊन धान्य, कपडे व पैसे गोळा करून दिले. त्याचप्रमाणें खेड आणि जुन्नर या भागांतूनहि मदत चांगली झाली.

वि. मा. देशमुख.
र. ज. क्षीरसागर.

*
*
* * ४ * *
*
*

# पुणें शहर

महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितिची स्थापना होऊन प्रांतिक कार्यालय पुण्यास असावें हें ठरल्यानंतर पुणें शहर संघ शाखेवर या कामाचें उत्तरदायित्व प्रामुख्यानें पडलें. दुष्काळ निवारणार्थ लागणारी धान्य, कपडे, पैसे इत्यादि मदत गोळा करणें, जनतेमध्यें या विषयाची जागृती आणि सहानुभूति उत्पन्न करून हें कार्य करण्यासाठीं अनेकांना उद्युक्त करणें, अनेक कार्यकर्त्यांना ठिकठिकाणीं पाठविणें, पुण्याच्या आसपासच्या जिल्ह्यांतून येणाऱ्या दुष्काळ पीडितांची सोय करणें इत्यादि कामें करणें हें ओघानेंच येत होतें.

दुष्काळ विमोचनाचे कार्यास जानेवारीच्या पहिल्या आठवड्यांत प्रारंभ होतो न होतो तोंच येरवडा येथें नगर, सोलापूर या जिल्ह्यांतील सुमारें ५०० दुष्काळ-ग्रस्त येऊन उतरल्याचें कळलें. पुणें शहरांतील स्वयंसेवकांनीं त्वरेनें तेथें जाऊन त्या दुष्काळग्रस्तांची विचारपूस करून तीन दिवस त्यांना शहरांतून पोळ्या आणि ताक गोळा करून जेऊं घातलें. येरवडा गांवांतील **श्री. खन्नाशेट** यांनीं या कामांत परिश्रमपूर्वक सहकार्य दिलें.

.....५.....

दि. ८ जानेवारी १९५३ या दिवशीं शनिवारवाड्यापुढील झालेल्या प्रकट सभेनंतर दुष्काळग्रस्तांसाठीं मदत गोळा करण्याचे कामास तत्परतेनें प्रारंभ झाला. धान्य गोळा करण्याच्या कामांतील कांहीं तांत्रिक अडचणीमुळें सुरवातीस रोख निधि आणि कपडे गोळा करण्याचेंच काम करावें लागलें. दि. १ फेब्रुवारी १९५३ पासून धान्य गोळा करण्यास प्रारंभ झाला. धान्य गोळा करण्याचें काम प्रामुख्यानें रविवार व अन्य सार्वजनिक सुट्टीचे दिवशीं केलें जात असें. या कार्यांत सहकार्य करावें म्हणून पुण्यांतील विद्यार्थी वर्गास आवाहन करण्यांत आलें, आणि त्यानुसार बऱ्याच विद्यार्थ्यांनीं मदत गोळा करण्याचे कामांत भाग घेतला. ३ किंवा ४ पेठांचा असा एक सलग भाग वांटून घेऊन त्या भागांत मदत गोळा केली जात असे. महावीर जयंति आणि गुरुनानक जयंति या दिवशींच्या उत्सवांत मदत गोळा करण्याचें काम करण्यांत आलें. दिनांक १ फेब्रुवारी १९५३ या पहिल्याच दिवशीं ३० पोतीं धान्य आणि २००० कपडे जमा झाले. अशा प्रकारें जमा होणारें धान्य व कपडे शेवटीं मिरवणुकीनें समितीच्या कार्यालयांत आणण्यांत येत असत संघ स्वयंसेवक घरीं आले असतांना पुरेसें धान्य घरांत शिल्लक नसल्यामुळें ज्यांना तें त्यावेळीं देतां आलें नाहीं अशा अनेक स्त्री-पुरुष नागरिकांनीं धान्य व कपडे आपण होऊन समितीच्या कार्यालयांत आणून पोंचविले. गंज पेठेंतील एक मुस्लिम कार्यकर्ते **श्री. हरे झंडेवाले** यांनीं शहराच्या पूर्व भागांत स्वयंसेवकांच्याबरोबर आळीआळीतून हिंडून मुसलमान जमातीला महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीच्या मदत कार्यांत सहभागी होण्याची विनंती केली. पुणें शहरांत एकूण सुमारें ६५ पोतीं धान्य जमा झालें. या कामांत येथील कार्टींग एजंट **श्री. भाऊसाहेब दिक्षित, श्री. दाते मांडववाले, श्री. बापूसाहेब राजमाचीकर, श्री. शामलाल हरीलाल किराड, हुंडेकरी** यांनीं आपले छकडे वा गाडे वापरण्यास दिले. धान्य सांठविण्यासाठीं **श्री. विठ्ठलदास हरिदास ठक्कर,** अध्यक्ष, बारदान असोसिएशन पुणें, आणि भारत ग्रेन क्रशिंग अँड फ्लोअर मिल यांनीं प्रत्येकीं २५ बारदान पोतीं समितीस देणगी म्हणून दिलीं. याशिवाय इतरहि अनेक व्यापारी मंडळींनीं थोडथोडीं बारदानें पोतीं समितीस देऊन आपलें सहकार्य प्रकट केलें. धान्य सरकारी गोदामांत भरावयाचें काम येथील गुडस् कमर्शिअल एजंट या वहातूक संस्थेचे मालक **श्री. केशव रघुनाथ ढमढेरे** यांनीं विनामूल्य केलें. गोळा झालेले कपडे धुण्याचें काम वॉशिंग एम्पोरिअमचे मालक **श्री. नामदेवराव गोखले** आणि भारत लॉंड्रीचे मालक **श्री. शंकरराव देशपांडे** यांनीं सुरवातीस विनामूल्य आणि पुढें सवलतीच्या दरानें करून दिलें. कपड्याच्या गांठी बांधून देण्याचें महत्त्वाचें काम येथील सदर्न निटिंग वर्क्सचे मॅनेजिंग डायरेक्टर **श्री. रामभाऊ कुलकर्णी** यांनीं उत्कृष्ट प्रकारें करून दिलें. कपड्यांच्या या गांठी दुष्काळी केंद्रावर पोहोंचविण्याचें कार्य येथील **दत्त मोटार सर्व्हिस, बोरा आणि कंपनी आणि जय हिंद मोटार माल ट्रक एजन्सी** यांनीं प्रथम विनामूल्य व नंतर सवलतीचे दरांत केलें.

मदत गोळा करण्याचें कार्य चालू असतांनाच पुण्यांत येऊन उतरणाऱ्या दुष्काळग्रस्तांना मदत देण्याचेंहि कार्य समितीतर्फे चालू होतें. येथील कार्यालयांत रोज कांहींना कांहीं स्त्री–पुरुष मंडळी मदतीसाठीं येत असत. त्यांच्या त्यांच्या गरजेप्रमाणें कोणाला धान्य, कोणास कपडे, कोणास जेवण, कोणास दुष्काळी कामावर जाण्यासाठीं प्रवास भाडें अशा प्रकारें मदत देऊन त्यांची शक्य ती सोय करण्यांत आली. सुमारें १२० रुपयांची प्रत्यक्ष मदत देण्यांत आली. पुणें शहराचे आसपास सुमारें ५० दुष्काळग्रस्त नागरिक आणि ५० जनावरें यांची सोय करण्याचें पुणें शहरानें अंगिकारलें होतें. जनावरें कोणाकडून आलीं नाहींत, परंतु उद्योगासाठीं आलेल्या कित्येकांची सोय आसपासच्या गांवीं करण्यांत आली.

पुणें शहरांत जमलेल्या सुमारें बारा हजार रुपयांच्या रोख निधीची माहिती प्रांतिक वृत्तांत आलेली आहेच. त्या रकमेपैकीं रु. ३५८३–९–० करमणुकीचे कार्यक्रमांतून समितीस मिळाले आहेत. या करमणुकीचे कार्यक्रमांत पहिला कार्यक्रम येथील विकास मंडळाचेवतीनें दि. २२–२–५३ला बेबंदशाही या नाटकाचा प्रयोग करून दाखविण्यांत आला. या प्रयोगाकरतां सेंचरी स्टेज अँड स्क्रीन या संस्थेच्या चालकांनीं भानुविलास नाटकगृह विनामूल्य दिलें. **श्री. एस्. जी. गोखले, मांडववाले,** यांनींहि प्रयोगासाठीं लागणारें साहित्य विनामूल्य पुरविलें. कलागृह छापखान्याचे मालक **श्री. शंकरराव दाते** यांनीं हस्तपत्रकें विनामूल्य छापून दिलीं. यानंतरचा दुसरा कार्यक्रम दि. ८–३–१९५३ ला नृत्य–गायनाचा झाला. त्यांत सुप्रसिद्ध **संगीत दिग्दर्शक, श्री. सुधीर फडके,** सुप्रसिद्ध **गवई, श्री. प्रल्हादबुवा जोशी,** नृत्य–गायिका **श्रीमती रोहिणी भाटे** आणि **पार्श्वगायिका मालती पांडे** यांनीं निरपेक्षपणें भाग घेऊन तो कार्यक्रम अतिशय यशस्वीरीत्या पार पाडला. या कार्यक्रमाकरितां अलका चित्रगृहाचे मालक **श्री. धारप** यांनीं चित्रगृह विनामूल्य वापरण्यास दिलें. प्रख्यात **दिग्दर्शक श्री. शांतारामबापू** यांनीं या कार्यक्रमासाठीं अलका चित्रगृहांत चालू असलेल्या त्यांच्या " दहेज " या चित्रपटाचा एक प्रयोग त्या दिवशीं बंद ठेविला होता. यानंतरचा तिसरा कार्यक्रम म्हणजे पंजाबांतील प्रख्यात हठयोगी **स्वामी देवमूर्ति** यांच्या शारीरिक आणि योगिक सामर्थ्याच्या प्रयोगांचा होय. दि. १५–४–१९५३ पासून येथील शिवाजी मंदिरांत त्यांचे एकूण सहा प्रयोग करण्यांत आले. त्यांपैकीं चार प्रयोगांचे खर्च वजा जातां उरलेलें सर्व उत्पन्न **स्वामी देवमूर्ति** यांनीं समितीस दिलें. पहिला प्रयोग येथील लष्करी अधिकारी **कर्नल अजीतसिंग** यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला. पुण्याचे डिस्ट्रिक्ट सुपरिटेंडेंट ऑफ पोलीस **श्री. देशपांडे** हेहि त्यावेळीं उपस्थित होते. नंतरच्या प्रयोगांचेवेळीं पुणें महानगरपालिकेचे कमिशनर **श्री. ल. मा. नाडकर्णी** आय्. सी. एस्., आणि पुण्याचे महापौर **श्री. गणपतरावजी नलावडे** हे मुख्य पाहुणे म्हणून

उपस्थित होते. याशिवाय **श्री. एम्. जी. पिंपुटकर** आय्. सी.एस्., (पुण्याचे त्यावेळचे कलेक्टर), **श्री. रामभाऊ मंडलिक, श्री. कुशाभाऊ बन्ने, श्री. सदुभाऊ गोडबोले,** राष्ट्रीय तालीम संघाचे चिटणीस **श्री. रघुनाथराव पवार** आणि चूडामण तालमीचे वस्ताद **श्री. आशाम्मा मल्लू, श्री. सर्जन के. सी. घारपुरे, डॉ. व्ही. व्ही. गोखले, डॉ. एस्. एस्. चोभे,** दै. काळचे संपादक **श्री. मामाराव दाते,** दै. भारतचे संपादक **श्री. बसंतराव गीत,** पुणें महानगरपालिकेचे असि. म्युनिसिपल कमिशनर **श्री. गं. म. खोपकर,** असेसर अँड कलेक्टर ऑफ टॅक्सेस **श्री. ल. ह. मराठे,** म्युनिसिपल सेक्रेटरी **श्री. अ. कृ. जाधव,** असिस्टंट इंजिनिअर **श्री. डी. व्ही. देशपांडे,** म्युनिसिपल सभासद **श्री. डॉ. बा. रा. ढमढेरे,** आणि **श्री. वा. ब. गोगटे** वकील., इत्यादि विविध थरांतील लहान थोर मंडळी निमंत्रणावरून अगत्यपूर्वक उपस्थित होती. या कार्यक्रमासाठी शिवाजी मंदिराच्या विश्वस्तांनीं मंदिराची जागा विनामूल्य दिली. प्रेक्षक बसण्यासाठीं उभारलेल्या गॅलरीचें काम **श्री. दाते** मांडववाले यांनीं सवलतीचे दरानें करून दिलें. ध्वनिक्षेपकाचें काम " भारत ध्वनि-वर्धक "च्या चालकांनीं कांहीं प्रसंगीं विनामूल्य आणि इतर वेळीं सवलतीच्या दरानें करून दिलें. इतर गोष्टीमध्यें इंजिनिअर **श्री. बाळासाहेब दिक्षित,** इंजिनिअर **श्री. रा. कृ. साठे,** फर्निचर व्यापारी **श्री. तात्यासाहेब बेलसरे** आणि अन्य अनेक नागरिक यांचें साहाय्य झालें.




**अन्नकोट : दुष्काळग्रस्तांसाठीं पुणेंकरांनीं दिलेल्या वीस हजार पोळ्या आणि अठ्ठावीस हारे गूळ**

वर नमूद केलेल्या करमणुकीच्या प्रयोगावरील सरकारी कराची सूट मिळाली आहे.

पुणें जिल्ह्याचे जिल्हाधिकारी **श्री. पिपुटकर**, त्यांचे कार्यालय आणि हवेली तालुक्यांतील सरकारी अधिकारी यांनीं तत्परतेनें सहकार्य दिलें.

इंदापूर येथील दुष्काळ पीडितांना रंगपंचमीच्या दिवशीं गोड-धोड जेवण द्यावें म्हणून पुणें शहरांतून पोळ्या व गूळ गोळा करण्याचा जो अत्यंत महत्त्वपूर्ण आणि वैशिष्टचपूर्ण कार्यक्रम झाला त्याचा उल्लेख यापूर्वी प्रांतिक वृत्तांत आलेला आहेच.


**वि. गो. आपटे**
**गो. प्र. भागवत**

*
*
* * ५ * *
*
*

# धुळें जिल्हा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघानें आपल्या कामाच्या सोयीसाठीं म्हणून जळगांव जिल्ह्यामधील पारोळे व अंमळनेर हे दोन तालुके धुळे जिल्ह्याला जोडले आहेत. त्यामुळें संघयोजनेप्रमाणें धुळें जिल्ह्यांत धुळें, पारोळें, अंमळनेर, शिरपूर, शिंदखेड, शहादें, अक्कलकुवा, तळोदे, नंदुरबार, नवापूर व साक्री असे अकरा तालुके येतात. या तालुक्यांपैकीं धुळें, पारोळे, अंमळनेर, शिंदखेड या चार तालुक्यांमध्यें दुष्काळाची तीव्रता जास्त होती. याशिवाय साक्री, नंदुरबार व शिरपूर तालुक्याचे कांहीं भागांतहि दुष्काळी परिस्थिति निर्माण झाली होती.

नियमितपणें संघशाखांवर उपस्थित राहून समाज जीवनाशीं समरस होण्याचा दैनंदिन संस्कार घेणाऱ्या संघस्वयंसेवकांचे अंतःकरणांत वरील परिस्थितीमुळें अस्वस्थता उत्पन्न होऊन आपण या बिकट परिस्थितींत समाजाला यथाशक्ति धीर दिला पाहिजे व मदत केली पाहिजे अशा स्वरूपाची तीव्र भावना निर्माण झाली नाहीं तरच नवल! अनेकांचे मनांत होणारी ही तडफड दिनांक २०-९-५२ या दिवशीं रात्रीं ९ वाजतां धुळ्यास डॉक्टर के. म. दुगल यांचे घरीं बैठकीचे रूपानें साकार



पुरमेपाडा
केन्द्रावरील
कपडे वांटप



प्रांत संघचालक
श्री. काशीनाथपंत लिमये
यांची सुराय केंद्रास भेट



केंद्र – सुराय

दूध वांटप

झाली. या बैठकींत दुष्काळी परिस्थितीची माहिती सांगण्यांत आली, व शुभस्य शीघ्रम् म्हणून त्याच दिवशीं प्रथम धळें शहर संघचालक डॉ. दुगल यांचे अध्यक्षतेखालीं दुष्काळ विमोचन समिति स्थापन करण्यांत आली. महाराष्ट्रांत दुष्काळ विमोचनार्थ स्थापन झालेली ही पहिलीच समिति होय. त्यानंतर लागलीच धुळें शहरांत निधि, कपडे वगैरे जमविण्याच्या कार्यास प्रारंभ झाला.

दि. २५–९–५२ ला धुळें जिल्हाधिकाऱ्यांची डॉ. दुगल व श्री. वसंतराव परचुरे यांनीं भेट घेतली व दुष्काळी परिस्थितीची कल्पना जिल्हाधिकाऱ्यांना देऊन समितीच्या कार्यक्रमाची माहिती सांगितली. समितीचे केंद्रांत उपजीविकेचें साधन नसणाऱ्या पांचशें कुटुंबांची नोंद करण्यांत आली. यावरून २७०० आबालवृद्ध स्त्री–पुरुष यांचेवर अवलंबून आहेत अशी माहिती मिळाली. नोंद केलेल्यांत सर्व धरांतील व व्यवसायांतील माणसांची नोंद होती. यावरून दुष्काळाची तीव्रता अनेकांचे लक्षांत आली. दिनांक ३–१०–५२ ला जनता आघाडीतर्फे धुळें तालुक्यांतील भूक–मोर्चा आला असतांना समितीतर्फे त्यांतील लोकांना फुटाणे वांटण्यांत आले.

दि. २५–१०–५२ ला डॉ. दुगल यांनीं मे. जिल्हाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना जमविलेली सर्व माहिती दाखविली. या भेटींत काम नसणाऱ्यांना काम देण्याचें आश्वासन मे. जिल्हाधिकाऱ्यांनीं डॉ. दुगल यांना दिलें. दि. २९-१०-५२ ला कार्तिकी एकादशीचे दिवशीं धुळें येथें कपडे वांटण्याचा कार्यक्रम झाला. त्यावेळीं ५५० स्त्री–पुरुष व १२५ मुलांना कपडे वांटण्यांत आले. दि. ३१–१०–५२ ला चीफ ऑफिसर, धुळें नगरपालिका, यांना पत्र पाठवून कांहीं दुष्काळी कामें चालू असल्यास कळवावें व शक्य असल्यास नवीं कामें सुरु करावींत अशी विनंती करण्यांत आली. दि. २४-११-५२ ला मे. जिल्हाधिकाऱ्यांकडून समितीनें नोंद केलेल्यांची वर्गवारी कळवावी असें पत्र आल्यावरून समितीतर्फे त्यांना १–१२–५२ ला पत्र पाठवून सर्व तऱ्हेची वर्गवारी कळविण्यांत आली व दुष्काळ विमोचनार्थ समिति सर्व तऱ्हेचें सहकार्य देईल असें आश्वासनहि देण्यांत आलें. मे. एक्झिक्युटिव्ह इंजिनीअर यांचेकडेहि पत्र पाठवून माहिती मागविण्यांत आली. दिनांक ३१–१२–५२ ला त्यांचें उत्तर येऊन त्यांत त्यांनीं समितीचे आभार मानून सहकार्याची विनंती केली.

दि. २४–१२–५२ रोजीं जिल्हाधिकाऱ्यांकडून डॉ. दुगल यांना पत्र आलें, त्यांत दि. २८–१२–५२ ला "सेंट्रल फॅमिन कमिटी धुळ्यास येत आहे त्यांना आपण भेटावें" असें कळविण्यांत आलें. त्याप्रमाणें दिनांक २८-१२-५२ ला डॉ. दुगल यांनीं श्री अप्पासाहेब कोपरकर वकील यांचे समवेत कमिशनरपुढें जाऊन आपलें म्हणणें लेखी मांडलें. त्यांत (१) दुष्काळ पीडित भागाची माहिती

(२) अन्न व चारापाण्याची टंचाई आणि (३) काम धंदा नसल्यामुळें जनतेची क्रय-शक्ति कमी झाली असल्याचें सांगून त्यावर उपाय म्हणून—

(१) दुष्काळी कामें त्वरित सुरू करावीत (२) अपंगांना डोल मिळावा (३) शेतांना बांध घालावेत (४) विहिरी खणाव्या (५) रस्ते, नाला बांधाव्यात (६) धरणें व कालवे तयार करावेत, अशी सूचना केली. दुष्काळ विमोचनाच्या कामांत रा. स्व. संघ सर्वतोपरी साहाय्य करील असेंहि त्यांनीं आश्वासन दिलें.

हें काम चालू असतांनाच जिल्ह्यांतील परिस्थितीची माहिती एकत्र करण्यांत आली. दि. ३०,३१ डिसेंबर १९५२ व १ जानेवारी १९५३ रोजीं धुळें जिल्ह्याची परिषद धुळ्यास झाली व त्यांत सर्व परिस्थितीचा विचार करून दुष्काळ विमोचन समिती स्थापन करून तिच्याद्वारें शक्य त्या ठिकाणीं मदत केंद्रें त्वरित सुरू करावीत असा ठराव करण्यांत आला. त्याप्रमाणें **जिल्हा संघचालक श्री. ना. गो. शुक्ल वकील,** नंदुरबार, यांचे अध्यक्षतेखालीं जिल्हासमिति स्थापन करून जिल्ह्यांत पत्रकें, भेटी, सभा, मिरवणुका यांचेव्दारें मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्यांत आला. या कार्याचा व्याप वाढतां वाढतां जिल्ह्यांत धुळें, पुरमेपाडा, पारोळें, अंमळनेर, पातोंडे, दोंडाईचें, रामी, सुराय, वगैरे केंद्रांत मोठ्या प्रमाणावर परिणत झाला. त्याचें त्रोटक वृत्त पुढें देत आहोंत.


## धुळें केंद्र

या केंद्राचें वृत्त सुरवातीला आलें आहेच. जिल्ह्यांत चालणाऱ्या सर्व केंद्रांची व्यवस्था व मार्गदर्शन धुळें केंद्रांतूनच होत असे. प्रांतांतून येणारें धान्य, पैसे, कपडे, औषधें या सर्व स्वरूपाची मदत जिल्ह्यांतील केंद्रांना पाठविण्याचें काम **डॉ. दुगल** यांचे मार्गदर्शनाखालीं तेथूनच होत असे. याशिवाय धुळें शहरांतील ४५ कुटुंबांना दर आठवड्याला रेशन घेऊन दिलें जाई. ही मदत दोन महिने चालू राहिली. याशिवाय गरजूंना कपडे वांटपहि चालू होतेंच.

## पुरमेपाडा केंद्र

धुळ्यापासून १२ मैलांवर पुरमेपाडा हें गांव आहे. त्याठिकाणीं सरकारतर्फे बोरी नदीला धरण बांधण्याचें काम सुरू करण्यांत आलें. या कामावर अनेक गावांतील सहा हजार मजूर आले. दि. २५–२–५३ पासून याठिकाणीं मदत केंद्र सुरू करण्यांत आलें. ठाण्याचे **श्री. नानासाहेब सुळे, श्री. सुब्बाराव कुलकर्णी** व शिरपूरचे **श्री. पुरुषोत्तमपंत साठे** हे तिघेजण सुरवातीला या केंद्रावर काम करीत असत. हे स्वयंसेवक काम चालू असतांना मजुरांमध्यें फिरून प्राथमिक औपधोपचार करीत व कपड्यांची आवश्यकता असेल त्यांना पत्रिका देत असत. पत्रिका दिलेले लोक

सायंकाळीं केंद्रावर येऊन आवश्यक ते कपडे घेऊन जात. सरकारनें केलेल्या सोयीची माहिती देऊन मजुरांच्या तक्रारीहि हे स्वयंसेवक दूर करीत. मजुरांचे मुलांना दूध वांटप करण्याच्या सरकारी योजनेंत संघ स्वयंसेवकांनीं सक्रिय सहकार्य दिलें. दररोज ४०० पेक्षां जास्त मुलांना दूध वांटपाचें काम या केंद्रावरील स्वयंसेवकांनीं अतिशय व्यवस्थितपणें केलें.



केंद्र : पुरमेपाडा

डॉ. दुगल, नानाराव मुळे आणि सुब्बाराव कुलकर्णी कपडें वांटप करीत आहेत.

दि. १२–३–५३ ला डॉ. दुगल यांचे हस्तें कपडे वांटण्याचा कार्यक्रम सायंकाळीं ५ वाजतां झाला. प्रथम डॉ. दुगल यांनीं संघाच्या कामाची कल्पना लोकांना सांगितली. मदत केंद्रांतून कशी मदत मिळेल याची माहिती सांगून त्या दिवशीं तीनशें स्त्री–पुरुषांना पांचशेंपेक्षां जास्त कपड्यांचें वांटप केलें. यावेळीं लुगड्यांची आवश्यकता जास्त आहे असें आढळून आलें. होळीचे दिवशीं मजुरांना एकत्र करून त्यांचे खेळ घेण्यांत आले व गाणीं म्हणण्यांत आलीं. या केंद्रावर कपडे वांटप, दूध वांटप व प्राथमिक औषधोपचार हीं कामें रोज होत असत. दोन हजार लोकांना कपडे, १५०० लोकांना औषधोपचार व ५०० मुलांना रोज दूध याप्रमाणें केंद्रांतून सहाय्य देण्यांत आलें. दिनांक १६–३–५३ ला वर्ष प्रतिपदेच्या दिवशीं धुळ्याचे दहा स्वयंसेवक व केंद्रावरील स्वयंसेवकांनीं मिळून एक हजार झोपड्यांमध्यें प्रत्येकीं पावशेर गुळाचें वांटप केलें.


दि. २८–३–५३ ला प्रांत संघचालक आणि समितीचे अध्यक्ष श्री. काशिनाथपंत लिमये यांनीं या केंद्राला भेट दिली. सर्व कामाची पाहणी करून त्यांनीं मजुरांशीं बोलणें केलें. दि. ३०–३–५३ ला केंद्रातर्फे श्री हनुमान जयंतिचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यांत आला. सर्व मजुरांना प्रसाद वांटण्यांत आला. दिनांक ११–४–५३ ला श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनीं केंद्राला भेट दिली व समाधान

व्यक्त केलें. दि. २९–४–५३ रोजीं डॉ. बुगल, धुळें जिल्हा जनसंघमंत्री **श्री. उत्तमराव पाटील**, वकील., यांनीं केंद्राला भेट दिली. रात्रीं मजुरांचे खेळ, पोवाडे वगैरे कार्यक्रम झाले. दि. १८–५–५३ रोजीं धुळें जिल्हा बौद्धिक कार्यवाह **श्री. गोविंद-शास्त्री जोशी** यांनीं केंद्राला भेट दिली. मे महिना अखेर हें केंद्र बंद करण्यांत आलें. या केंद्रावर औषधोपचारासाठीं भिल्ल सुधार समिति, धुळें, यांनीं औषधांचा फार मोठा पुरवठा केला.

## पारोळे केंद्र

या जिल्ह्यांत दुष्काळाची सर्वांत जास्त तीव्रता पारोळे तालुक्यांत होती. प्रथम या तालुक्यांत भोकरबारी टेकडीवर खडी फोडण्याचें दुष्काळी काम सरकार-तर्फे सुरु करण्यांत आलें. दि, २ फेब्रुवारीला पारोळयास मदत केंद्र सुरु करण्यांत आलें. या केंद्रांतून धान्य, प्राथमिक औषधोपचार, दूधवांटप करण्यांत येत असे.

दुष्काळामुळें उपासमार होणाऱ्या कुटुंबांची नोंद करण्यांत आली व त्यांना धान्य वांटप पत्रकें देण्यांत आलीं. या केंद्रांतून दर शनिवारीं धान्य वांटप करण्यांत येत असे. प्रथम धान्य विकत घेऊन वांटलें. याशिवाय मुंबईहून या केंद्रासाठीं पस्तीस पोतीं गहूं मिळाला. एकशेंसहा कुटुंबांना आवश्यकतेप्रमाणें धान्य वांटप केलें जात असे. आजुबाजुचे चाळीस खेडेगांवीं मदत देण्यांत आली. त्यापैकीं महत्त्वाचीं गांवें खालील नकाशांत दाखविलीं आहेत.



# तालुका पारोळे-धान्य वांटप

| कुटुंब संख्या | गांवें |
|---|---|
| ८५ | बहादरपूर, शेवाळें, सबगव्हाण, मोरफळ, जिराई, तामसवाडी, चोरवड, टिटवी, मोंढळ, तळवेल, तळडी, पिंपरी, पूनगांव, मेहूरेडू. |
| ३६ | राजवड. |
| २२१ | मंगरूळ, धुळपिंपरी, शिरसमणी, टिटवी. |
| १०६ | सारवे. |

अक्षय्य तृतीयेचे दिवशीं सण म्हणून पारोळे गावांतील १३३२ कुटुंबांना तेरा पोतीं गहुं व शंभर कुटुंबांना प्रत्येकीं पावशेर गूळ वांटण्यांत आला. या केंद्रांतून आतांपर्यंत २००० कुटुंबांना चाळीस पोती धान्य वांटण्यांत आलें. यापैकीं कांहीं मदत मुंबईहून आली होती व कांहीं गावांत गोळा केलेली व विकत घेतलेली मिळून हें वांटप करण्यांत आलें. दर शनिवारीं निराधार कुटुंबांना धान्य देण्याचा कार्यक्रम होत असे. खानदेशमध्यें पोळयांचा (पिठोरी अमावास्या) मोठ्या प्रमाणावर सण साजरा होतो. त्या दिवशीं खेडोपाडीं धान्य वांटप करण्यांत येऊन नंतर हें केंद्र बंद करण्यांत आलें.

या केंद्रासाठीं मुंबई आणि कल्याणहून कपड्यांची मदत आली. रोज वांटप केलेल्या नोंदीवरून या केंद्रांतून सांगवी, शिळावे, वंजारी, भोकरबारी, मेहूरेडू, चोरवड, म्हसवे, देवगांव, बहादरपूर, नगाव, शेवाळे, मुंदाडे, ऊंदीरखेडे, तांबोळी, वाहुटे, उर्लुड, हिरापूर, टिटवी, धावे, सबगव्हाण, बिचखेडे, बोदरडे, पिंपरी, याभळे, वाघरे वगैरे चाळीस गांवीं २८७८ कुटुंबांना कपडे वांटण्यांत आले.व राहिलेले कपडे पारोळे गावांतील सातशें कुटुंबांत वाटण्यांत आले. या केंद्रांतून तीनशेंपर्यंत लुगडीं व पातळें वांटण्यांत आलीं. मध्यमवर्गीतील गरजूंची नोंद करून त्यांना घरोघर कपडे नेऊन देण्यांत आले.

धुळयाच्या भिल्ल सुधार समितीनें या केंद्रासाठीं विनामूल्य औषधें दिलीं. प्राथमिक औषधोपचार केंद्रांवर करण्यांत येत असेच याशिवाय निरनिराळया ठिकाणीं चालू असलेल्या दुष्काळी कामावर जाऊन स्वयंसेवक औषधोपचार करीत असत. याचा उपयोग एक हजारपेक्षां जास्त लोकांना झाला.

गावांतील सर्व प्राथमिक शाळेंतील शिक्षकांचे सल्ल्यानें गरीब व होतकरु विद्यार्थ्यांची नोंद करण्यांत येऊन त्या प्रत्येकास एक पत्रिका देण्यांत आली. प्रत्येक पत्रिकेवर विद्यार्थ्याचें नांव वगैरे माहिती व १२ सूर्य नमस्कारांचीं नांवें लिहून दिलीं होतीं. रोज सकाळीं सर्व विद्यार्थी एकत्र आल्यावर सूर्य नमस्कार, श्लोक व गीतें म्हणत असत. नंतर दूध वांटण्यांत येई. रोज ६० ते ७० मुलांना दूध वांटप

होत असे. मुंबईहून दूध भुकटी मिळाली होती. अक्षय्य तृतीयेचे दिवशीं दोनशें सत्तावीस मुलांना गोड केशरी दूध देण्यांत आलें.

दि. २८ मार्च १९५३ या दिवशीं **प्रांत संघचालक श्री. काशिनाथपंत लिमये** यांनीं केंद्राला भेट दिली. त्यांचे हस्तें सायंकाळीं सात वाजतां पन्नास कुटुंबांना धान्य वाटण्यांत आलें. त्यांवेशीं बोलतांना **श्री. काशिनाथपंत** यांनीं संघातर्फे महाराष्ट्रांत चाललेल्या कामाची माहिती सांगितली.

दि. २६–४–५३ ला गांवांत मिरवणूक काढून मदत गोळा करण्यांत आली. येथील **कु. सविताबेन गुजराथी** व **कु. उषाताई गोडबोले** यांनीं गांवांत फिरून केवळ स्त्रियांकडून रु. ४३–८–० रोख जमवून समितीस दिले. आजुबाजूचे अनेकांनीं या केंद्रांस भेटी दिल्या. त्यांनीं केंद्राबद्दल व्यक्त केलेले कांहीं विचार पुढें दिले आहेत.

( १ ) तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष **श्री. भगवान नथू पाटील** हे लिहितात 'आजरोजीं सकाळीं साडेसात वाजतां केंद्रास भेट दिली. कामाची एकूण पद्धत अत्यंत प्रशंसनीय आहे. या केंद्रांमधून गरीब कुटुंबांस धान्य देण्यांत येतें, कपडेसुद्धां देण्यांत येतात. चालक मंडळी अत्यंत तळमळीनें काम करीत असल्यानें काम व्यवस्थित चालू आहे ( २४–४–५३ ),

( २ ) **श्री. आ. सि. बारी**, सेक्रेटरी, प्रजा समाजवादी पक्ष पारोळे तालुका 'रा. स्व. संघानें दुष्काळग्रस्त लोकांकरतां जें मदतकेंद्र उघडलें आहे तें पारोळे तालुक्यांत आदर्श असें आहे. असें एवढें भरीव कार्य पारोळे तालुक्यांत तरी आजपर्यंत कोणी केलें नाहीं. हें सत्य लपविण्यांत काय अर्थ आहे ? औषध, कापड व धान्य वांटप अगदीं नियमित व पद्धतशीर शिस्तींत चालू आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनीं निरपेक्ष सेवेचा हा एक धडा घ्यावा एवढें उत्तम कार्य चालू आहे ( ता. २५–५–५३ ),

या केंद्रांस गावांतून अनेकांनीं मदत केली. त्यांतील प्रमुख देणग्या खालील प्रमाणें:—

(१) **श्री. श्री. चु. अगरवाल,** पांच पोतीं ज्वारी, एक पोतें गहूं, रु.५६चीं लुगडीं
(२) **श्री. लो. मु. महाजन,** एक पोतें ज्वारी.
(३) **श्री. बा. तु. शिंपी,** रु. ११.
(४) **श्री. देवसिमामा अंमळनेरकर,** रु. ११.
(५) **श्री. कल्याणदास त्रिभुवनदास,** रु. ११.
(६) **श्री. हिरामण शामराव पाटील,** अहमदेकर. रु. ५.
(७) **श्री. नानाजी कौतिक पाटील,** रु. ५,
(८) **श्री. शेख तुकडू शेख बगडू शिकलकर,** रु. ५.
(९) **श्री. मथुरादास बिठ्ठलदास,** रु. ५.

पारोळे तालुका संघचालक **श्री. श्रीनिवास चुनीलालशेठ आगरवाल** हे स्वत: केंद्राचे कामांत सर्व तऱ्हेची मदत व मार्गदर्शन करीत असत. घरचा टांगा काढून या खेड्याहून त्या खेड्यावर, या मजुराच्या झोंपडींतून त्या झोंपडींत जाऊन गोरगरीबांची, बायाबापड्यांची, बाळंतिणींची, आजाऱ्यांची सेवाशुश्रुषा करणाऱ्या **श्रीनिवास शेटजींची** मूर्ति पारोळ्यांतील लोकांचेसमोर आजहि आहे.

## सुराय केंद्र

शिंदखेड तालुक्यांत दौंडाईचे स्टेशनपासून ६ मैलावर सुराय गांव आहे. या ठिकाणीं १८ जानेवारी १९५३ ला मदत केंद्र सुरू करण्यांत आलें. सुरुवातीला या भागांत दुष्काळी काम सुरू व्हावें, अशा स्वरूपाची खटपट येथील केंद्र प्रमुख **श्री. पदमसिंग नाथूसिंग गिरासे** यांनीं केली व त्यानंतर शेतांना बांध घालण्याचें काम सरकारतर्फे सुरू करण्यांत आलें. तीव्र दुष्काळामुळें अन्नान्नदशेला लागलेल्या आजूबाजूच्या २५--३० गांवांतील शेंकडों लोक काम मिळावें म्हणून येऊं लागले. त्यांना काम मिळवून देणें, राहण्यासाठीं निवाऱ्याची जागा देणें व आवश्यक त्यांना पहिले कांहीं दिवस भाजी भाकरी देणें अशा स्वरूपांत या केंद्रांतील कामास सुरुवात झाली.

धुळें रेडक्रॉस संस्थेतर्फे श्री. **बाबुराव रणसिंग वकील** यांना या केंद्रावर चाललेल्या कामाची माहिती मिळाल्यानंतर या केंद्रासाठीं दूधभुकटीचा डबा व कांहीं औषधें दिलीं. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यांत मजुरांच्या मुलांना दि. ६–२–५३ पासून दूध वांटप सुरू करण्यांत आलें. लहान मुलांना, बाळंत स्त्रियांना रोज दूध देण्यास सुरुवात झाली. प्रथम कांहीं दिवस ५०–५५ मुलांना दूध देण्यांत येत असे. परंतु पुढें दुधभुकटीचा पुरवठा पुरेसा झाल्यानंतर एक ते बारा वर्षापर्यंतच्या दोनशें ते अडीचशें मुलांना रोज दूध देण्यांत येत असे. याठिकाणीं ५५० पौंड



**सुराय केन्द्र**

**डॉ. काशीनाथराव जोशी रोग्यांना औषधोपचार करीत आहेत.**

भुकटीचें दूध एकूण ४१००० हजार मुलांना वाटण्यांत आलें. दूध वांटपाचा उपयोग सुराय, मालपूर, वैदाणें, कलवाडे, करले, अक्कलकोस, सतारे, खर्दे, अंजनविहीर, आदि २५ गांवांतील मुलांना होत असे. धुळें रेडक्रॉस संस्थेनें बेबी टॉनिक हें औषध पुरविलें. एक वर्षांतील अगदीं अशक्त मुलांना हें औषध दिल्यामुळें अनेकांच्या प्रकृतींत बदल झालेला दिसून आला. औषधोपचाराच्या बाबतींत दुष्काळ विमोचन समितीनें प्रथम प्राथमिक औषधें विकत. घेऊन सुरुवात केली. पुढें धुळें येथील भिल्ल सुधार समितीनें औषधाची ग्राम–पेटी व इतर आवश्यक वस्तूंचा भरपूर पुरवठा केला. त्याचा खूपच उपयोग या केंद्रावर झाला. रेडक्रॉस संस्थेनेंहि व्हिटॅमिन गोळ्या व अन्य कांहीं औषधें या केंद्रासाठीं दिलीं. या केंद्रांतून २००० लोकांना निरनिराळ्या स्वरुपाचा औषधोपचार करण्यांत आला. दोंडाईचे येथील सुप्रसिद्ध वैद्य **श्री. काशिनाथदादा जोशी** हे दर रविवारीं केंद्रावर येऊन रोग्यांची तपासणी करीत व योग्य तो औषधोपचार करीत. याचा उपयोग आजूबाजूचे पंचवीस गांवांतील १६०० लोकांना झाला. यांत सातशें स्त्रिया व नऊशें मुलें व पुरुष होते. म्हाताऱ्या माणसांना रोज व्हिटॅमिन गोळ्या देण्यांत येत.

## कपडे वांटप

सुरवातीस या केंद्रासाठीं धुळें, नंदुरबार, शहादें, कल्याण या भागांतून कपडे आले. रविवार दि. १५–२–५३ ला प्रथम कपडे वांटण्याचा मोठा कार्यक्रम झाला. त्यावेळीं अठ्ठावीस गांवांतील सहाशें लोकांना कपडे वाटण्यांत आले. या कार्यक्रमाला दोंडाईचे **संघचालक श्री. भेरुलालजी, डॉक्टर जोशी** व नंदुरबारचे **श्री. माहेश्वरी** आले होते. यानंतर मात्र केंद्रांतून आवश्यक त्यांना कपडे दिले जात. याच केंद्रांतून चिमठाणे येथील गांगेश्वर धरणावर कपडे वांटण्यांत आले. आजुबाजूच्या पंचवीस गांवांतील ४००० लोकांना कपड्यांचें वांटप करण्यांत आलें. दि. ७–६–५३ रोजीं शंभर रुपयांचीं नवीन लुगडीं शिंदखेडचे मामलेदार यांचे हस्तें मालपूर, सुराय, रामी, करले, कळवाडे, अंजनविहीर या गांवांतील अगदीं निराधार व गरीब स्त्रियांना वाटलीं.

धुळें रेडक्रॉसचे मदतीनें दि. २१–५–५३ पासून अन्नछत्र सुरू करण्यांत आलें. तेथें रोज ३५० ते ४०० मुलांना भाकरी व भाजी देण्यांत येऊं लागली.

या केंद्रांतून एक विशेष कार्यक्रम करण्यांत आला. आजुबाजूला पत्रकें वांटून सरकारनें गुरांसाठीं उघडलेल्या केंद्रांची माहिती शेतकऱ्यांना देऊन केंद्रातर्फे गुरें पाठविण्याची व्यवस्था करण्यांत आली. ह्या योजनेंतून ५ गावांतील ९४ गुरें सरकारी केंद्रांत पाठविलीं व दि. ७–६–५३ ला सर्व गुरें परत आणून ज्यांचीं त्यांना देण्यांत आलीं.


सुराय या गांवच्या विहिरीचा दि. २७ ते ३० मार्च या दिवसांत सर्व गाळ काढला, त्यामुळें पावसाळ्यापर्यंत पाण्याची टंचाई भासली नाहीं. त्याचप्रमाणें पिण्याच्या पाण्यासाठीं असणारा गांवांतील आड तीनवेळा गाळ काढून साफ केला. वेळोवेळीं केंद्रातर्फे गांवांतील प्रत्येक आडांत औषध टाकण्याची व्यवस्था करण्यांत आली.

दि. ३० मार्च १९५३ ला महाराष्ट्र प्रांतसंघचालक **श्री. काशिनाथपंत लिमये** यांनीं केंद्राला भेट दिली. मजुरांची चौकशी, दूध वांटप वगैरे कार्यक्रम झाला. सायंकाळीं गांवकरी व मजूर यांची जाहीर सभा झाली. सभेला चारशें लोक उपस्थित होते. **श्री. काशिनाथपंतांनीं** प्रांतांत चाललेल्या कामाची माहिती सांगून आपण सर्वांनीं एकजुटीनें वागावें, संघ आपणांस शक्यतों सर्व मदत करील असें आश्वासन दिलें. **श्री. काशिनाथपंतांचे** बरोबर धुळें शहर संघचालक **डॉ. दुगल** हेहि उपस्थित होते. दि. २४ जून ५३ ला सत्यनारायण करून आजूबाजूच्या पंचवीस गांवांतील १५०० लोकांना पोटभर शिरा देण्यांत आला. दि. २१–६–५३ ला भिल्ल सुधार समितीचे वैद्यकीय शाखा संघटक **श्री. प्र. शं. जोशी** यांनीं औषधी केंद्रास भेट दिली, त्यावेळीं ते लिहितात. " केंद्र व त्यास लागणारीं सर्व कागदपत्रें सुव्यस्थित आढळलीं. केंद्र प्रमुख **श्री. पदमसिंह** हे तन्मयतेनें व श्रद्धापूर्वक दुष्काळी कामाच्या मजुरांना औषधोपचार करीत असलेले दिसले. ( ता. २१–६–५३ ) " येथील अॅग्रीकल्चरल ऑफिसर, बंडिंग सेक्शन, **श्री. मधुकर वासुदेव गुप्ते** यांनींहि व्यक्त केलेल्या विचारांत ते लिहितात. " बंडिंगचे कामानिमित्त सुरायला यावें लागे. प्रत्येक खेपेस **रा. स्व. संघानें** रेडक्रॉसचे वतीनें चालविलेल्या केंद्राला भेट देण्याची संधि प्राप्त झाली. केंद्रांतून सकाळीं प्रथम दूध वांटप होतें. बहुतेक सर्व तऱ्हेचीं औषधें दिलीं जातात. दुपारीं १२ वाजतां मुलें व अपंगांना भाकरी भाजीचें वांटप होतें. दि. २४ जून ५३ बुधवारीं अदमासें १५०० लोकांना जेवण देण्यांत आलें. दुष्काळ निवारण केंद्राचा उपक्रम अत्यंत स्तुत्य व अभिनंदनीय आहे. कार्य-कर्ते कष्टाळू व मनमिळाऊ आहेत. भारतांतील प्रत्येक खेड्यांत जर असेच कार्यकर्ते मिळतील व वरील कार्यकर्त्यांप्रमाणें कळकळीनें काम करतील तर प्रत्येक गांव आणि आपला देश नक्कीच भरभराटीस येईल यांत शंका नाहीं." या केंद्राचें काम **श्री. पदमसिंह गिरासे** यांनीं केलें. **श्री. पदमसिंह** हे सुराय येथील नामवंत रजपूत घराण्यांतील असून या भागांतील उत्तम शेतकरी आहेत. त्यांच्या कार्यकुशलतेमुळें त्यांच्याभोंवतीं कार्य करण्यास उत्सुक असलेल्यांचें एक मोठें वलयच उत्पन्न झालें.

## केंद्र पातोंडे

दि. २९ मार्च १९५३ ला प्रांतसंघचालक **श्री. काशिनाथपंत लिमये** यांचे हस्तें या गांवीं केंद्राचें उद्घाटन करण्यांत आलें. गांवकऱ्यांची जाहिर सभा घेण्यांतआली.

सभेला गांवांतील प्रमुख व अन्य असे सातशें नागरिक उपस्थित होते. श्री. **काशिनाथ-पंत** यांनीं दुष्काळाची माहिती सांगून रा. स्व. संघ करीत असलेल्या मदत कार्याचें वृत्त निवेदन केलें व " आजपासून येथील केंद्र सुरुं होत आहे, सर्व लोकांनीं सहकार्य करावें " अशी विनंती केली.



**केंद्र पातोंडे — श्री. पालखे दूध वांटत आहेत. शेजारीं अंमळनेरचे डॉ. कालिदास व देऊराजजी उभे आहेत.**

## कपडे वांटप

पातोंडे, नांद्री, गंगापूरी, दुधारी, खौशी, दहिवद, मळगव्हाण आदि १५ गावांतील २००० लोकांना कपडे वांटण्यांत आले.

## औषधोपचार

केंद्रावर येणाऱ्यांना आवश्यक त्याप्रमाणें प्राथमिक औषधोपचार करण्यांत आला.

## दूधवांटप

एप्रिल महिन्यांत दूध वांटपाला सुरवात झाली. रोज ५० मुलांना दूध देण्यांत येत असे.

## धान्यवांटप

प्रथम एप्रिल महिन्यांत ज्वारी विकत घेऊन तिचें पीठ करून तें वाटण्यांत आलें. चार गावांतील एकेचाळीस कुटुंबांना हें पीठ दिलें. पुढें या केंद्रांतून सोम-

खेडी, गंगापुरी, पातोंडे, खौची, रुंधारे, मुंगसे, नजमरी, वांद्री, रापुरी, निसाणे, रिंगणगांव, धाडसिरी, सावखेडे, निमगव्हाण, नारखेडे, खापरखेडे, वगैरे गावांतील ९७५ लोकांना धान्य वांटण्याची व्यवस्था केली. याशिवाय ६० कुटुंबांना प्रत्येकीं १ ते ४ शेरपर्यंत ज्वारी धान्यकार्डावर देण्यांत आली. ही ज्वारी देण्याचें काम दोन महिने चालू होतें.

जून महिन्याचे दुसऱ्या शनिवारपासून येथें साप्ताहिक अन्नछत्र चालू करण्यांत आलें. दर शनिवारीं भाजी व भाकरी वाटली जात असे. याप्रमाणें आतांपर्यंत ४५०० लोकांना भोजन देण्यांत आलें. भाकरी देण्यासाठीं आजूबाजूचे वीस गावांतील लोक येत असत. नंतर दि. ५ ते २५ ऑगस्ट पर्यंत हें अन्नछत्र रोज चालवून एकूण १४७० लोकांना जेवण देण्यांत आलें.

येथील काम श्री. **श्रीकृष्ण चिधू पवार** यांनीं पाहिलें. श्री. **श्रीकृष्णराव** यांचा स्वभावविशेष म्हणजे न बोलतां काम करणें. अत्यंत कष्ट घेऊन केलेल्या कामाचें स्वरूप येथील जनतेनें पाहिलें आहेच.

## विशेष कार्यक्रम

दि. २९–३–५३ ला प्रांत संघचालक श्री. **काशिनाथपंत लिमये** यांनीं भेट दिली, त्यावेळीं जाहीर सभा व केंद्राचें उद्घाटन झालें. दि. २६–४–५३ ला अंमळनेर शहरांतून स्वयंसेवकांनीं घरोघर जाऊन सातशें भाकरी गोळा केल्या. रात्रीं नऊ वाजतां या केंद्रावर तीनशें लोकांना पिठलें भाकरीचें जेवण देण्यांत आलें. जिल्हा संघचालक श्री. **ना. गो. शुक्ल** वकील, नंदुरबार, **डॉ. दुगल**, धुळें, **श्री. धर्माधिकारी** वकील, जळगांव, हे उपस्थित होते. रात्रीं जाहीर सभा झाली. अक्षय्य तृतीयेचे दिवशीं जळगांवच्या स्वयंसेवकांनीं घरोघर हिंडून ४५०० पुरणपोळ्या एकत्र करून येथें पाठविल्या. त्याचें वांटप या केंद्रावर करण्यांत आलें. त्या दिवशीं आजूबाजूच्या वीस गांवांतील एक हजार लोकांना खीर पोळीचें जेवण देण्यांत आलें. गावांत घरोघर हिंडून पन्नास कुटुंबांना पुरेशी खीर पोळी देण्यांत आली. याच दिवशीं दहिवद येथें श्री. **दौलत शंकर पवार** यांचे हस्तें चारशे पोळ्या व कपड्यांचें वांटप करण्यांत आलें. दि. ५–७–५३ ला अंमळनेरचे **डॉ. कालिदास** व **श्री. केसराजजी** यांचे हस्तें भाकरी वांटप झाले. त्या दिवशीं आठ गावांतील ६५० लोकांना भाकरी वांटण्यांत आल्या. पुढेंहि या केंद्रांतून दर शनिवारीं ६०० भाकरी व भाजीचें वांटप चालू होतें.

## रामी केंद्र

शिंदखेड तालुक्यांत रामी हें एक गांव आहे. या केंद्रांतून दुष्काळग्रस्तांना धान्याचें वांटप होत होतेंच. भिल्ल सुधार समितिनें दिलेल्या ग्रामपेटींतून आजु-

बाजूचे पांच गांवांतील पांचशें लोकांना औषधोपचार करण्यांत आला. या केंद्रांतून रेडक्रॉसचे मदतीनें दररोज दोनशें मुलांना दूध वांटण्यांत येई. हें दूध वांटप हंगामा-पर्यंत चालू होतें.

## दौंडाईचें केंद्र

हें केंद्र एप्रिलचे शेवटचे आठवड्यांत उघडण्यांत आलें. जवळ जवळ ३० गांवचे ५०० पेक्षां जास्त लोकांना कपड्यांचें वांटप झालें. २ पोतीं धान्य गरजूं कुटुंबांना देण्यांत आलें. **डॉ. काशिनाथपंत जोशी** हे स्वतः केंद्रावर औषधोपचार करीत असत.

## अंमळनेर केंद्र

अक्षय्य तृतीयेला केंद्र सुरुं करण्यांत आलें. केंद्रांतून कपडे वांटप आणि धान्य वांटप नियमितपणें केलें जात असे. २१३ वेळां गावांतून पोळ्या भाकरी एकत्र करुन पातोंडे केंद्रावर पाठविण्यांत आल्या.

खालील कोष्टकावर दृष्टी टाकल्यास वरील सर्व अहवालांतील नित्यपणें चाललेल्या कामाची कल्पना येऊं शकेल.


| केंद्र | किती गांवी मदत केली | दूध वांटप रोज किती मुलें | धान्य वांटप दर आठ-वड्याला किती कुटुंबें | औषधो-पचार एकूण किती लोकांना | किती जणांना कपडे दिले | दर आठ-वड्याला दिली जा-णारीं जेवणें |
|---|---|---|---|---|---|---|
| १. धळें. | ५ | | ४५ | | २००० | |
| २. पारोळें. | ४० | ६० | १०६ | १००० | ९१८९ | ८०० |
| ३. अंमळनेर | ३ | | ५ | | ५०० | |
| ४. पातोंडे | २० | ५० | ६० | | २५०० | ६००<br>७०(रोज) |
| ५. पूरमेपाडा. | २५ | ५०० | | १५०० | ३००० | ३७० रोज |
| ६. सुराय | ३० | २५० | | २००० | ६००० | |
| ७. रामी | ५ | २०० | १० | ५०० | | |
| ८. दौंडाईचे | १ | | १० | ५० | ५०० | |
| **एकूण** | १२९ | १०६० | २३६ | ५०५० | २३६८९ | १४०० व ३७० (रोज) |

## जळगांव

मुख्याधिकारी जळगांव जिल्हा यांच्या प्रेरणेनें स्थापन झालेल्या पूर्वखानदेश दुष्काळ निवारण समितीला संघाच्या स्वयंसेवकांनीं दोन दिवस शहरांत हिंडून २० मण धान्य व रु. १८० रोख जमा करुन दिले.




केंद्र कुसुंबे : श्री. बाळासाहेब पळशीकर दुष्काळग्रस्तांना धीर देत आहेत.



बोदवड केंद्रावरील अन्नसत्र

अक्षय्य तृतीयेच्या दिवशीं जळगांव शहरांतून तीन हजार पुरणपोळ्या गोळा करण्यांत येऊन त्या पातोंडे येथील दुष्काळ पीडितांच्यासाठीं पाठविण्यांत आल्या. वाघोड येथें रावेरचे संघचालक श्री. बाळाभाऊ डहाळे यांनीं स्वयंसेवकांच्या मदतीनें धान्य गोळा केलें. एरंडोल येथें संघचालक श्री. तात्यासाहेब जोशी यांनीं स्वयंसेवकांसह

गांवांत हिंडून धान्य गोळा केलें. कुसुंबे येथील दुष्काळी केंद्रावरच्या चारशें पन्नास मजुरांना श्री. **बाळासाहेब पळशीकरांनीं** कपडे वांटले. पिंपराळें येथें समितीचे सदस्य श्री. **मो. शं. दहाड** यांच्या नेतृत्वाखालीं स्वयंसेवकांनीं अडीचशें मजुरांना कपडे वांटले. कानळदे भागांतील चार पांच खेड्यांवरील लोकांना पूर्वसूचना देऊन श्री. **रामभाऊ प्रभूदेसाई, वकील.,** यांचे हस्तें पांचशें खेडूतांना कपडे वांटले. सावखेडे येथें आजूबाजूच्या चार खेड्यांवर पूर्वसूचना देऊन आलेल्या खेडुतांना गुजर समाजाचे पुढारी **श्री. दामूभाऊ पाटील** यांच्या हस्तें चारशें लोकांना कपड्याचें वांटप केलें. भडगांव येथें संघचालक **श्री. वामनराव टोपरे** यांच्या हस्तें १८ जून ५३ रोजीं पुलावरील काम करणाऱ्या एकूण पांचशें दुष्काळी मजुरांना आणि गरजू विद्यार्थ्यांना कपडे वांटले. रावेरचे संघचालक श्री. **बाळाभाऊ डहाळे** व निरुळचे कार्यकर्ते श्री. **भिकूभाऊ पाटील** यांनीं खानापूर रस्त्यावर काम करणाऱ्या दुष्काळी चारशें मजुरांना कपडे वांटप केलें. पाल रस्त्यावरील पांचशें मजुरांनाहि संघातर्फें कापड वांटप करण्यांत आलें. रावेर शहरांतील साडेतीनशें गरजूंनाहि कपडे दिले. या केन्द्रांतून जळगांव तालुक्यांतील दुष्काळग्रस्तांना साहाय्य केलें जात असें.



रावेर येथें श्री. बाळाभाऊ इहाळे यांनीं दुष्काळग्रस्तांना संघातर्फे एक दिवस जेऊं घातलें. कापड वांटपाचा फायदा एकूण सुमारें ५००० चे वर लोकांना झाला. या कार्यक्रमांत जनतेनें संघानें घालून दिलेली शिस्त पाळून उत्तम सहकार्य केलें. रेल्वेवरून येणाऱ्या कापडाबद्दल मे. प्रेसिडेंट जळगांव म्युनिसिपल बरो यांनीं जकात माफ केली होती. मोटारीनें प्रवास करतांना येथील एस्. टी.च्या व्यवस्थापकांनीं लगेज चार्जेस माफ केले.

## बोदवड

बोदवडच्या आसपास ११ गांवें दुष्काळी स्थितींत होतीं. पाणी आणि चार यांची अडचण तीव्र स्वरुपांत होती. दुष्काळ विमोचन समितीची दि १४-१-५३ला स्थापना करण्यांत आली. दि. १६-१-५३ ला सर्व पक्षीय सभा होऊन दुष्काळ विमोचन समितीचे अध्यक्ष **श्री. का. भा. लिमये** यांच्या पत्रकाच्या आधारें दुष्काळ विमोचन कार्याची रुपरेखा स्थानिक संघचालक श्री. **नानासाहेब बयाणी** यांनीं मांडली.

धान्य देणें, बंडिगच्या कामावरील मजुरांच्या तक्रारी दूर करणें हीं कामें चालू होतीं. दि. २३-२-५३ ला बोदवड येथें कामानिमित्त आलेल्या ६० शेतकऱ्यांना गूळ फुटाणे देण्यांत आले. दि, ८-३-५३ शीतला सप्तमीला २५० मजुरांना पापड्या लाडू, मांजोऱ्याचें जेवण देण्यांत आलें. दि. १६-३-५३ गुडी पाडव्याला ७५ मजुरांना पुरण पोळयांचें जेवण देण्यांत आलें. दि. २३-३-५३ महावीर जयंतिनिमित्त गांवांतून डाळ आणि आटा मिळवून जेवण घालण्यांत आलें. त्याप्रसंगीं ग्राम पंचायतीचे सरपंच श्री. के. टी. हजारी उपस्थित होते.



केंद्र-बोदवड

सौ. सुशिलाबाई मुंजे
स्त्रियांना वस्त्रें
वांटत आहेत.

दि. १४–४–५३ पुरुषोत्तम मासाच्या सुमुहूर्तावर सकाळीं ६ वाजल्यापासून सायंकाळीं ६ वाजेपर्यंत दुष्काळ विमोचनार्थ सुवासिनींना **सौ. निर्मलाबाई बयाणी** यांच्या हस्तें बांगड्या, लुगडीं व खण देणें, इतर दुष्काळ पीडितांना कपडे देणें असा कार्यक्रम झाला. मैदानावर या दिवशीं दुष्काळ पीडितांची अक्षरश: रीघच लागली होती. गांवांतील बहुसंख्य लोक कार्यक्रम पाहण्यासाठीं उपस्थित होते. दि. १९-४-५३ ते ९–७–५३ पर्यंत एकूण १३ गांवच्या ४००० दुष्काळ पीडितांना धान्य, कपडे इत्यादि मदत दिली गेली. २० लोकांना डोल मिळवून दिला.

## अन्नछत्र

दि. २४–५–५३ ला बोदवड येथील अन्नछत्रास प्रारंभ करण्यांत आला. अन्न-छत्रांत रोज चाळीस ते पन्नास दुष्काळ पीडित जेवत होते. अन्नछत्र दि. ८–७–५३ पर्यंत चालू होतें. एकूण २२५० लोक जेऊन गेलें. या अन्नछत्राचें वैशिष्टय असे कीं, गांवांतील धनिकांनीं त्याला विपुल मदत केली. गांवांतील इतर कार्यकर्त्यांनीं बाकीची मेहनत घेतली.

**सर्वश्री रतनलाल कोठारी, मोतीलाल सांड, हनुमानदास अग्रवाल, उगमचंद बरडिया** यांनीं प्रत्येकीं एक पोतें ज्वारी दिली. **सर्वश्री हिरालाल गुप्ता** यांनीं अर्धे पोतें, **नारायणराव पाटील** यांनीं सोळा शेर, **शंकरराव गायकवाड** यांनीं आठ शेर, **शालिग्राम कोठारी** यांनीं दहा शेर ज्वारी दिली. श्री. **परांजपे नाटेगांवकर** यांनीं अन्नछत्रास लागणारा एक दिवसाचा गहूं दिला. कित्येक धनिकांनीं अन्नछत्राचें एक एक दिवसाचें जेवण दिलें. **श्री. चंपालाल** कोठारी यांनीं एक दिवस शिरा पोळीचें जेवण दिलें. **श्री. मांगीलाल कुंदनमलजी** यांनीं एक दिवस वरणभात, तूप-साखर व पोळीचें पोटभर जेवण दिलें. खालील लोकांनीं वरण भाकरीचें जेवण दिलें, (१) **सर्वश्री भवरलालजी इंद्रभानजी** दोन दिवस. (२) **गणसाराम अनु तेली, मूळचंद हेमराज**, रामू मारुति जाधव, शांतीलाल हेसराज, **कन्हैयालाल चंदमल** या सर्वांनीं प्रत्येकीं एक दिवस जेवण दिलें. श्री. **ब्रिजलाल तुळशीप्रसाद** यांनीं एक दिवस झुणका भाकरीचें जेवण दिलें.


**श्री. सीताराम पंडित** यांनीं गांवांतील भिक्षुकीमुळें मिळालेलें पोठ, डाळ, आणि तूप अन्नछत्रास दिलें. **श्री. लोटूजी गोविंद कदम** यांनीं अन्नछत्रास लागणारें मीठ पुरविलें. **श्री. मोतीलाल चुनीलाल** यांनीं अर्धी गाडी सरपण दिलें. **श्री. चिनू गणू तेली, श्री. चत्रभूज चुन्नीलाल**, श्री. वक्तादरसिंह **मुबारकसिंह** यांनीं शारिरिक मेहनत घेतली. **श्रीमति सोनाबाई वाणी, तुळसाबाई वाणी** व **दगडाबाई वाणी** यांनीं निरपेक्षपणें स्वयंपाकाचें काम केलें. श्री. **मल्लिकार्जुन वाणी** यांनींहि त्यांत साहाय्य दिलें.

**डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी** यांच्या १३ व्या दिवशीं दि. ५-७-५३ ला शंभर लोकांना जेवण दिलें.

## बियाणें वांटप

बावीस शेतकऱ्यांना शंभर एकर जमिनीसाठीं ज्वारी, उडीद, मूग, चवळी, इत्यादि बेणें दिलेलें आहे.

बोदवड येथील कार्य पाहून नाडगांव येथील कॉंग्रेस कार्यकर्ते श्री. **श्रीपती रामजी पाटील** यांना स्फूर्ति येऊन त्यांनीं कॉंग्रेस कमिटीमार्फत बंडिंगच्या कामावरील शेतकऱ्यांना एक एक भाकरी देणें सुरू केलें. बोदवड येथील शिक्षिका **श्रीमति शांताबाई झोपे** यांनीं कित्येक दिवस धान्य जमवून दिलें.



संघचालक
श्री. नानासाहेब
याणी
यांचे हस्तें
कपडे वांटप

केंद्र — बोदवड

## कार्यकारी मंडळ

**श्री. देवीदास गोपाळ बयाणी** हे येथील सुप्रसिद्ध वैद्य आहेत. सार्वजनिक कार्यांत निरलसपणें मेहनत घेण्याचा त्यांचा नित्याचाच परिपाठ आहे. त्यांच्या अध्यक्षतेखालीं **श्री. श्रीपादराव कुलकर्णी**, श्री. **गणपतराव सांकला**, श्री. **रतनलाल छगनलाल**, श्री. **भालचंद्रराव कुलकर्णी** यांनीं अन्य स्वयंसेवकांच्या साहाय्यानें सर्व काम व्यवस्थितपणें केलें. सर्व कार्यकर्त्यांची कार्याबद्दलची कष्ट घेण्याची तयारी समोर असल्यानेंच गांवांतून इतक्या मुक्त हस्तानें मदत झाली.

## धान्य गोळा करतांना आलेले अनुभव

सर्वसामान्य लोकांमध्यें या कामाची जाणीव व जागृती कमीच आढळून आली. शेतकरी लोकांपेक्षां रेशन घेणाऱ्या लोकांनींच धान्य अधिक दिलें. विशेष

प्रतिष्ठित लोकांच्यांतहि उत्साह कमी असे. त्यांच्या दारासमोर आल्यानंतरहि मूठ मूठ धान्य मिळणें मुष्किल असे. उदार मनानें चार चार शेर देणारेहि भेटले, पण ते फार थोडे. "पुढें घ्या" म्हणून वाटेला लावणारेच जास्त. अन्न गोळा करतांना लोकांच्या धार्मिक भावनेलाच आवाहन केल्यामुळें मुक्त हस्तें दान मिळालें. दोन-दोनच्या ऐवजीं चार-चार पुरणपोळ्या लोकांनीं दिल्या.

**ब. ह. पळशीकर**
**मदनसिंह ठाकूर**

मुलांना मोफत दूध वांटण्याचीं केंद्रें चालविण्याचें ठरलें आणि त्याप्रमाणें प्रारंभ करण्यांत आला.

**श्री. तनपुरे महाराज** यांनीं येवलें येथें अन्नछत्र चालविण्याचें ठरविलें आणि त्याची व्यवस्था **श्री. अण्णासाहेब भांबेरे** यांनीं स्वयंसेवकांच्या आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या सहाय्यानें करण्याचें पत्करलें याबद्दलचें वृत्त प्रांतिक इतिवृत्तांत आलेंच आहे. अन्नछत्र चालविण्याच्या कामीं जिल्हाधिकारी **मेजर श्री. साळवी, मामलेदार श्री. भारंबे** आणि **सबइन्स्पेक्टर श्री. देशमुख** यांची महानुभूति आणि सहाय्य मोठ्या प्रमाणावर झालें.


**केंद्र–एरंडगांव**

**श्री. दादासाहेब गोरवाडकर व श्री. आण्णासाहेब भांबेरे यांचे हस्तें धान्य वांटप**



येवलें शहरांतील बहुसंख्य विणकर समाज व अन्य अनेक मध्यम वर्गीय कुटुंबें यांची दुष्काळामुळें उपासमार होऊं लागली. त्यांना दुष्काळी कामावर धड मजूर म्हणून काम करतां येईना, अथवा सरकारी डोल मिळवितां येईना, संघाच्या स्वयंसेवकांनीं घरोघरीं जाऊन प्रत्येक कुटुंबाच्या परिस्थितीची माहिती मिळविली, आणि नंतर **श्री. अण्णासाहेब भांबेरे** यांनी येवल्याचे नगरशेठ, **श्रीमान् त्रिभुवनदास शेठ**–गंगाराम छबिलदास पेढीचे मालक–यांचेसमोर अनेक कुटुंबांची प्रत्यक्ष हकिकत ठेवून धान्य मदत करण्याबद्दल त्यांना विनंति केली. **श्रीमान् त्रिभुवनदास** यांनीं समाजकर्तव्याची जाणीव ठेवून या आणीबाणीच्या काळांत उदारपणानें ४५०० लोकांना सुमारें १२,००० रुपयांचें २५० पोतीं धान्य वाटलें.

येवलें तालुक्यांत दुष्काळी कामाच्या तेरा केंद्रांवर ५६ गांवच्या ३१६६ लोकांना कपडे वांटण्यांत आले. येवलें व एरंडगांव केंद्रावर बारा गांवच्या ६५ गरीब कुटुंबांना दि. २७ एप्रिल ते ७ जूनपर्यंत म्हणजे आठ आठवडे धान्य वांटण्यांत आलें. लहान मुलांना मोफत दूध देण्यासाठीं येवलें, अंगणगांव, एरंडगांव, नेऊरगांव, आडगांव, नागडे व देवठाण या सात गांवीं केंद्रें चालविण्यांत आलीं. १९ मार्चपासून




जुलै अखेरपर्यंत दूध वांटपाचें काम सुरुं होतें. या काळांत सुमारें ३००० लहान मुलांना प्रतिदिनीं प्रत्येकीं पावशेर याप्रमाणें दूध वांटण्यांत आलें. दूध वांटप करण्यांत मध्यवर्ति दुष्काळ निवारण समिति, पुणें, यांचे कार्यकर्ते **श्री. मधुकरराव देवल** यांचें मोठेंच सहकार्य मिळालें. येवल्याचे डॉक्टर **श्री. कांतिलाल पटेल** यांनीं एरंडगांव दुष्काळ पीडितांना औषधोपचार केला. जून महिन्याच्या अखेरीस तालुक्यांतील २३ गांवच्या ७९ शेतकऱ्यांना बियाणें वांटण्यांत आलें.

## नांदगांव तालुका

नांदगांव तालुक्यांतील दुष्काळी भागांतील दुष्काळी कामाच्या हिसूळ, न्याय-डोंगरी व पिंपरखेडें या तीन केंद्रांवर नांदगांव तालुका कार्यवाह **श्री. माधवराव सप्रे वकील, श्री. अण्णासाहेब शेवडे** व इतर स्वयंसेवकांनीं जाऊन तेथील मजुरांच्या अडचणींची विचारपूस केली. व या तीन ठिकाणीं व मालूर येथें ८०० लोकांना कपडे वांटले. यापैकीं कांहीं कपडे मुंबईहून आलेले होते, तर कांहीं कपडे मनमाडच्या स्वयंसेवकांनीं गांवांतच जमवून पाठविले होते.

## सटाणें तालुका

सटाणें तालुक्यांत तुर्की होडी येथें चाललेल्या दुष्काळी कामावर जाऊन कार्यकर्ते **डॉ. खरे** यांनीं पाहणी केली. ता. ९ एप्रिल ५३ रोजीं सटाणें व लोहोणेर

येथील संघ कार्यकर्ते **श्री. केशवराव मोरे, श्री. तुकाराम सोनवणे, शेवाळे बंधू, श्री. मनोहर बागुल, श्री. सुरजमल मारवाडी,** इत्यादिनीं दुष्काळी कामावरील लोकांना कपडे वांटप केलें. खुद्द सटाणें गांवांतहि गरजूंना कपडे वांटण्यांत आले. तुर्की होडी येथें आजारी माणसांना औषधोपचार करण्यांत आला व गरजूंना धान्य देण्यांत आलें.

## सिन्नर तालुका

मुंबईहून आलेले कपडे गोवें या गांवीं बंडिंगचे कामावर असलेल्या मजुरांना वांटण्याचा कार्यक्रम नाशिकचे जिल्हाधिकारी मेजर **रा. गो. साळवी** यांच्या हस्तें झाला. या कार्यक्रमास सिन्नरचे संघचालक **श्री. अप्पासाहेब खारकर, श्री. भाऊसाहेब मालपाठक,** नाशिक जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष **श्री. अ. गो. दुर्वे** वगैरे मंडळी उपस्थित होती. यावेळीं केलेल्या छोट्याशा भाषणांत **मेजर साळवी** म्हणाले, " राष्ट्रीय स्वयंसेवक संघानें दुष्काळ पीडितांना केलेल्या मदतीबद्दल संघाला धन्यवाद दिले पाहिजेत. या मदतीमागची बंधुत्वाची भावना वाखाणण्यासारखी आहे. "

त्याचप्रमाणें वडांगळी व गुळवेल या दोन ठिकाणच्या बंडिंगचे कामावरील मजुरांना प्रांताधिकारी **श्री. भोसेकर** यांच्या हस्तें कपडे वांटण्यांत आले. यावेळीं **श्री. भाऊसाहेब मालपाठक** जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष **श्री. अ. गो. दुर्वे** उपस्थित होते. यावेळीं **श्री.** दुर्वे यांनीं संघाच्या मदतीबद्दल प्रशंसोद्गार काढले. संघाच्या दुष्काळ विमोचन समितीच्या कार्याची माहिती तालुक्याचे मामलेदार **श्री. द. तु. गोरवेकर** यांनीं सिन्नर तालुका दुष्काळ निवारण समितीच्या एका सभेंत सांगितली. ते म्हणाले-" राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सिन्नर शाखेच्या वतीनें सुमारें ३००० कपडे दुष्काळ पीडितांना वांटण्यांत आले असून या मदतीची किंमत पैशांत करतांच येणार नाहीं. "

## मालेगांव तालुका

सुकीनाला, वडेल येथील दुष्काळी कामावरील लोकांस, तसेंच मालेगांवीं **श्री. तनपुरे महाराजांनीं** चालवलेल्या अन्नछत्रांत आणि तालुक्यांतील कळवाडी, दहीवळ, शेंदुरणी चिखलवहाळ, शिरुळ आदि कांहीं खेड्यांतील गरीब लोकांस कपडे वाटण्यांत आले. मालेगांव तालुका संघचालक **श्री. बाबूराव चिंधडे** वकील आणि मालेगांव शहर संघचालक **श्री. दादासाहेब कासार** वकील यांनीं येथें स्वतः कपडे वांटप केलें. मालेगांवीं स्वयंसेवकांनीं गोळा केलेलें तीन पोतीं धान्य चांदवड तालुक्यांतील गरजू लोकांस वांटण्यासाठीं " मध्यवर्ती दुष्काळ निवारण समितीस " दिलें.

स्थानिक सर्वपक्षीय " मालेगांव तालुका दुष्काळ निवारण समितीसही " गावांतून धान्य व पैसे जमविण्यास स्वयंसेवकांनीं मदत केली.

## चांदवड तालुका

खडक-ओझर येथें व दुगांवजवळ चालूं असलेल्या दुष्काळी कामावर गरजूं लोकांस कपडे वांटण्यांत आले.

## नाशिक शहरांतील संकलन

नाशिक शहरांत दुष्काळ विमोचनार्थ रु. १९९-५-० रोख, ५ मण ३ शेर धान्य व ३२५ कपडे जमविण्यांत आले.

वा. य. गोरवाडकर
शं. द. भांबेरे

*
*
* * ८ * *
*
*

# नगर जिल्हा

नगर जिल्ह्यांतील १३ तालुक्यांपैकीं पारनेर, कर्जत, श्रीगोंदे, जामखेड हे चार तालुके नेहमींच थोड्या फार प्रमाणांत दुष्काळाचे कक्षेंत असतात. त्या भागाची आणेवारी सरासरीनें ६–७ आणेच असते. त्यामध्येंच गेल्या कांहीं वर्षांत पावसाचें मान हळू हळू कमीच होत चाललें आहे, आणि गेल्या वर्षी तर चार महिन्यांत पावसाच्या तीन चार सरी झाल्या. तेव्हां मात्र पुढील भीषण भवितव्य स्पष्ट दिसूं लागलें.


आपल्या समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षासाठीं बद्धपरिकर झालेल्या संघस्वयंसेवकांची मनोवृत्ती या परिस्थितीमुळें अधिकाधिक तीव्रतेनें कार्यप्रवण होऊं लागली. रा. स्व. संघाची महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समिति स्थापन झाली, आणि त्यानुसार नगर येथें शहर संघचालक **मा. अण्णासाहेब खेर** यांचे अध्यक्षतेखालीं एक समिति स्थापन करण्यांत आली. राहुरी तालुक्यांत देवळाली प्रवरा येथें व दुसरी पारनेर तालुक्यांत पारनेर येथें अशा दोन समीतिच्या शाखा उघडण्यांत आल्या. सर्व प्रथम आवश्यक काम होतें तें म्हणजे लोकांचा सुटत चाललेला धीर



डॉ. खानोलकर दुष्काळग्रस्तांना दिलासा देत आहेत. केंद्र : राहुरी



श्री. आबाजी पाटील आणि केंद्र प्रमुख श्री. सदाशिवराव पुरंदरे
धान्य वांटत आहेत. केंद्र : पिंपरी जलसेन




रीस सर्व सामान नेऊन अन्नछत्र सुरुं करण्यांत आलें. आठशें लोक त्या दिवशीं तेथें जेवले. ३० जून अखेरपर्यंत हें अन्नछत्र चालविण्यांत आलें. या दीड महिन्याच्या अवधींत ५६३० माणसें जेऊन गेलीं. अनाथ, अपंग, अंध, अशाच लोकांना येथें मदत मिळत होती. लोकांत नुसते बसून जेवण्याची प्रवृत्ति वाढू नये, म्हणून प्रत्येकांकडून कांहीं ना कांहीं काम करवून घेण्यांत येत होतें. रोज स्नान केल्याशिवाय जेवण मिळत नसे. या पद्धतीमुळें स्वच्छतेची आवड निर्माण झाली. या जेवणारांमध्यें एक एकशें-दहा वर्षांचा वृद्धहि होता. एका चांभाराचा लहान मुलगा येथें जेवणास येत असे. समितीनें त्याला बूटपॉलिशचें सामान घेऊन दिलें. गांवामध्यें त्यानें बूट पॉलिशचा धंदा सुरुं केला. सध्यां तो रोजीं रुपया मिळवीत असतो.

राहुरी येथील अन्नछत्र चालू करतांना अन्नछत्रांत जे लोक जेवतील त्यांच्या डोलची रक्कम समितीला सरकारकडून मिळेल असें आश्वासन मे. राहुरी तालुका मामलेदार यांनीं दिलें होतें. त्याप्रमाणें कांहीं दिवस घडलेंहि. सामान्यपणें प्रत्येक जेवणारामागें समितीला आठवड्यांत ३॥ रु. खर्च येई. पैकीं डोलची रक्कम १॥। रुपये वजा जातां बाकीच्या रकमेची सोय समितीनें केलेली होती. अशा स्थितींत जिल्हाधिकारी **श्री. राणा** यांचेकडून अचानक 'तुम्हाला डोलची रक्कम मिळणार नाहीं असें आज्ञापत्र आल्यानें समितीला तोंडघशीं पडल्यासारखें झालें. शेवटीं सरकारी मदतीशिवायहि अन्नछत्र चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यांत आला.

पण अन्नछत्रांत जेवणाऱ्या अपंगांची सचोटीची वृत्ति मदतीला आली. त्यांनीं आपणहून डोलची रक्कम मिळाल्यावर समितीकडे आणून देण्यास प्रारंभ केला.

अशा सारख्या निरनिराळ्या वेळीं जिल्हाधिकाऱ्यांकडून कामामध्यें थोडीफार हरकत होई; ती सोडल्यास इतर वेळीं सर्व अधिकाऱ्यांनीं उत्तम सहकार्य दिलें. तालुका मामलेदार **श्री. सावंत**, तसेंच सरकारी दुष्काळी अधिकारी. **श्री. जोशी** यांचेंहि उत्तम सहकार्य आणि मार्गदर्शन लाभलें. **सर्वश्री. प्र. ह्. अग्रवाल** (राहुरी ग्राम पंचायत उपाध्यक्ष), **बाबासाहेब कासार. द. या. उपाध्ये, भागवत, देशपांडे** (शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष), **भाऊराव तांबोळी, बबनराव जंगम, मोहनशेठ दरक, शंकरराव परदेशी व श्री. मोरे बाबा** यांनीं उत्तम सहकार्य दिलें. तसेंच अन्न-छत्राची व्यवस्था पाहण्याचें काम **सर्वश्री मोरेश्वर उपाध्ये, गंगाधर कुलकर्णी**, आणि **नामदेवराव नेवासकर** यांनीं उत्तम रीतीनें केलें. समारोपासाठीं नगरचे **श्री. अण्णासाहेब रेंघे**, बी. ए., (सह्याद्रि विमा कंपनीचे एजंट) हे आले होते. सदर दिवशीं गव्हाची लापशी व भात इत्यादि जेवण केलें होतें. या प्रसंगीं राहुरीचे कॉंग्रेस कार्यकर्ते **श्री. भारतभाई** हेहि उपस्थित होते. या केंद्रास खासदार **श्री. भाऊसाहेब कानवडे** यांनीं भेट दिली.


## दुष्काळी कामांची सूचना

अनेक ठिकाणीं स्वतः हिंडून समितीच्या कार्यकर्त्यांनीं नवीं दुष्काळी कामें सुचविलीं. कोळेवाडी येथील धरणाची कल्पना समितीनें सुचविली. या धरणामुळें सुमारें १५०० ते २००० एकर जमीन भिजेल व २०० एकर बारमाही बागाईत होईल अशी सरकारी अधिकाऱ्यांची कल्पना आहे. लाख-देवळाली रस्त्याचें कामहि समितीनें सुचविलें. ताराबाग रस्त्याच्या कल्पनेस समितीनें दैनिक भारतमध्यें प्रसिद्धी दिली, व योगायोग असा कीं चौथ्याच दिवशीं तें काम दुष्काळी काम म्हणून जाहिर झालें. अखेरपर्यंत सातत्यानें काम करणाऱ्या समितीच्या या केंद्रातर्फे एकूण २३ गांवांतील लोकांना धान्य, कपडे व औषधें पुरविलीं गेलीं.

## पारनेर तालुका

पारनेर तालुक्यामध्यें तालुका संघचालक श्री, **गंगाधरपंत खिस्ती** यांच्या अध्य-क्षतेखालीं समितीचें काम सुरू करण्यांत आलें. पारनेर येथें **श्री. तात्याराव पूरकर** यांची कार्यवाह म्हणून नियुक्ति झाली. त्यांनीं पारनेरच्या जोडीला आणखी दोन उपकेंद्रें उघडली. जामगांव येथें **श्री. नारायण केळकर** व **श्री. नवनीत गुजराथी** यांच्यावर कामाची जबाबदारी टाकण्यांत आली. पिंपरी जलसेन येथें **श्री. सदाशिव-राव पुरंदरे** यांच्यावर जबाबदारी दिली. तालुक्यांत एकशेंचौदा पैकीं एकशें दहा गांवें दुष्काळी होतीं. या भागांत मदत देतांना सुरुवातीपासून असें एक विशिष्ट धोरण

ठेवण्यांत आलें होतें कीं, दुष्काळी कामाच्या केंद्रापासून दूरच्या गांवीं असणाऱ्यांनाच मदत पोंचविण्याचा प्रयत्न करणें. त्यामुळें खेडयापाडयांतून, झोपडया झोपडयांतून जाऊन मदत करणेंस योग्य अशीं माणसें निवडून काढण्यासाठीं पारनेर तालुक्यांतील तिन्हीं केंद्रांतील स्वयंसेवक कामाला लागले. पुण्याहून मदतीचा पहिला हप्ता म्हणून आलेले सुमारें २५०० कपडे केंद्र व उपकेंद्रांतून वांटण्यास सुरुवात झाली. पारनेर केंद्रांतून पारनेर, विरोली, पुनेवाडी, लोणी, हातलखिंडी, आणि जवळपासच्या कांहीं लहान लहान रस्त्यांमधून मदत देण्यांत आली. विरोली येथें श्री. **दगडोबा आचार्य** यांच्या देखरेखीखालीं गहूं व कापड वांटप झालें. पिंपरी केंद्रांतून **श्री.सदाशिवराव पुरंदरे** यांच्या देखरेखीखालीं जवळे, देवी,भोयरे, पिंपरी जलसेन, चिंचोली, वडगांव आणि गांगी धोयरे वगैरे गांवांमधून कपडे वांटण्यास सुरुवात झाली. जामगांव केंद्रांतूनहि जवळपासच्या ८ गांवामधून मदत देण्यांत आली. पुढें पुण्याहून धान्य आल्यानंतर धान्य वांटपास प्रारंभ झाला. ज्यांनीं जन्मांत कोणापुढें हात पसरला नाहीं अशीं माणसें सुद्धां या ठिकाणीं आलेलीं पाहून हृदयांत कालवाकालव होई, आणि अशा लोकांना आपण फक्त एवढीच मदत करूं शकलों या विचारानें तर अधिक उदासीनता वाढत असे.



**पारनेर केंद्र : श्री. तात्याराव पुष्कर धान्य वांटत आहेत.**

दि. २६ एप्रिल ५३ रोजीं जामगांव केंद्रावर **श्री. नवनीत गुजराथी** यांच्या देखरेखीखालीं ढिकसळ, देठणें, मारोळें वगैरे पांच गांवच्या लोकांना **श्री. भागोजी धोलप** यांच्या हस्तें धान्य व कपडे वांटण्यांत आले. ढवळपूर येथें **श्री. बाबूराव**

**कुलकर्णी** यांच्या हस्तें कपडे वांटण्यांत आले. उन्हांतान्हांतून काम करत असणाऱ्या मजुरांकडे आणि शेतकऱ्यांकडे पाहून त्यांची एक गरज ध्यानांत आली आणि ती म्हणजे त्यांच्या पायांत पायतणें नव्हतीं याची. त्याप्रमाणें पुण्याला मागणी करण्यांत आली आणि मागणी केल्याबरोबर पुण्याहून पायतणेंहि पाठविण्यांत आलीं. औषधोपचार करण्यासाठीं औषधाची पेटीहि आली. येथील एक वैद्य **श्री. वसंतराव मुळे** यांनीं केंद्रातर्फे दुष्काळ पीडितांस औषधोपचार करण्यामध्यें सहायता दिली. या तालुक्यांत केंद्रातर्फे २० गांवांना मदत मिळूं शकली.

## श्रीगोंदे तालुका

सर्वांत जास्त भीषण दुष्काळ असलेला भाग म्हणजे श्रीगोंदे तालुका. या तालुक्यांतील माणसें व जनावरें तर डिसेंबर महिन्यापासून स्थलांतरित होऊं लागलीं होतीं. पिंपरी स्टेशन ( श्रीगोंदा रोड ) या गांवीं प्रथम मदत केंद्र सुरुं केलें. हें केंद्र **श्री. जयसिंगराव तथा आबासाहेब वाबळे** हे पहात असत. दुर्दैवानें आतां या नांवामागें कैलासवासी हा शब्द लावणें भाग आहे. हें कार्य करीत असतांना २१ मे १९५३ रोजीं निर्घृण काळानें त्यांना ओढून नेलें.

श्रीगोंदा येथें एप्रिल ५३ चे शेवटच्या आठवड्यांत **डॉ. खानोलकर** यांनीं शाळेंतील १५० मुलां--मुलींना कपडे वाटले. यावेळीं नव्यानेंच येथें आलेले **डॉ. चांदोरकर** यांनीं फार सहाय्य केलें. तालुक्यांतील मांडवगड या गांवीं **श्री. दादासाहेब बडवे** यांच्या देखरेखीखालीं **श्री. दादासाहेब भापकर** यांच्या हस्तें कपडे वांटण्यांत आले. श्रीगोंदे तालुक्याच्या जवळच असलेला कर्जत तालुका. या तालुक्यांतील गांवेंच्या गांवें अक्षरशः उठून गेलीं आहेत. त्यांच्या शब्दांत सांगावयाचें झालें तर तेथील लोक जगायला गेले आहेत, कित्येक गांवांमध्यें तीन तीन मैलाच्या परिसरांत पाणी नाहीं. " जळकेवाडी " नांवावरुनच लक्षांत येईल, या गांवांत विहिरी म्हणजे जमिनीला पाडलेलीं खोल कोरडीं भोकें असाच अर्थ व्हावा अशा आहेत. मध्यंतरी पाहणीसाठीं स्वयंसेवक गेले असतांना त्या गांवांत दोन म्हातारे, एक बाई व एक लहान मूल इतकींच माणसें तेथें भेटलीं. अशा या कोरड्या तालुक्यांत दुष्काळी काम म्हणून गुरव पिंपरी आणि दूरगांव असे दोन तलाव काढण्यांत आले. त्यापैकीं दूरगांव या तलावाला कर्जत गांवांतील स्वयंसेवक **श्री. पंडित मराठे** आणि **श्री. बलभीम लिंहिणे** यांनीं समितीकडून आलेले कपडे या ठिकाणीं वांटले. गुरव पिंपरी तलावाजवळच मिरजगांव नांवाचें एक गांव आहे. तेथें मुंबई सरकारचे एक उपमंत्री **श्री. चांद्रेकर** आले असतांना समितीतर्फे या ठिकाणच्या गरजू अशा सुमारें ३०० लोकांना त्यांचे हस्तें कपडे वांटण्यांत आले. या ठिकाणीं तेथील कॉंग्रेस कार्यकर्ते **श्री. गोकुळचंद शेठ** यांचें व मिरजगांव शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष **श्री. मुरलीधरपंत झरकर** यांचें बरेंच सहाय्य झालें.



**मिरजगांव केंद्र**

**मुंबई राज्याचे उपमंत्री श्री. वांद्रेकर यांचे हस्तें कपडे वांटप**

एके दिवशीं सर्व स्वयंसेवकांनीं कर्जतपासून पांच मैलावर असलेल्या आंवी—जळगांव रस्ता या दुष्काळी कामावर भाकऱ्या वांटण्याचें ठरविलें, व त्याप्रमाणें कर्जत गांवांतून सुमारें ८०० भाकऱ्या आणि कालवण जमवून एप्रिल महिन्याचे शेवटच्या आठवड्यांत **श्री. नानासाहेब खेर** यांचे हस्तें भाकरी वांटपाचा कार्यक्रम झाला. अशा तऱ्हेनें इकडे मदत कार्य चालू असतानांच दि. २७ मे ५३ रोजीं नगर मधील स्वयंसेवकांनीं सुमारें १२०० पोळ्या व ४ हारे गूळ जमविला. शहरांतील सर्व स्वयंसेवक यासाठीं झटत होते. या जमलेल्या पोळ्या राहुरी अन्नछत्रांत वांटण्यांत आल्या. कर्जत तालुक्यांत जळकेवाडी येथें २५ लोकांना ज्वारीचें ३०० शेर आणि मिरजगांव येथें १८ लोकांना ३०० शेर बियाणें वांटण्यांत आलें.

## नगर येथील कार्यक्रम

सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक **श्री. सुधीर फडके** यांचे गायनाचा कार्यक्रम दि. २२ जून ५३ रोजीं नगर महाविद्यालयाच्या दिवाणखान्यांत यशस्वी रितीनें पार पडला. या कार्यक्रमाचें उत्पन्न सुमारें रु. ६०० आलें. या कार्यक्रमासाठीं समर्थ पुस्तक बांधणी केंद्राचे मालक **श्री. रामभाऊ हुडप** व श्री—उपहार गृहाचे चालक **श्री. वसंतराव चांदेकर,** तसेंच **श्री. माणिकराव पाटील वकील,** यांनीं फार श्रम घेतले. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. हिवाळे यांनीं दिवाणखाना विनामूल्य वापरण्यास दिला. श्री. सुधीर फडके यांनीं आपली ही सेवा निरपेक्षपणें रुजूं केली.

या दुष्काळाच्या संकटकाळीं संघाप्रमाणेंच दुसरी एक संस्था रामकृष्ण मिशन दीनांच्या तोंडांत घास घालत होती. नगर येथील मिशनतर्फे चाललेल्या अन्नछत्रांत येथील स्वयंसेवक उत्साहानें काम करीत होते.

**रा. ग. खानोलकर**
**वि. ग. खेर**

---

*

*

** १ **

*

*

# सांगली जिल्हा

दक्षिण सातारा अथवा सांगली जिल्ह्यापैकीं तासगांव तालुक्याचा पूर्वभाग व आटपाडी तालुका, तसेंच मिरज तालुक्यापैकीं कवठे महांकाळ महाल, आणि संपूर्ण जत तालुका एवढा भाग दुष्काळ पीडित होता. वास्तविक जत भाग हा नेहमींच अवर्षणाचा आणि दुष्काळी असतो. त्यावेळीं तेथील लोक तात्पुरते स्थलांतर करून नजिकच्या भागांत उद्योगधंद्यासाठीं जातात. परंतु यंदा आसपासहि दुष्काळ असल्यामुळें या लोकांचे फार हाल झाले. खुद्द जत तालुक्यांत कायम स्वरुपाची मोठी पाणी पुरवठ्याची कोणतीहि योजना आंखलेली नाहीं. याची उणीव यावेळीं अत्यंत तीव्रतेनें भासली.


महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समितीच्या योजनेप्रमाणें या जिल्ह्यांतील कामास जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यांतच प्रत्यक्षपणें सुरुवात झाली. जाहिराती वाटून व ध्वनीक्षेपकाच्या साहाय्यानें प्रचार करून दुष्काळाप्रीत्यर्थ मदत गोळा करणें सुरुं झालें. सांगली, मिरज, इचलकरंजी, जयसिंगपूर, तासगांव, विटें, शिराळें, ईश्वरपूर, कुरुंदवाड, नरसिंहवाडी, गणेशवाडी, बुधगांव व माधवनगर या ठिकाणीं

मदत गोळा करण्यांत आली. दुष्काळी भागांपैकीं वज्रचौंडे येथील दुष्काळी काम आणि जत तालुक्याच्या दृष्टीनें जत अशीं दोन ठिकाणें निश्चित करण्यांत आलीं.

## वज्रचौंडे केंद्र

वज्रचौंडे या गांवाजवळून वाहणाऱ्या ओढ्याला धरण बांधण्याचें दुष्काळी काम मार्च १९५३ च्या सुमारास सुरु झालें. सुमारें सातशें मजूर कामावर होते. दि. -२-४-५३ ला जिल्हा प्रचारक श्री. **वसंतराव भिडे** यांनीं **श्रीमान् बी. ए. कुलकर्णी** व श्री. **बाळासाहेब लिमये** यांचे समवेत जाऊन परिस्थितीची पाहणी केली, नि काय काय व्यवस्था करतां येईल याची चौकशी केली. याचवेळीं बंधाऱ्याचे कामावरील प्रमुख इंजीनिअर श्री. **पेठकर** यांनीं बंधाऱ्याच्या कामासाठीं म्हणून सांगली इंजिनीअरिंग महाविद्यालयांतून दोन विद्यार्थ्यांना पाठविण्याबद्दल विनंती केली.

दि. २६-४-५३ ला तासगांव येथें जमविलेल्या भाकरी व चपात्या व तेथें तयार केलेलें पिठलें **नामदार श्री. यशवंतराव चव्हाण**, पुरवठा मंत्री, मुंबई राज्य, यांच्या हस्तें मजुरांना वांटण्यांत आलें. त्या दिवशी अतिवृष्टि झाल्यामुळें बऱ्याच झोपड्या पडल्या होत्या. संघाच्या स्वयंसेवकांनीं त्या झोपड्या उभारण्यास



मदत केली. सांगली जिल्हा संघचालक **श्री. माधवराव गोडबोले** हे वारंवार या व इतर केंद्रावर जात असत.

**श्री. पेटकर** यांनीं केलेल्या विनंतीनुरुप दि. २८-४-५३ ला सांगलीहून इंजिनिअरिंग महाविद्यालयांतील **श्री. भालचंद्र मनोहर** आणि **श्री. लक्ष्मण साने** हे वज्रचौंड्यास केंद्र चालविण्यासाठीं गेले. जातांना धान्य व कपडे त्यांनीं बरोबर नेले होते. हे दोघे स्वयंसेवक त्या ठिकाणीं २८ एप्रिल तें १० मे ५३ पर्यंत राहिले व त्या ठिकाणीं त्यांनीं धान्य व कपडे यांचें वांटप केलें. **श्री. पेठकर** इंजीनिअर यांचे मार्गदर्शनाखालीं धरण बांधण्याचें काम तहि त्या ठिकाणीं त्यांनीं मदत केली. संघ सहानुभूति असणारे गांवांतील रहिवासी **श्री. गोविंदराव गोखले** यांचेंहि बरेंच साहाय्य झालें.

## जत केंद्र

या तालुक्यांत एकूण बावीस गांवच्या आसपास बंडिंगचीं कामें चालू होतीं व त्या ठिकाणीं एकूण ७००० मजूर काम करीत होते. दि. १५-३-५३ ला वर्ष-प्रतिपदेच्या दिवशीं सांगली शहरांतून ५००० पोळया नागरिकांकडून जमा केल्या. व पांच खडे गूळ घेऊन **श्री. बाबासाहेब पोतदार** व अन्य संघ कार्यकर्ते चोरोची या दुष्काळी गांवीं गेले. या ठिकाणीं सांगली नगरपालिकेचे एक सभासद **श्री. शि. म. पुराणिक** यांचे हस्तें गूळ-पोळी वांटण्यांत आली. त्याचप्रमाणें दि. २२ मार्चला जत शहरांतील स्वयंसेवकांनीं आसपासच्या तालीच्या कामावरील मजुरांना पोळया व गूळ वाटला. अक्षय्य तृतीयेच्या दिवशीं सांगलीहून जिल्हा संघचालक **श्री. माधवराव गोडबोले** आणि अन्य कार्यकर्ते हे जत, बिळूर या ठिकाणीं गेले होते. तेथें त्यांनीं बुंदीचे लाडू व कपडे वाटले. त्याचप्रमाणें अमृतवाडी, मेढेगिरी येथेंहि बुंदीचे लाडू व


**केंद्र-जत**
**दुष्काळ पीडित जनता आणि केन्द्रावरील कार्यकर्ते**



कपडे वाटले. येथें सांगली महाविद्यालयांतील विद्यार्थी **श्री. प्रल्हाद इनामदार** आणि **श्री. उद्धव वसगडेकर** हे काम करीत होते.

दि. २४ मे ५३ ला जत भागांत **श्री. म. ह. गोडबोले, श्री. पां. भा. कुलकर्णी** यांनीं जिल्हा दुष्काळ निवारण समितीचे **बॅ. जी. डी. पाटील** आणि तेथील मामलेदार **श्री. घोरपडे** यांच्यासह बिळूर, मुगवाड, उमराणी व मुचंडी या गांवीं जाऊन दुष्काळी कामाची समक्ष पहाणी केली. जिल्हा दुष्काळ निवारण समितीतर्फे बिळूर येथें अल्प मूल्यांत भाकरी आमटी देण्याचें एक केंद्र उघडण्यांत आलें होतें. त्याला संघानें जमविलेलें सांगली गोडाऊनमधील सुमारें ८ पोतीं धान्य देण्यांत आलें. जत भागांतील निरनिराळ्या एकूण बावीस ठिकाणीं हजारों कपडे आणि पांच पोतीं धान्य यांची मदत करण्यांत आली.

म. ह. गोडबोले
पं. भा. कुलकर्णी



प्रकाशक :- चि. वि. पेंडसे, बी. एससी. कार्यवाह,
महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समिति, ८५१ अ, सदाशिव, पुणे २.
मुद्रक - शं. वा. जोशी बी. एससी. विकास मुद्रणालय, ८६५ सदाशिव, पुणे